

वर्ष १ अंक २

# अंगारमळा

मार्च, एप्रिल, मे २०१७

सेवाग्राम
साकडे आंदोलन

## आम्ही लटिके ना बोलु...

तिसरे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन विशेषांक

अंगारमळा - मार्च, एप्रिल, मे २०१७




The World's Fastest Exchange with a speed of 6 Microseconds.
Website: www.bseindia.com | Follow us on: /BSEIndia | @BSEIndia | /BSEIndia
Disclaimer: Issued in public interest by BSE investor protection fund.

# अंगारमळा

**Title Code :** MAHMAR47450

**वर्ष १ । अंक २ । २० मार्च २०१७**

**मूल्य : रु. ५०**

**अंगारमळा** हे त्रैमासिक मालक, संपादक, मुद्रक, प्रकाशक, गंगाधर मुटे, मु.पो. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा- ४४२ ३०७ यांनी मुद्रीत करून तेथेच प्रकाशित केला.

संपादक
**गंगाधर मुटे**

अंक मांडणी
**प्रकाश बोपीनवार**

वार्षिक वर्गणी : रु. १५० केवळ
संपर्क :
**अंगारमळा**
**मु.पो. आर्वी (छोटी)**
**ता. हिंगणघाट, जि. वर्धा**
**पीन कोड - ४४२ ३०७**
Email : angarmala2016@gmail.com
Mob. 9730582004, 9730786004

**ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी :**
Angarmala
Punjab National Bank
Branch Hinganghat (Wardha)
A/c No. 0202002100027538
IFS Code : PUNB0020200

अंकातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

itle Code : MAHMAR47450

## अंतरंग

अनुक्रमणिका ........ १
संपादकीय ........ ३
आम्ही लटिके ना बोलू........ शरद जोशी ........ ५
राष्ट्रपिता महात्म्याला साकडे निवेदन ........ गुरुराज राऊत ........ ७
वेदनेचे रुपांतर हिंसेपेक्षा कवितेत करणे कठीण .. शेषराव मोहिते ........ ११
तिसरे अ.भा. शेतकरी साहित्य संमेलन ........ डॉ. किशोर सानप........ २५
तिसऱ्या अ.भा.मराठी शेतकरी साहित्य ........ प्रविण पोहाणे ........ २९
ऐकतो आहे पुन्हा एल्गार मातीचा... ........ निलेश कवडे........ ३०
शेतकरी कवी संमेलन भाग-२ ........ प्रा. अभिजित डाखोरे ........ ३३
शेतीरहित्य निर्मिती करणे हे सतीचे वाण ........ राज पठाण ........ ३७
परिसंवाद - पारंपारिक कथा-लोकगीते ........ अंगारमळा रिपोर्टींग ब्युरो ........ ३९
शेतकरी साहित्याच्या बदलत्या छटा ........ सरोजताई काशीकर ........ ४१
आसाराम लोमटे यांच्या 'इडा पीडा टळो' ........ प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत........ ४२
संपलेली दिवाळी (कविता) ........ प्रकाश दलाल ........ ४५
घोषणा दुपटीची, धोरणे निमपटीची ........ सुधाकर जाधव ........ ४७
पुरस्कारांचे राजकारण ........ राजेश राजोरे ........ ४९
तुमचा तक्रारलेख ........ श्याम पवार........ ५०
जोमात पीक आले (बांधावरचे मोती) ........ सौ. संध्या पाटील ........ ५१
माणसासाठी कणसात दाणा (बांधावरचे मोती) ... रावसाहेब जाधव ........ ५१
शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती ..... विनिता माने ........ ५३
राजसत्ता (कविता) ........ राजेश जौंजाळ ........ ५४
मायचं सपन ........ संघमित्रा खंडारे........ ५५
तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल ........ राज पठाण ........ ५७
शेतकरी संघटनेचे शासनास पत्र ........ अनिल घनवट ........ ५९
गौतम बुद्ध आणि शरद जोशी ........ हसनराव देशमुख ........ ६१
जय जवान जय किसान ........ बापूसाहेब पगारे ........ ६१
शरद जोशी शोधताना ........ शाम पवार ........ ६३
आंदोलनाचा पहिलाच अनुभव ........ सचिन मोहन चोभे........ ६९

### - संपर्क प्रतिनिधी -

**श्री. अभिमन्यु शेलार**, पुणे, मो. ९५६१५६५६२५ **प्रा. भुपेश मुडे**, मुंबई, मो. ९२२३५३८०३० **श्री. निवृत्ती करडक**, नाशिक, मो. ९३७१२५९५४५ **श्री. कडुआप्पा पाटील**, धुळे, मो. ९३७१२७२७८१ **श्री. रमेश खांडेभराड**, जालना, मो. ९४२१३२३६१३ **श्री. सुधीर बिंदु**, परभणी, मो. ९९२३०४९००७ **श्री. मदन सोमवंशी**, लातूर, मो. ९७६४०६१८७७ **श्री. सतीष देशमुख**, अकोला, मो. ९६०४९१२३५१ **श्री. राजु झोटींग**, यवतमाळ, मो. ९६७३३४६६३५ **श्री. शालीक पाटील नाकाडे**, गडचिरोली, मो. ९४०४२२०४३९ **श्री. धोंडबा गावंडे**, वर्धा, मो. ९४२००६२८७६

Ankur®

४० वर्षांपासून

# शेतकऱ्यांच्या सेवेत

## बदलत्या गरजांनुसार नाविन्यपूर्ण संशोधन...



## प्रमुख उत्पादने

**संकरित वाण :**

**धान** : ७४३४, ७०४२, १३५५५,

**बोलगार्ड कपाशी** : जय, ३०२८, २१६, ३२४४, सुवर्णा, ४२५२
**मका** : आदित्य **बाजरा** : ०४५
**भेंडी** : लकी, किमया, **टोमॅटो** : रणवीर, अर्णव
**मिरची** : ९३०, अमिशा, रेणुका **दुधीभोपळा** : अमित, १५८, नटवर
**वांगी** : राकेश, पन्ना, किर्ती, हर्षल, अरिहंत, श्यामल **कारले** : रजत, गिरिजा, श्रेया
**टरबूज** : कशीश, सरस **वाल** : डॉली

**संशोधित वाण :**

**धान** : सोनम, रुपाली, राजेंद्र भगवती, ज्योतिका, साधना, एकवीरा, श्री-१०१

**गहू** : केदार, उमेश **भेंडी** : ४०, ४१ **चवळी** : गोमती, व्हीयु-५, हरी, केतकी
**वाल** : गोल्डी **गवार** : प्रिया, राणी

www.ankurseeds.com

**अंकुर सीड्स** विश्वासाचे प्रतीक !


# संपादकीय....


## खरा शेती साहित्यिक कोण?

शेतकऱ्यांची बाजू घेऊन लढणाऱ्या लढवैय्यांसाठी हातात नांगर धरल्याची अनुभूती असणे नक्कीच महत्त्वाचे असले तरी अनिवार्य नाही. एखाद्याच्या नावाने सात–बारा असला किंवा तो प्रत्यक्षात शेतीत राबत असला म्हणजे तो शेती आणि शेतकऱ्यांचा हितचिंतकच असतो. असेही समजण्याचे कारण नाही. इथे स्वार्थ आणि परमार्थाचे द्वंद उभे राहते. शेतीची बाजू घेऊन लढायचे असेल तर निष्ठा, प्रामाणिकपणा आणि कटिबद्धता महत्त्वाची असते. स्वतः शेतीवर राबून शेतीवर उपजीविका असणाऱ्याला शेतकरी म्हणता येईल; नव्हे तोच खराखुरा शेतकरी. पण शेतकरी असला म्हणजे तो समग्र शेतीच्या भल्यासाठी वैश्विकतेच्या भावनेतून सद्भावना बाळगून असतोच, शेतीचे प्रश्न सुटून समग्र शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे जीवन खेचून आणणारे व्यवस्था परिवर्तन व्हावे असा व्यापक विचार कत असतोच, असा गैरसमज करून घेण्याचेही कारण नाही. शेती कसणे हा त्याचा व्यवसाय आहे, कदाचित अन्य कोणतेच पर्याय त्याच्यासमोर उपलब्ध नसल्याने नाईलाजाने उपजीविकेचे साधन म्हणून शेती कसत राहणे व मरता येत नाही म्हणून जगत राहणे अथवा जगण्याच्या सर्व वाटा समाप्त झाल्या तर स्वतःचे जीवन संपवण्यास सिद्ध होणे, हीच एकंदरीत शेतकऱ्याची जीवनशैली झाली आहे, असेही म्हणता येईल.

मात्र शेतीची बाजू मांडायची असेल तर शेतकरी असणे किंवा नसणे फारसे महत्त्वाचे नाही. मागील ३० वर्षाचा इतिहास तपासला तर नेमके हेच आढळून येते. ज्यांच्याकडे सातपिढ्यापासून शेती नव्हती, शेतीच्या उत्पन्नावर उपजीविका अवलंबून नव्हती. शेतकऱ्यांच्या पोटी जन्मही घेतला नव्हता तरी त्यांनी ''शेतकऱ्याच्या आयुष्यात सुखाचा व सन्मानाचा दिव उजाडावा'' म्हणून घरादारावर तुळशीपत्र ठेवून शेतकरी आंदोलनात स्वतःला झोकून दिले होते, अनेकांनी स्वतःच्या आयुष्याची होळी आणि संसाराची राखरांगोळी केली होती, हजारो तुरुंगात गेले होते, हजारोंनी निधड्या छातीवर पोलिसांच्या लाठ्या झेलल्या होत्या. शेकडोंनी बंदुकीच्या गोळ्यांसमोर स्वतःची छाती आडवी धरली होती. मात्र त्याच वेळी स्वतःला शेतकरी म्हणवणारे करोडो शेतकरी पुत्र मात्र शेतकरी आंदोलनाशी प्रतारणा करत आपापल्या जातीच्या पुढाऱ्यांचे धोतर धूत बसले होते. हा अगदी ताजा इतिहास आहे.

विषय शेतकरी आंदोलनाचा असो किंवा शेती साहित्य चळवळीचा. वास्तव कटु असले तरी ते स्वीकारलेच पाहिजे. शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेतला नसला किंवा नावाने सात–बारा असला तरी तरी हा निकष लावून कोणत्याच निष्कर्षाप्रत पोचता येत नाही. फक्त सातबारा नावाने असला म्हणजे तो शेतकरी आंदोलक ठरत नाही; तद्वतच शेती साहित्यिकही ठरत नाही. संबंधित व्यक्तीची शेती विषयासोबत असलेली बांधिलकी, शेतीच्या अर्थवादाचा अभ्यास, कटिद्धता आणि प्रसंगी त्यासाठी सर्वस्व पणाला लावू शकणारी त्यागी वृत्तीच इथे महत्त्वाची; भले मग तो शेतकऱ्याच्या घरात जन्मलेला असो अथवा नसो! लेखणीतून व्यक्त होणारा आशय शेतीचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणारा आहे की शेतीचा प्रश्न आणखी किचकट करून शेतीच्या शोषकांना पोषक ठरणारा आहे यावरूनच साहित्यिकाची जातकुळी ठरवली गेली पाहिजे.




mahyco®
प्रत्येक बी अनमोल
शेतकऱ्यांचे हित हीच प्राथमिकता
सन १९६४ साली महिकोची स्थापना झाली व तेंव्हापासुनच शेती संशोधनावर भर दिलेला असुन आजतागायत ३० विविध पिकाच्या प्रकारात ११५ पेक्षा अधिक संकरीत बियाण्याचे वाण विकसित केले.
गत ५० पेक्षा जास्त वर्षांपासून, महिकोचा प्रयत्न शेतकऱ्यांसाठी उच्च दर्जेदार बियाणे निर्माण करण्यासोबतच अधिक उत्पादनाची हमी तसेच जैविक आणि अजैविक ताणाचे निराकरण करण्यास शेतकऱ्यांना मदत करणे हे होय. महिकोची विविध प्रकारची उत्पादने तसेच देशाच्या काना कोपऱ्यात पसरलेले विस्तृत जाळे, आमच्या १ कोटीहून अधिक शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविते.
शेतकऱ्यांची प्रगती ही एकच बांधिलकी जोपासण्याऱ्या महिकोचे पायाभूत तत्वज्ञान - शेतकऱ्यांचे हित हीच आमची परंपरा व विचारधारा.
बीज दमदार
उत्पन्न शानदार
महाराष्ट्र हायब्रीड सीडस् कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
ई-मेल : info@mahyco.com, वेब-साइट : www.mahyco.com
/MahycoSeeds
/MahycoIndia
/company/mahyco

# आम्ही लटिके ना बोलू

**– शरद जोशी**

वर्तमानपत्रांत, मासिकांत आपल्या जवळच्यापैकी कोणाचे नाव, फोटो छापून आले म्हणजे आपण केवढ्या कौतुकाने तो अंक मिळवितो, वाचतो, जपून ठेवतो! म्हणजे साहित्यात आपले, आपल्या ओळखीचे आपण शोधत असतो. मग, खरे म्हटले तर, शेतावर राबणाऱ्या आपल्या सगळ्यांच्या आयुष्याचे चित्रण, प्रतिबिंब आपण साहित्यात शोधायला पाहिजे.

दर वर्षी पावसाळा यायच्या आधी बी-बियाण्यांची जमवाजमव, खर्चासाठी सावकाराची मिनतवारी, सोसायटीतली कारस्थाने, भानगडी, पाऊस येतो किंवा नाही याची चिंता, आल्याचा आनंद, येत नसला तर पोटात उठणारा भीतीचा गोळा, पिकावर येणाऱ्या तणांच्या आणि रोगांच्या धाडी, पीक उभे राहिल्यावर होणारा आनंद, बाजारात गेल्यावरची शोकांतिका, वाढते कर्ज, पुढाऱ्यांची मग्रुरी, आग लागल्यावर घरातून निसटताना व्हावी तशी गावच्या आयुष्यातून सुटण्याची ज्याची त्याची स्वतःपुरती धडपड या किड्यांसारख्या जीवनात लिहिण्यासारखी प्रचंड सामुग्री आहे; पण ७० टक्के लोकांच्या आयुष्याचे प्रतिबिंब साहित्यात कधीच पडले नाही.

खुरपताना, गवत काढताना, पिके काढताना, जात्यावर दळताना शेतकरी स्त्रियांनी उत्स्फूर्त म्हटलेली गाणी माळरानातच विरून गेली; मोटेवर, नांगरावर बैलांच्या साक्षीने शेतकऱ्यांनी ढाळलेले दुःखाचे कढ तापलेल्या जमिनीतच जिरून गेले.

शेतकऱ्याची पिके लुटून नेलेल्या दरोडेखोरलुटारुंच्या तळांवर गायिली गेलेली उत्तान, उन्मत्त गाणी साहित्यात आली.

मोठ्या लुटारुंनी दरबार भरवायला सुरुवात केल्यावर त्यांचे कौतुक करणाऱ्या भट-शाहिरांची प्रतिभा गाजली, त्यांचे मनोरंजन करणाऱ्या कलावंतिर्णींच्या लावण्यांचा पूर आला, संगीताच्या मैफिली झडू लागल्या.

पिके लुटून पेठा, शहरे वसवणाऱ्या व्यापाऱ्यांच्या, कारकुनांच्या समाजाचे साहित्य तयार झाले. साहित्य असो, संगीत असो, कला असो– शेतकऱ्याचे असे त्यात काहीच नाही.

इतिहास जसा विजेते लिहितात तसेच साहित्य-संगीत-कला सुद्धा विजेत्यांच्याच असतात. आमचे काहीच नाही; मग आम्हाला लुटणाऱ्यांच्या लावण्या-तमाश्यांत आम्ही आपले मनोरंजन करून घेऊ लागलो; पण त्यात चंद्रकांत राजाच्या मुलीची कहाणी आली, शेतकऱ्याच्या मुलीची नाही.

मग, त्यातले त्यात जवळचे साहित्य आम्हाला संतांचे वाटू लागले. कुठेतरी देव आहे, स्वर्ग आहे, मुक्ती आहे; एका नामात गुंगले की सर्व दुःखाचा विसर पडतो; 'शेवटी, देहाच्या दुःखाचा विचार काय करायचा? आत्मा अमर आहे.' या दिलाशात गावोगाव 'रुप पाहता लोचनी'च्या भजनात आम्ही सुटका शोधू लागलो.

शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरांत रमली. त्यात लिहिण्याचे कसब असणाऱ्यांनी गावाविषयी लिहिले; पण, शहराला काय पटेल, काय आवडेल याचाच विचार करीत लिहिले. 'हरामखोरांनो! तुम्ही माझे गाव लुटले, या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल.' हा टाहो कोणी फोडला नाही. उलट, आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्य आघाडी उभी झाली. शेतकऱ्यांच्या दुःखाचं भांडवल करून त्यावर साहित्यक्षेत्रात स्थानाचा जोगवा मंडळी मागू लागली.

दूरदर्शन आता गावोगाव येईल. आज त्यावर अनेक कथा चालू आहेत. हमलोग, खानदान, ये तो है जिन्दगी, रजनी इत्यादि, इत्यादि. या 'हमलोग' मध्ये आम्ही लोक कुठेच नाही. खानदानी शेतकरी कुटुंब नाही, या जिन्दगीत आमचे आयुष्य कोठेच नाही. पाच टक्क्यांच्या आयुष्याच्या चित्रणाने ९९ टक्के दूरदर्शन भरला आहे; पण, आपल्या घरच्या लुटून नेलेल्या वैभवाने भरलेल्या त्यांच्या महालांचे आम्ही जिभल्या चाटीत कौतुक करतो; 'हे आमचे आहे' या विचाराने संतापून उठत नाही.

हे अपरिहार्य आहे. साहित्य गुलामांचे नसते, विजेत्यांचे असते. सगळ्या जगाकडे बघायचे झाले तर इंग्रजी वाङमयाच्या वैभवशाली दरबारात इंग्रजीची ऐट दाखवणाऱ्या इंडियन लेखकांना इंडियातील ग्रामीण साहित्यिकांइतकेसुद्धा स्थान नाही. ताकद साहित्याची नसते, ताकद त्यामागील समाजाच्या सधनतेची असते. युरोपातील देश आज इंग्रजी शिकत नाहीत, अमेरिकी शिकतात. आम्ही अक्षरशः गुलामांचे गुलाम आहोत.

शेतकरी संघटनेच्या कामाच्या ओघात माझ्या लक्षात आले की, शेतकऱ्यांची जीभ कापली गेलेली आहे. दुसऱ्या कुणाची तरी जीभ लावूनच त्यांना बोलता येते. (ग्रामीण साहित्यिक शहरी विद्वानांची जीभ लावतात, पुढारी मुंबईची जीभ लावतात. अगदी सोसायटीचा सेक्रेटरीसुद्धा तालुक्याची जीभ लावून बोलतो. शेतकऱ्याच्या जिभेने कोणीच बोलत नाही.)

आम्ही बाललेले जगात ऐकले जाईल अशी साधने आमच्याकडे नसतील, शेती लुटून औद्योगिकीकरण करणारी व्यवस्था संपेपर्यंत ती साधने आमच्याकडे येणारही नाहीत; पण तोपर्यंत आमची जीभ तोंडात सलामत ठेवली पाहिजे. शब्द कसेही येवोत – अशुद्ध, बोबडे, वेडेवाकडे, तालहीन, सूरहीन, सौंदर्यहीन– पण त्यांतला अर्थ हा आमच्या अनुभूतीचा प्रामाणिकपणा टिकवणारा पाहिजे. साहित्याच्या बाजारी 'मुंगी व्याली, शेळी झाली' वाङमयाला उठाव असला तरी निदान आमच्या आमच्यात तरी आमचा निश्चय 'आम्ही लटिके ना बोलू'.

आमची गुलामगिरी, आमचे नाकर्तेपण अर्थकारणातून राजकारणात गेले, समाजकारणात गेले; साहित्यात आणि संस्कृतीच्या क्षेत्रात एक कण जिवंत ठेवू शकलो तर त्या बीजातून शेतकरी आंदोलन यशस्वी झाल्यावर नव्या प्रामाणिक संस्कृतीचे तरू कोटी कोटी तयार होतील.

(शेतकरी संघटक २५ जुलै १९८५)

# फक्त ₹ १६,२०० भरा व ₹ ३,२४,००० चा जैन सोलर पंप बसवून* घ्या !



## महाराष्ट्र शासनाची (MSEDCL) अटल सौर कृषि पंप योजना

| सोलर सबमर्सिबल पंप | किंमत (रू./पंप) | शेतक-याचा वाटा 5 एकर पर्यंत (रू./पंप) | शेतक-याचा वाटा 10 एकर पर्यंत (रू./पंप) |
|---|---|---|---|
| 3000 वॅट (3 एच.पी. ए.सी.) | 3,24,000 | 16,200 | 48,600 |
| 3000 वॅट (3 एच.पी. डी.सी.) | 4,05,000 | 20,250 | 60,750 |
| 4800 वॅट (5 एच.पी. ए.सी.) | 5,40,000 | 27,000 | 81,000 |
| 4800 वॅट (5 एच.पी. डी.सी.) | 6,75,000 | 33,750 | 1,01,250 |
| 6750 वॅट (7.5 एच.पी. ए.सी.) | 7,20,000 | 36,000 | 1,08,000 |

**कराराप्रमाणे खाली नमुद केलेले सर्व शेतकरी या योजनेस पात्र आहेत.**

- धडक सिंचन योजनेअंतर्गत विहिरीचा लाभ घेतलेले/ लाभार्थी शेतकरी
- अतिदुर्गम भागातील शेतकरी
- महावितरण कंपनीतर्फे पैसे भरून प्रलंबित ग्राहकांपैकी ज्यांना तांत्रिक अडचणीमुळे नजीकच्या काळात वीजपुरवठा शक्य नाही असे शेतकरी
- प्रथम येणा-यास प्राधान्य देण्यात येईल.
- वैयक्तिक किंवा सामुदायिक शेतकरी व विहीरी यासाठी 3 एचपी क्षमतेपासून सोलर पंप गरजेप्रमाणे बसविता येतील.
- बोअरवेल असलेल्या शेतक-यांनाही ह्या योजनेचा फायदा घेता येईल.
- राज्यातील अकोला, अमरावती, वाशिम बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शेतकरी.
- विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नसलेल्या भागातील शेतकरी.




**अनुदानास पात्र 20 जिल्हे**

●अकोला ●अमरावती ●बुलढाणा ●बीड ●भंडारा ●वाशिम ●वर्धा ● नागपूर ●गोंदिया ●चंद्रपूर ●गडचिरोली ●जालना ●जळगाव ●उस्मानाबाद ●नाशिक ●नंदुरबार ●ठाणे ●रत्नागिरी ●यवतमाळ ●रायगड

संपूर्ण सोलर पंपींग संच बनविणारी एकमात्र कंपनी

आजमितीस भारतात २०,००० पेक्षा जास्त सोलर पंप कार्यरत

जैन सोलर पंप™

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जळगांव. फोनः ०२५७-२२५८०११, फॅक्सः २२५८१११; टोल-फ्रीः १८००५९९३०००,
ई-मेलः solarpump@jains.com; इंटरनेटः www.jains.com

*अटी लागू

**प्रथम येणा-या १०,००० शेतक-यांना शासनाकडून सोलर पंपासाठी ९५% अनुदान ५ एकरपर्यंत व ८५% अनुदान १० एकर पर्यंत उपलब्ध. कृपया जवळच्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळ (MSEDCL) कार्यालयास त्वरीत भेट द्या!**

कृपया अधिक माहितीसाठी जैन इरिगेशन प्रतिनिधींशी संपर्क साधावाः **बुलढाणा** : ९४२२७७६७८७, ९४२२७७४३९४; **अमरावती** : ९४२२७७६९४६, **यवतमाळः** ९४२२७७५९३६, ९४२२७७५६४१; **वाशिमः** ९४२२७७४३३५; **वर्धाः** ९४२२७७५९४०, ९४२२७७४७७३; **अकोलाः** ९४२२७७३८३७;**नागपूरः** ९४२२७७४२७१, ९४२२७७४५७३; **बीड / उस्मानाबादः** ९४२२७७३९०२, ९४२२७७४६१०; **भंडारा / गोंदीयाः** ९४२२७७३९९८, ९४२२७७४६८४; **जालनाः** ९४२२७७३९५२; **जळगांवः** ९४०३६९५८४५, ९४०४९५५३३४; **नाशिकः** ९४२२७७४१८९, ९४२२७७४७३८; **चंद्रपूर / गडचिरोली** : ९४२२७७४१५४, ९४२२७७४८८५; **नंदुरबारः** ९४२२७७४११४, ९४२२७७४८१७; **ठाणे / रायगड / रत्नागिरीः** ९४२२७७४२९२, ९८७०९९०७५३.

# राष्ट्रपिता महात्म्याला साकडे निवेदन

परमपुज्यनीय बापू,

आपण या देशातील सामान्यातील सामान्य जनतेला, शेतकरी व कष्टकरी ग्रामस्थांना स्वराज्य आणि सुराज्य मिळावे याकरीता वेगवेगळे आंदोलन व सत्याग्रह करून स्वातंत्र्य मिळवून दिले. भारताच्या दुर्दैवाने गोऱ्या इंग्रजांना घालविल्यानंतर आपण अधिक काळ जगू शकले नाहीत.

स्वातंत्र्यानंतर आलेल्या राज्यकर्त्यांनी आपली ग्रामस्वराज्याची व ग्रामविकासाची संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणली नाही. उलट ग्रामजन आर्थिक गुलामित टाकण्याचे धोरण आखले. ग्रामविकासाचे मर्म शेतीच्या आर्थिक विकासात आहे, गाव आर्थिक संपन्न झाला तर देश संपन्न होईल, या संकल्पनेचा विचार न करता भारतीय शेतकऱ्यांना शेतीविरोधी कायद्याच्या जाळ्यात बेमालुमपणे अडकविले. 'देशासाठी त्याग करा' असे सांगून आपल्या वैचारिक वारसदारांनी शेतकऱ्यांना अधिक पिकवायला सांगून आणि पिकविलेला शेतमाल नगण्य किंमतीत विकला जाईल याचा कायदेशीर बंदोबस्त करून शेतकऱ्यांना कर्जाच्या खाईत ढकलले. शेती व शेतकरी विरोधी कायदे करून व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करून गावात बचत उरणारच नाही अशी चिरेबंदी व्यवस्था निर्माण केली त्यामुळे ग्रामीण भारतात उद्योग उभारणी होऊ शकली नाही.

गेली ६५ वर्षे नवनवीन उद्योगांची चैत्रगौर मांडून देश बाह्यदर्शनी सजवल्याने अंतर्गत देश पोखरून 'शयनिंग इंडिया' विरूद्ध 'भकास भारत' असे चित्र निर्माण झाले. आर्थिक विकासाचा कणा असलेला देशाचा पोशिंद्याची बाजारातली आर्थिक पत संपल्याचे व त्याच्या समोरील जीवन जगण्याचे सर्व पर्याय संपल्याने आत्महत्या करायला लागला. शेतमालाचे उत्पादन खर्च भरून निघतील इतके भाव मिळेल अशी व्यवस्था करण्याऐवजी शेतमाल स्वस्तात स्वस्त लुटून सुट-सबसिडीचा खुळखुळा वाजवण्यात आला. एकजात सर्वच राजकीय पक्षांची भूमिका समसमानच राहिल्याने शेती हा तोट्याचा व्यवसाय व कर्जबाजारी शेतकऱ्यांची पिढी तयार करणारा कारखाना झाला. आर्थिक विषमतेच्या सतत रुंदावत जाणाऱ्या दरीमुळे आता भारत एकसंघ आणि अखंड राहिलेला नसून ''इंडिया आणि भारत'' असा विभागला गेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात विलायतेचा गुलाम असलेला भारत आता स्वातंत्र्योत्तर काळात इंडियाचा गुलाम झालेला आहे.

हे राष्ट्रपित्या,

शेतीचे आर्थिक स्वातंत्र्य समाजवादाच्या सोनेरी पिंजऱ्यात कैद करून ग्रामसुराज्याची संकल्पना पायदळी तुडविणाऱ्या सर्व राजकीय पक्षांची आम्ही तुमच्याकडे तक्रार दाखल करत आहोत.

- ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संपूर्ण उत्थानासाठी युगात्मा शरद जोशी प्रणीत भारत उत्थान कार्यक्रम (मार्शल प्लॅन) अंमलात आणण्यासाठी....
- शेती व शेतजमिनीसंबंधी दंडाबेडी ठरलेले समाजवादी कायदे (१) कमाल जमीन धारणा कायदा व सिलिंग कायदा (२) आवश्यक वस्तूंचा कायदा (३) सक्तीचा जमीन अधिग्रहण कायदा रद्द करण्यासाठी...
- शेतीसंबंधी बाजार व प्रक्रियेतील सर्व अडथळे काढून शेतमालाला योग्य बाजारभाव मिळण्यातील हस्तक्षेप संपवण्यासाठी....
- ग्रामीण क्षेत्रासाठी रस्ते, वीज, पाणी साठवणूक व प्रक्रिया वातूक, विपणन, माहिती तंत्रज्ञान व प्रयोगशाळा आदी आवश्यक संरचना निर्माण करण्यासाठी....
- ''तूट नसतानाही आयात व मुबलकता असतानाही निर्यातबंदी'' या शेतकरी विरोधी नितीचा विरोध करण्यासाठी....
- पूर्ण दाबाची पूर्ण वेळ वीज, मागेल त्याला तात्काळ नवीन वीज जोडणी, वीज बिलातून शेतकऱ्यांची सरसकट वीज बिल मुक्ती मिळण्यासाठी...
- उच्चशिक्षितांची वाढती बेरोजगारी लक्षात घेता ग्रामीण युवकांना शेती व्यवसायातूनच रोजगारांच्या संधी उपलब्ध होण्यासाठी शेतीमध्येच भांडवलनिर्मिती होऊ शकेल असे शेती अनुकूल धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी....
- देशाची उन्नती होण्याकरीता अंतर्गत बाजारपेठेचा विकास होणे गरजेचे असते. भारत भकास ठेऊन देशाचा विकास करू पाहणाऱ्या अर्थनितीचा लगाम खेचण्यासाठी...
- शेतकऱ्यांना संपत्ती बाळगण्याचा मूलभूत अधिकार प्रदान करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ संविधानाची पुनर्स्थापना करण्यासाठी....

यासाठी, ''सब राजकीय दलोंको सन्मती दे भगवान'' अशी प्रार्थना करून तूच शेतकऱ्यांना आणि पर्यायाने या देशाला वाचव, असे समस्त भारतीय शेतकऱ्यांचे आर्जव तुमच्या चरणी गाऱ्हाणे स्वरूपात सादर करत आहोत.

समस्त भारतीय शेतकऱ्यांच्या वतीने : सौ. सरोजताई काशीकर, अनिल घनवट, गंगाधर मुटे, सौ. शैलजा देशपांडे, सौ. गीता खांदेभराड, सतीश दाणी, सिमा नरोडे, मदन कामडी, गोविंद जोशी, सौ. अंजली पातुरकर, सरदार भुपेंद्रसिंग मान, किसान सुब्रतो त्रिपाठी आणि समस्त शेतकरी संघटनेचे पाईक.



**दि. ३० जानेवारी २०१७ – महिलांची प्रचंड उपस्थिती**

बापू कुटी समोर शेतकरी संघटनेच्या नेतृत्वात ३० जानेवारी २०१७, सोमवारी दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत संपन्न झालेल्या शेतकऱ्यांचे महात्म्यांना साकडे या आंदोलनात सांगली, सातारा व सोलापूर हे तीन जिल्हे वगळता संपूर्ण महाराष्ट्रातून ३००० हजार शेतकरी उपस्थित झाले होते. सभेच्या सुरुवातीला दोन मिनिटे उभे राहून बापूंना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बापूंच्या आवडीचे ''रघुपती राघव राजाराम'' आणि ''वैष्णव जन तो तेने कहिये'' या भजनांचे दत्ता राऊत आणि संच यानी गायन केले त्यास उपस्थितांनी आवाजात आवाज मिसळून तालासुरात सामुहिक गायन केले. साकडे आंदोलनाची रूपरेषा विशद करण्यासाठी झालेल्या सभेत सतीश दाणी, मदन कामडे, सिमा नरोडे, गीता खांदेभराड, ॲड. दिनेश शर्मा, मध्यप्रदेशचे किसान सुब्रतो त्रिपाठी, किसान समन्वय समितीचे अध्यक्ष, माजी खासदार भुपेंद्रसिंग मान, सरोजताई काशीकर, ॲड. वामनराव चटप, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल घनवट यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक वर्धा जिल्हा शेतकरी संघटना अध्यक्ष गंगाधर मुटे यांनी तर संचालन प्रा. पांडुरंग भालशंकर यांनी केले.

स्वतः शतेकरी संघटनेच्या कामकाजात प्रत्यक्ष भाग न घेता निःस्वार्थीपणे कौटुंबिक जबाबदारी सांभाळत कुटुंबातील दुसऱ्या सदस्यांना कौटुंबिक जबाबदारीपासून मोकळीक देत व शेतकरी संघटनेच्या पूर्णवेळ कार्यासाठी प्रोत्साहन देत पडद्यामागे राहून कार्य करणाऱ्या व्यक्तींना यथोचित सत्कार म्हणून ''कृतज्ञता पुरस्कार'' देण्याचा नांदेड येथे संपन्न झालेल्या शेतकरी संघटनेच्या १३ व्या संयुक्त अधिवेशनाच्या आयोजक समितीने निर्णय घेतला होता. त्यानुसार पहिला पुरस्कार सौ. शालुताई सुरेंद्र काशीकर यांना प्रदान करण्यात आला.



**शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचा व सन्मानाचा दिवस येईपर्यंत सतत लढत राहण्याची बापूंच्या समोर शपथ घेताना.**




**शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल घनवट संबोधित करताना.**



**बापूंना साकडे निवेदन देण्यासाठी आश्रमात महिलांनीही अशी गर्दी केली.**



**बापूंच्या आसनाला साकडे निवेदन सादर करण्यात आले.**




**शालुताई काशीकर यांना सरदार भुपेंद्रसिंग मान ''कृतज्ञता पुरस्कार'' प्रदान करताना.**

**क्षणचित्रे :**

✻ सरकारला जागविण्यासाठी सेवाग्राम येथून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. १ आणि २ मार्च रोजी राज्य कार्यकारिणीची बैठक होईल. त्यात जिल्हा पातळीवरील आंदोलनांची घोषणा होईल.

✻ आंदोलनाच्या पुढील टप्प्याची सेवाग्राम ते साबरमती अशी रॅली काढून करण्यात येणार आहे.

✻ दूरवरचे कार्यकर्ते सकाळपासूनच कार्यक्रमस्थळी पोहोचायला लागल्याने आश्रम परिसर फुलायला लागला होता.

✻ शेतकरी कार्यकर्त्यांची शिस्तबद्धता स्थानिक जनतेच्या कुतूहलाचा विषय झाला होता.

✻ अपेक्षेपेक्षा जास्त चांगला प्रतिसाद मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नव्याने उत्साह संचारल्याचे जाणवत होते.

**(वार्तांकन – गुरुराज राऊत)**

# श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली

र.नं. ई–12(सी)

## शुभेच्छा जाहिरात

### संचालक मंडळ

अध्यक्ष



श्री अनिल ज. म्हशाखेत्री पाटील

सचिव



श्री देवराव म. पाटील म्हशाखेत्री

उपाध्यक्ष




श्री कवडूजी क.पाटील भोयर

सहसचिव



श्री दादाजी ना.चाफले

सदस्य



श्री अरुण ते. पाटील मुनघाटे

सदस्य



श्री लालाजी सु.पाटील राऊत

सदस्य




श्री नरेंद्र रा.पाटील म्हशाखेत्री

सदस्य



श्री गोविंदराव वि.बानबले

सदस्य



श्री ॲड.शेखर चु.मुनघाटे

स्विकृत सदस्य



श्री खुशालराव या. वाघरे

### संस्था संचालित घटक संस्था

● शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली ● कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय, चामोर्शी ● ॲड. एन.एस. गंगुवार शिक्षण महाविद्यालय, गडचिरोली ● जे.टी. पाटील डी.टी.एड. कॉलेज, गडचिरोली ● शिवाजी हायस्कूल, गडचिरोली ● शिवाजी हायस्कूल, चामोर्शी ● शिवाजी हायस्कूल, कुरखेडा ● शिवाजी हायस्कूल, पोर्ला ● शिवाजी हायस्कूल, मौशीखांब ● शिवाजी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली ● शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, चामोर्शी ● शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, कुरखेडा ● शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, पोर्ला ● माध्यमिक आश्रम शाळा, गिरोला, ● तुळजाबाई प्राथमिक शाळा, गडचिरोली ● कर्मचारी महिला वसतीगृह (गोकूलनगर) गडचिरोली ● शिवाजी इंग्लीश अकॅडमी स्कूल (गोकूलनगर) गडचिरोली

### संस्थेची वैशिष्ट्ये

● नर्सरीपासून ते पदव्यूत्तर शिक्षणापर्यंतची उत्तम सोय.

● व्यावसायिक शिक्षणाचीही उत्तम सोय.

● संस्थेच्या प्रत्येक घटक संस्थेला स्वतःची सुसज्ज इमारत, प्रशस्त पटांगण व क्रीडांगण, सर्व विषयांच्या स्वतंत्र प्रयोगशाळा, ग्रंथालये, संगणक प्रयोगशाळा.

● जिल्हा मुख्यालयाच्या शाळेत ई–लर्निंगची सुविधा.

# वेदनेचे रुपांतर हिंसेपेक्षा कवितेत करणे कठीण असते



तिसऱ्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे उद्घाटक थोर समाजसेवक डॉ. अभय बंग, प्रमुख पाहुणे ज्येष्ठ समीक्षक, कादंबरीकार डॉ. किशोर सानप, या संमेलनाचे स्वागताध्यक्ष मा. शालिक पाटील नाकाडे, विशेष अतिथी मा. संजय पानसे, गडचिरोलीच्या प्रथम नागरिक, नगराध्यक्षा मा. सौ. योगिताताई पिपरे आणि या संमेलनाची मुहूर्तमेढ ज्यांनी रोवली ते शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते, कवी अ.भा. शेतकरी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर मुटे. उपस्थित सर्व साहित्यिक, साहित्य प्रेमी नागरिक आणि माझ्या शेतकरी भावांनो आणि माय बहिणींनो. गेल्या तीन वर्षापासून गंगाधर मुटे आणि त्यांचे सर्व सहकारी अतिशय परिश्रमपूर्वक या शेतकरी साहित्य संमेलनाचे आयोजन करीत आहेत. या पूर्वीच्या दोन्ही संमेलनांना मी उपस्थित होतो. पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष मा. शरद जोशी होते. ते स्वतः जरी प्रकृती अस्वास्थामुळे त्या संमेलनास उपस्थित राहू शकले नाहीत, तरी त्यांचे अध्यक्षीय भाषण आपणासाठी दिशादर्शक होते. दुसऱ्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक रा.रं. बोराडे यांची निवड झाली आणि आज तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड करून, माझा जो बहूमान केला आहे, त्याबद्दल संयोजकांचे आणि आपणा सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

**तिसरे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, गडचिरोली**

**अध्यक्षीय भाषण**

उद्घाटक म्हणून डॉ. अभय बंग यांना निमंत्रित करून आपण मोठे औचित्य साधले आहे. १९८० च्या डिसेंबर मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील मेटीखेडा येथे छात्र-युवा संघर्ष वाहिनीच्या कार्यकर्त्यांची बैठक चंद्रकांत वानखेडे यांच्या घरी झाली. शरद जोशी आणि शेतकरी संघटना या बाबत आपण काय भूमिका घ्यावी यासाठी ती दोन दिवसांची बैठक होती. त्या बैठकीसाठी दोन्ही दिवस डॉ. अभय बंग उपस्थित होते. तिथूनच वाहिनीच्या लोकांनी शेतकरी संघटनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. अशोक बंग ज्यांनी एम.एससी. (ॲग्री) केलेलं आहे आणि शेतीच्या क्षेत्रात त्यांनी काही काम करण्याचा तेव्हा निर्णय घेतला होता. चेतना विकास अशी काही त्यांची तेव्हाची संकल्पना होती. मी स्वतः देखील तेव्हा बाबा आमटे वगैरेंच्या रचनात्मक कामामुळे अशा स्वरुपाच्या कामाकडे आकर्षित झालो होतो. पण शरद जोशी नावाचा झंझावात त्यावेळी ईतका जबरदस्त होता की मी तिकडे वळलो. हृदयरोग हा काही उगिचच्या उगीच कुणास जडत नाही. ''माझा साक्षात्कारी हृदयरोग'' हे पुस्तक, पुस्तक रुपाने येण्या अगोदर साप्ताहिक सकाळच्या दिवाळी अंकातून जेव्हा आले तेव्हाच हा माणूस कुठेही असला तरी आपला सहोदर आहे, याची खात्री पटली होती. हृदयरोग जडण्यासाठी केवळ दुधावरील साय कारणीभूत नसते. तर ज्या समाज जीवनामध्ये आपण जगावेगळे काही करू पाहतो तेव्हा या समाजातील काही घटकाकडून आपणास होणारा मानसिक त्रास आपणास या रोगाच्या दारात लोटतो हे आपले निरीक्षण इथल्या प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कितीतरी जणांच्या आयुष्याचे गुपित सांगून गेला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आपण 'मी येऊ शकत नाही' म्हणालात. त्याची चर्चाही महाराष्ट्रभर झाली. आपण येथे आलात आमच्या संमेलनाची उंची आपणामुळे किती तरी वाढली. हे मला येथे नमूद केले पाहिजे.

मानवी जीवन हे अतिशय सुंदर आहे. ते अधिक सुंदर करण्याचे काम साहित्य आणि इतर कला प्रकार करीत असतात. प्रतिभावंत जरी निसर्गतःच जन्माला यावा लागत असला तरी, त्याच्याकडून जी साहित्य निर्मिती होते ती त्या त्या काळाची देखिल अपत्य असते. सभोवतालची सामाजिक परिस्थिती, तत्कालीन वैचारिक प्रवाह, राजकीय वातावरण, आर्थिक क्षेत्रातील उलाढाली आर्थिक,

सामाजिक विषमतेविरूद्ध उभ्या राहिलेल्या चळवळी, लोकांच्या मनातील असंतोष, उद्रेक, वाचकांची अभिरूची या बाबींचा देखिल परिणाम त्या त्या काळात लिहिल्या जाणाऱ्या साहित्य निर्मितीवर होतो.

महाराष्ट्रात १९८० च्या सुमारास शरद जोशी यांनी ''शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव'' या एक कलमी मागणीवर शेतकरी आंदोलन सुरू केले. आधी कांदा, ऊस, तंबाखू. नंतर कापूस, ज्वारी, भात या पिकांच्या रास्त भावासाठी अभूतपूर्व आंदोलनं झाली. शेतकरी संघटना आणि शरद जोशी हे नाव जाती, धर्म, पंथ, भाषा, प्रांत यांच्या सीमा तोडून सर्व दूर पोहोचले. स्वातंत्र्य चळवळी नंतरची स्वतंत्र भारतातील शेतकरी स्त्री-पुरुषांचा प्रचंड मोठा सहभाग असलेली ही चळवळ ठरली. या चळवळीचा मोठा परिणाम येथील साहित्य निर्मितीवर ही झाला आहे. येथे जेव्हा शेतकरी संघटनेचे शेतीमालाच्या रास्त भावासाठी आंदोलन सुरू झाले तेव्हा त्याच्या आसपासच १९७७ पासून महाराष्ट्रातील खेड्यातील शेतकरी शेतमजूर कुटूंबात जन्मलेल्या पण शिक्षणाच्या, नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने खेड्यातून बाहेर, शेतीतून बाहेर पडलेल्या आणि साहित्य निर्मिती करू लागलेल्या काही साहित्यिकांनी एकत्र येऊन ''ग्रामीण साहित्य परिषद'' स्थापन केली. या परिषदेच्या वतीने प्रथमच महानगरांच्या बाहेर, महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी स्वतंत्र ग्रामीण साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यात येऊ लागले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर तेव्हा ग्रामीण साहित्यिक आणि ग्रामीण साहित्य यांना पुरेसा न्याय दिला जात नाही ही एक तेव्हाची तात्कालिक भावना, तर दुसरे अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण साहित्य हेच या भूमितले, खरे मध्यवर्ती साहित्य आहे. तथाकथित शहरी प्रस्थापित वाङमयीन प्रवाहातील साहित्यापेक्षा आमच्या वाङमय निर्मितीच्या प्रेरणा या वेगळ्या आहेत. अधिक नैसर्गिक आहेत. आमच्या वाङ्मय निर्मितीचे प्रयोजन ही वेगळे आहे. तेव्हा आता हा सवता सुभा अपरिहार्य आहे. मुख्य म्हणजे हे शोषितांचे, वंचितांचे साहित्य आहे. आमची अधिक जवळीक असेल ती दलित साहित्य, आदिवासींचे साहित्य यांच्याशी.

गेल्या शतकातील ऐंशीचे दशक हे देशभरातील शेतकऱ्यांच्या आंदोलनांनी ढवळून निघाले. कर्नाटकात प्रो. नजुंडस्वामी, तामीळनाडूत नायडू, उत्तर प्रदेशात महेंद्रसिंग टिकैत, महाराष्ट्रात शरद जोशी. या सर्वांपेक्षा महाराष्ट्रातील शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतीमालाच्या रास्त भावासाठीचे आंदोलन हे ऐतिहासिक दृष्ट्या अधिक महत्त्वाचे ठरले. भारतातील गरिबीचे मुख्य कारण हे इथल्या न परवडणाऱ्या कोरडवाहू शेतीत दडलेले आहे. त्या संबंधीची शास्त्रशुद्ध मांडणी त्यांनी केली. शेतकऱ्यांचे लाचारीचे जिणे संपावे आणि त्यालाही देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने आणि सुखाने जगता यावे, यासाठी स्वतःचे संपूर्ण आयुष्य पणास लावले. सुरुवातीचा उठाव होऊन आज छत्तीस-सदतीस वर्षे होऊन गेली. वेगवेगळ्या शेतकरी आंदोलनात बावीस ते पंचवीस शेतकऱ्यांनी हौतात्म्य पत्करले. शेतकरी महिला आघाडीची बांधणी आणि १९८६ च्या नोव्हेंबर मधील चांदवडचे शेतकरी महिलांचे अभूतपूर्व अधिवेशन. त्यातून निर्माण झालेले ''स्त्रियांचा प्रश्न : चांदवडची शिदोरी'' हे स्त्रियांच्या प्रश्नाविषयी सैद्धांतिक मांडणी करणारे पुस्तक. या सर्वांमुळे काही महत्त्वाची विचारी माणसं शेतकरी संघटना आणि शरद जोशी यांच्याकडे आकर्षित झाली. डॉ. गेल ऑम्वेट, कॉ. शरद पाटील, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. विद्युत भागवत, दिल्लीच्या 'मानुषी' च्या संपादक मधूकिश्वर ईत्यादी. महाराष्ट्राच्या ग्रामीण समाज जीवनात काही मोठे बदल या चळवळीमुळे घडून आले. डॉ. य.दि. फडके, डॉ. द.ना. धनागरे यांच्या सारखे सामाजिक शास्त्रे व अर्थकारणाचे अभ्यासक या चळवळी विषयी आस्था दाखवू लागले. श्री.ग. माजगावकर, विजय परूळकर, विनय हर्डीकर असे शहरी विचारवंत पत्रकार या चळवळीकडे आकृष्ट झाले. जयप्रकाश नारायण यांनी सत्तरच्या दशकात जो संपूर्ण क्रांतीचा नारा दिला आणि मोठे देशव्यापी युवक आंदोलन ज्यातून उभे राहिले. त्यातूनच पुढे छात्र-युवा संघर्ष वाहिनीचा जन्म झाला. त्या आंदोलनातून पुढे आलेली एक कार्यकर्त्यांची मोठी फळी शेतकरी संघटनेत आली. चंद्रकांत वानखेडे, अमर हबीब, सुधाकर जाधव, प्रकाश बोनगिरे, किशोर देशपांडे हे त्यातील काही प्रमुख नावे शेतकरी संघटनेच्या वैचारिक घडणीमध्ये आणि नैतिकतेमध्ये या सर्वांचे योगदान मोठे महत्त्वपूर्ण आहे.

साहित्याचा प्रांत देखिल या चळवळीपासून दूर राहणे शक्यच नव्हते. ज्या साहित्यास 'ग्रामीण साहित्य' म्हणून ओळखले जाते. त्या साहित्याची चळवळ म्हणून ज्यांनी मुहूर्तमेढ रोवली त्याचे अध्वर्यू डॉ. आनंद यादव, रा.रं. बोराडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. द.ता. भोसले, प्रा. भास्कर चंदनशीव, डॉ. वासुदेव मुलाटे हे जरी समोर दिसत असतील तरीही त्यांच्या सोबत सर्वदूर महाराष्ट्रातील नव्याने लिहू लागलेले असंख्य कथा, कादंबरीकार आणि कवी समीक्षक होते. महात्मा जोतीराव फुले ते शरद जोशी हा एक शेतकऱ्यांच्या बाजूने विचार मांडणारा वैचारिक अनुबंध आहे. त्याचा आपआपल्या परिने व कुवतीनुसार अन्वयार्थ लावून साहित्य निर्मिती करण्याची परंपरा मराठीत उदयास आली आहे.

इ.स. १८१८ साली पेशवाई बुडाली. मराठ्यांचे राज्य नष्ट झाले. इंग्रजांची सत्ता आली. तेव्हा पासूनच शेतकऱ्यांवरील

अन्याय अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. १८२४ साली रामोशांचे बंड घडवून आणणारा उमाजी नाईक ज्यास ब्रिटीश सरकारने फाशी दिली. तिथपासून ते १८७५ साली अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केलेला उठाव दख्खनचे दंगे म्हणून हा उठाव इतिहासात प्रसिद्ध आहे. यात त्रासलेल्या शेतकऱ्यांनी मारवाडी, गुजर, सावकारांच्या घरावर दरोडे घातले. सावकारांची मालमत्ता लुटली. गहाण खते जाळून टाकली.

म. फुले यांनी १८८३ साली 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहिला. त्यास या दःखनच्या दंग्यांची पार्श्वभूमी होती. पण महाराष्ट्रातील विचारविश्वात म. फुले यांनी सामाजिक आणि स्त्री प्रश्न विषयक जे विचार मांडले आणि कृती केली. त्याची जेवढ्या प्रमाणात दखल घेतली, तेवढी दखल त्यांनी शेतकऱ्यांच्या स्थिती गती विषयी आणि त्यांच्या प्रश्नाविषयी जे विचार मांडले. कृती केली त्याची दखल दुर्दैवाने म्हणावी तेवढी घेतली नाही. म्हणूनच म. फुले यांच्या ''शेतकऱ्याचा आसूड'' मधील बारा बैलांचा बारदाना असणारा, शेतसारा थकल्याने आणि मारवाडी गुजरांची देणी थकल्याचे बेजार झालेला चाळीशीतील शेतकरी. या सर्वातून सुटका व्हावी म्हणून कण्हेरीच्या मुळ्या वाटून पिऊन जीव देण्याचा विचार करतो. आज सव्वाशे ते दिडशे वर्षे उलटली. स्वातंत्र्याची ही सत्तर वर्षे झाली. आज तोच शेतकरी सरळ जीव देऊन मोकळा होत आहे.

शेतकऱ्यांच्या जगण्याचे वास्तव चित्रण करणारा पहिला कवी म्हणजे संत तुकाराम. ज्यांनी इथल्या शेतकऱ्याचे म्हणजे स्वतःचेच जगणे अभंगाच्या द्वारे महाकाव्याच्या रुपात मांडले. संत तुकारामानंतर थेट म.फुलेच भेटतात. तेव्हाच्या शेतकऱ्याच्या स्थितीचे वर्णन करणारा ''शेतकऱ्याचा आसूड'' मधील हा उतारा. ''खुल्या जमिनीवर एक जख्ख झालेली म्हातारी खालीवर पासोडी घालून कण्हत पडली होती. तिच्या उशाशी थोड्याशा साळीच्या लाह्या व पितळीखाली वाटीत वरणाच्या निवळीत जोंधळ्याची भाकर बारीक कुस्करून केलेला काला व पाणी भरून ठेवलेला तांब्या होता. शेजारी पाळण्यात ताण्हे मुल टाहो फोडून रडत पडले आहे. या शिवाय कोठे मुलाच्या मुताचा काळा ओघळ गेला आहे. कोठे पोराचा गू काढल्यामुळे लहानसा राखेचा पांढरा टक्का पडला आहे. कित्येक काने कोपरे चुना तंबाखू खाणाऱ्यांनी पिचकाऱ्या मारून तांबडे लाल केले आहेत. एका कोपऱ्यात तिघी-चौघीचे भले मोठे जाते रोविले आहे. दुसऱ्या कोपऱ्यात उखळा शेजारी मुसळ उभे केले आहे आणि दाराजवळील कोपऱ्यात केरसूणी खाली झाडून लावलेल्या कचऱ्याचा ढिग साचला आहे; ज्यावर पोराची गांड पुसून चिंधी लोळत आहे.'' म. फुले हे केवळ रूक्ष विचार मांडणारे गद्य विचारवंतच नव्हते, तर अतिशय हृद्य वास्तव चित्रित करणारे उच्चकोटीचे प्रतिभावंत साहित्यिक देखिल होते. म. फुले आणि शरद जोशी या दोघातील हे साम्य फार महत्त्वाचे आहे.

१९८० साली पहिल्यांदाच शरद जोशींनी शेतकरी संघटनेचा विचार गावोगाव जाऊन जाहीर सभातून मांडायला सुरुवात केली. त्याचा परिणाम प्रत्यक्ष लिहिणाऱ्या लेखकांच्या लेखनावर फार नंतर झाला. पण त्या काळात आपण ज्यांच्या साठी हे काम करीत आहोत त्या शेतकऱ्यांमध्ये वाचन संस्कृती नाही. तेव्हा प्रत्यक्ष त्यांच्यात जाऊन बोलणे हाच पर्याय शरद जोशींनी निवडला. त्या सभामधील सुरुवातीच्या काळातील माधवराव खंडेराव मोरे यांची भाषणं म्हणजे मौखिक साहित्याचा उत्कृष्ट नमुना होती. प्रत्येक सभेत शरद जोशींच्या नंतर ते बोलायला उभे राहत. दोन्ही हात कमरेवर ठेवित आणि शरद जोशींच्या अभ्यासपूर्ण शास्त्रीय स्वरुपाच्या आर्थिक मांडणीस आपल्या स्वतःच्या आयुष्यातील शेतकरी म्हणून आजवर आलेल्या अनुभवांची जोड देऊन, त्या विचारांचे रुपांतर समोर जमलेल्या शेतकरी समुदायाच्या काळजास हात घालणाऱ्या भाषेत करीत असत.

माधवराव खंडेराव मोरे यांच्या भाषणातील काही अंश असे असायचे, ''शेतकऱ्यांची अशा प्रकारे गेली तेहतीस वर्षे फसवणूक केली जात आहे. हे समजल्यापासून मला वेड लागायची पाळी आली आहे. या शेतीच्या धंद्यात माझी बत्तीस वर्षे गेली आहेत. असं वाटायचं आज जमलं नाही उद्या जमेल, आज भलं झालं नाही उद्या भलं होईल, या वर्षी नाही साधलं पुढच्या वर्षी साधेल. या आशेवर बत्तीस-तेहतीस वर्ष निघून गेली.... जेव्हा शरद जोशी भेटले आणि त्यांनी सांगितलं की, सरकारनं असं ठरवलं आहे की शेतकऱ्याला त्याच्या मालाचे भाव परवडतील असे द्यायचे नाहीत.... आणि त्यांनी जेव्हा लेखी पुरावा दाखवला, सरकारचं हे अधिकृत धोरण आहे असं मला समजलं.... तेव्हा पासून दुःख पोटात मावत नाही.'' कुठल्याही विद्रोही कवितेतील त्वेषापेक्षा हा त्वेष पराकोटीचा तीव्र होता. समोरचा शेतकरी गलबलून जायचा. राजकीय पक्ष आणि त्यांचे पुढारी हादरले. शरद जोशी विषयी पातळी सोडून बोलायला लागले. ''या शरद जोशींना काय शेतीतलं कळतं? आम्ही स्वतः शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलो. कुणा जोशी, कुलकर्णी, दांडेकरांनी आम्हाला शेतीचं अर्थकारण समजावून सांगू नये. ज्यांच्या सात पिढ्यात कुणी शेती केली नाही, ते आज शेतकऱ्यांना शहाणपण शिकवायला लागले.'' असं म्हणू लागले. तेव्हा त्यांची हजेरी माधवराव खंडेराव मोरे अशा शब्दात घेत, ''शेतकरी संघटनेचा नाश करायला कुणी मारवाडी, गुजराती किंवा ब्राह्मण टपलेला

नाही! हे तुमच्या आमच्या अवलादीचेच लोक डूख धरून राहिलेत! ज्यांच्या खांद्यावर आम्ही विश्वासाने मान टाकली, त्यांनीच आमची मान कापली. शरद जोशींनी आमचे डोळे उघडल्यानंतर आम्ही यांच्याकडे शेतीमालाला भाव मागू लागलो, तर यांची धोतरं निसटू लागली. यांच्या पायाखालची जमीन हादरली. आता आपल्याच अवलादीचे लोक आपल्यावरच उलटलेत.''

त्यापूर्वीही आम्ही अनेक नेत्यांची जाहीर सभेतील भाषणं ऐकली होती. विशेषतः आणिबाणी उठल्यानंतर जे विरोधी पक्षांचे नेते, काही विचारवंत, साहित्यिक बोलत असत. अनेक वर्तमान पत्रांचे संपादक अतिशय जहाल अग्रलेख लिहीत असत. काही दलित आत्मकथनं ही तोवर आली होती. पण कुठेही वाचायला मिळाली नव्हती अशी दाहक भाषा आम्ही प्रथमच ऐकत होतो. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन माझ्या पिढीने काही पाहिले नाही. आचार्य अत्र्यांची भाषणं ऐकली नाहीत. पण तेव्हा लोक म्हणायचे, माधवराव खंडेराव मोरेंच्या भाषणांनी आचार्य अत्रेंच्या भाषणांची आठवण येते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही बरीचशी भाषिक अस्मिता. भौगोलिक, ऐतिहासिक अस्मितेशी निगडीत होती. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने शेतकऱ्यांच्या आर्थिक पिळवणूकीस हात घातला. ते अनुभव आणि ती भाषा एका शेतकऱ्याची, म्हणून शेतकऱ्यांना अधिक जवळची होती. शेतकरी आंदोलनात उतरलेल्या बहुसंख्य शेतकऱ्यांचे औपचारिक शिक्षण अत्यल्प. कित्येक तर अशिक्षित. अनेक वर्षे परदेशात राहून आलेले शरद जोशी, त्यांनी कुठल्याही सभेत किंवा चर्चेत चुकूनही कधी एखादा इंग्रजी शब्द वापरल्याचे आठवत नाही. अत्यंत सोप्या, सुटसुटीत भाषेत त्यांनी संवाद साधला. लहान लहान वाक्यं अल्पाक्षरी म्हणता येईल अशी भाषाशैली मात्र अतिशय भेदक आशय. हे त्यांच्या मराठी भाषेचे वैशिष्ट्य. भल्या भल्या साहित्यिकांना हेवा वाटावा अशी भाषा त्यांनी घडवली. तर माधवराव खंडेराव मोरे हे थेट शेतकऱ्यांच्याच भाषेत बोलायचे. या दोघांच्याही मराठी भाषेचे वाङमयीन मूल्य खूपच उच्च दर्जाचे आहे. इतक्या उच्च प्रतीचे लोकप्रबोधन स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रात, विशेषतः खेड्यातील लोकांचे त्या आधी केव्हा घडून आले असेल यावर विश्वास बसत नाही.

शेतकरी संघटनेचे आंदोलन ऐन बहरात होते. हा विचार भाषा आणि प्रांतांच्या सीमा ओलांडून सर्व देशभर पोहचत होता, तेव्हा महाराष्ट्रात ग्रामीण साहित्य चळवळ देखिल जोरात होती. बहुतेक ग्रामीण साहित्यिक शेतकरी कुटूंबातून आलेले. शेतकरी संघटनेच्या चळवळी विषयी नैसर्गिक ओढ आणि आस्था असणारे. तेव्हा त्यांनी प्रत्यक्ष शेतकरी संघटनेचा बिल्ला लावून या चळवळीत सहभागी व्हावे किंवा शेतकरी संघटनेच्या विचारांचा प्रसार, प्रचार करणारे साहित्य त्यांनी लिहावे, इतका संकूचित आणि दोघांसाठीही हाणीकारक दृष्टीकोन कधी शेतकरी संघटनेने बाळगला नाही. अपेक्षा इतकीच बाळगली की, आजवर मराठी साहित्यात शेतकऱ्याचा चेहरा का दिसत नाही? जो दिसतो तो एकतर खलनायक, बेरकी, शेतमजूरांची पिळवणूक करणारा. बेदरकार, बेमुर्वतखोर नाहीतर अतिशय बावळट, भित्रा, अडाणी, अंधश्रद्धाळू, भोळा-भाबडा. हे असं का? आजवर खेड्यातील लोकांविषयी, विशेषतः शेतकऱ्यांविषयी जे लेखन झाले, ते शहरी. नागर वाचकांची अभिरूची लक्षात घेऊन. त्यांना काय आवडते काय भावते याचा विचार करून. तर यापुढे तरी किमान हे असे घडू नये. शेतकऱ्याचे वास्तव जगणे साहित्यातून यावे. या करिता ग्रामीण साहित्यिक आणि शेतकरी संघटनेने एकत्र यावे, विचारांचे अदान प्रदान व्हावे म्हणून अनेकदा प्रयत्न झाले आहेत. ऑगस्ट १९८३ मध्ये आम्ही परभणीच्या मराठवाडा कृषी विद्यापीठात ग्रामीण लेखन शिबीर आयोजित केले होते. तीन दिवसांच्या या शिबीरासाठी त्यावेळचे आघाडीचे सर्व ग्रामीण साहित्यिक आले होते. १९८५ च्या ऑगस्ट मध्ये ''शेतकरी संघटक''चा ग्रामीण अनुभूती विशेषांक विनय हर्डीकर यांनी काढला. त्या अंकातील ''आम्ही लटिके ना बोलू'' हा शरद जोशी यांनी लिहिलेला लहानसाच लेख. पण त्याची खूप गांभिर्याने दखल घेतली गेली. अनेक साहित्यिक नाराजही झाले. पण कालांतराने केवळ ती नाराजीच दूर झाली असे नव्हे. तर ग्रामीण साहित्य निर्मितीमध्ये त्याचे सकारात्मक प्रतिबिंब उमटायला लागले.

शरद जोशींनी लिहिलं होतं, ''शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरं शहरात रमली. त्यात लिहिण्याचे कसब असणाऱ्यांनी गावाविषयी लिहिले; हरामखोरांनो! तुम्ही माझे गाव लुटले. या पापाचा झाडा तुम्हाला द्यावा लागेल. हा टाहो कुणी फोडला नाही. उलट आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्यिक आघाडी उभी राहिली. शेतकऱ्यांच्या दुःखाचे भांडवल करून त्यावर साहित्यात स्वतंत्र स्थानाचा जोगवा ही मंडळी मागू लागली.'' पुढे त्यांनी लिहिले, ''ग्रामीण साहित्यिक शहरी विद्वानांची जीभ लावतात, पुढारी मुंबईची जीभ लावतात. अगदी सोसायटीचा सेक्रेटरी सुद्धा तालुक्याची जीभ लावून बोलतो. शेतकऱ्यांच्या जिभेने कोणीच बोलत नाही.'' शेवटी ते उद्गार शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपले उभे आयुष्य पणाला लावलेल्या योद्धा शेतकरी नेत्याचे आणि एका कृतीशील विचारवंताचे होते. त्यामुळे कुणाही साहित्यिकाने ते उद्गार आपला मनोभंग करणारे किंवा उपमर्द करणारे आहेत; असा कधीच विचार केला नाही उलट शेतकरी आत्महत्यांचे सत्र जेव्हा भयावह प्रमाणात वाढले

तेव्हा जून १९९८ मध्ये पुन्हा एकदा सर्व ग्रामीण साहित्यिक शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या ग्रामीण साहित्य संमेलनासाठी इस्लामपूर इथं जमले. शरद जोशी दोन्ही दिवस तिथं होते. समारोपाचे वेळी शरद जोशींनी केलेले भाषण ''शेतकऱ्यांविषयी नागरी समाजाची बधिरता केव्हा संपेल?'' या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

''दुर्दशा विकणारे लेखक'' नावाचा एक लहान लेख साप्ताहिक ''ग्यानबा'' मध्ये १९८७ साली मी लिहिला होता. त्यावेळी मी ग्रामीण साहित्यिक आणि ग्रामीण साहित्य याविषयी अतिशय असहिष्णू पद्धतीने बोलत असे, लिहित असे. आज तो माझा उद्धटपणा होता हे जाणवते. कारण मराठी ग्रामीण साहित्यात खूप महत्त्वाचे लेखक आणि त्यांच्या साहित्य कृती आहेत. अगदी ज्या कादंबऱ्या मराठी साहित्यात मैलाचा दगड म्हणून महत्वाच्या ठरलेल्या आहेत, अशा उद्धव शेळकी यांची 'धग'. त्या कादंबरीतील कौतिक! गेल्या शतकातील एक श्रेष्ठ कादंबरी म्हणून 'धग' ओळखली जाते. माणसाचे जगणे अगदी पशूच्या पातळीला गेले तरी सामान्य माणसातील विजिगीषू वृत्ती जीवनातील सर्व प्रकारच्या आपत्तीशी किती अटीतटीने झुंज देऊ शकते आणि यात आपल्या आयुष्याची कितीही फरफट झाली तरीही आपले 'माणूसपण' किती प्राणपणाने जपते याचा हा वस्तूपाठ. इतके अभावग्रस्त आयुष्य वाट्याला येऊन देखील माणसं मोडून न पडता, लाचारी न पत्करता जगू शकतात. सभोवतालच्या प्रतिकुल परिस्थितीशी कधी जुळवून घेत. कधी दोन हात देत, दोन हात घेत माणसं किती चिवटवणे झुंज देतात, याचे दर्शन पहिल्यांदा मराठीत घडले ते धग मधील कौतिकच्या रुपाने.

दुबळा, कामचुकार, कच खाणारा पण प्रचंड स्वाभिमानी, कोणताच उद्योग नीट न जमल्याने आत्मविश्वास गमावून बसलेला; सतत एकापाठोपाठ एक विड्यांचा धूर सोडीत बसणारा तिचा नवरा महादेव. एक मुलगा शाळेपेक्षा मोटारगाड्या, हॉटेल, टूरिंग टाकीतील सिनेमा, तमाशा आणि सर्कस याकडेच अधिक ओढ असणारा. दुसरा हुशार, शाळेची ओढ आहे पण वेळेवर पुस्तकं नाहीत. शाळेची फी भरायला पैसे नाहीत. पायात चपला नाहीत, तरीही दररोज दीड-दोन कोस शेंदुर्जन्याच्या शाळेत जा-ये करून देखील सतत वर्गात पहिला येणारा हा असा नवरा आणि दोन परीची दोन मुलं सोबत घेऊन फाटक्या संसाराचा गाडा एकटीच्या हिमतीवर ओढणारी कौतिक. नवऱ्याचा कुणाकडून झालेला थोडासाही उपमर्द सहन न करणारी. संसारासाठी वाट्टेल ती ढोर मेहनत करणारी ही कौतिक. ''मान्साच्या जातीनं दोन गोठीची सरम ठिवाव, एक चोरी आणि दुसरी छिनाली. पोटाच्या धंद्याची कायची सरम आये?'' ही तिची धारणा. 'धग' मधील 'कौतिक' च्या व्यक्तिचित्रणाविषयी म.सु. पाटील यांनी म्हटले आहे, ''अशा प्रकारच्या पात्राच्या वाटचालीचा मार्ग आत्मसाक्षात्कारासाठी धडपडणाऱ्या मुमुक्षुच्या मार्गासारखाच कष्टदायक असतो. ही त्यांची एक प्रकारची मोक्ष साधनाच असते. त्यांच्या जीवनात त्यांच्याच कृतींनी आणि सद्सद्‌विवेक बुद्धीने निर्माण केलेली कोंडी ती फोडू पाहतात. ही कोंडी केवळ त्यांचीच कोंडी नसते. ती संपूर्ण मानवाचीच कोंडी असल्याचा प्रत्यय येतो. ती मधून सुटण्यासाठी भल्या-बुऱ्या मार्गानी चाललेली त्यांची धडपड म्हणूनच लक्षणीय वाटते. त्यांना लाभणारे साफल्य किंवा वैफल्य म्हणजे संपूर्ण मानव जातीचे सौभाग्य किंवा दुर्भाग्य ठरावे; अशी व्यापकता त्यांना प्राप्त होते. त्यातून मानवी मूल्यांची व जीवनाची सार्थकता वा निरर्थकता सूचित होत असते. कारण त्यांचा आत्मशोध मूलभूतपणे मानवी मनाचा व जीवनाचा शोध असतो. ती कितीही गर्दीत असली तरी त्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या एखाद्या वाक्यानेही वेगळी उमटून दिसतील. त्यांच्या मौनानेही ती पृथगात्म राहतील. अपवादात्मक रुप किंवा सर्वगुण संपन्नता ही त्यांची बलस्थाने नसतात. त्यांचे माणूस असणे हे सर्वात महत्त्वाचे असते. ते असले म्हणजे बुजगावण्यांनी गजबजलेल्या या जगात त्यांचे अस्तित्व एकदम लक्षणीय बनते. अशा पात्रांची संख्या एकंदर साहित्य सृष्टीतच फार अल्प आहे. मराठी साहित्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर अशा पात्रांचे आपल्याकडे दारिद्र्य आहे, हे खेदपूर्वक नमूद केले पाहिजे.''

स्त्रीच्या दैहिक वर्णनावरून तिच्या आंतरिक क्षमतेकडे वाचकांचे लक्ष वळविण्याचे ऐतिहासिक कार्य 'धग' मधून उद्धव शेळके यांनी केले आहे. 'धग' चा केव्हाच इंग्रजी आणि इतर परकिय भाषात अनुवाद व्हायला हवा होता. सत्यजित रे किंवा अदुर गोपाल कृष्णन या सारख्या सिनेनिर्माता दिग्दर्शकापर्यंत ही कादंबरी पोहोचायला हवी होती. आपल्या येथील संकुचित वाङमय व्यवहारात 'धग' सारख्या जागतिक वाङमयात मानाचे स्थान मिळवू शकणाऱ्या कादंबरीची प्रचंड कुचंबणा झाली, उपेक्षा झाली.

'धग' चा संदर्भ इतक्या विस्ताराने यासाठी घेतला की माझ्या सारख्या पुढे चालून कादंबरी हा वाङ्मयप्रकार लिहिणाऱ्यासाठी 'धग' ही दिपस्तंभ आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकारातील सर्व प्रकारच्या श्रेष्ठतम क्षमता या कादंबरीत आहेत. तरीही ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी असूनही तिच्यात शेतकरी जीवनाचे काही संदर्भ आले का? आले नाहीत म्हणून या कादंबरीचे मोठेपण उणावत नाही. पण एकेठिकाणी 'बाखड्याचा जावई' या कादंबरीत येतो तो खलपुरुष म्हणून. शेतमजूरी करणाऱ्या कौतिकचे खुरपणाचे पैसे बुडविणारा. रा.रं. बोराडे यांच्या

'पाचोळा' या कादंबरीतील खलपात्र आहे गावातील गरड नावाचा माजोरी शेतकरी. आनंद यादवांच्या 'गोतावळा' मध्ये नायक 'नारबा' या शेतमजूराचे-सालगड्याचे भावविश्व उद्ध्वस्त करणारा आहे तो ट्रॅक्टर विकत घेणारा मळ्याचा मालक.

१९८० च्या मौज दिवाळी अंकात डॉ. आनंद पाटील यांची 'कागुद' नावाची लघु कादंबरी आली. या कादंबरीत मात्र जो बाबू या नायकाचा बाप येतो तो खरा हाडामासाचा शेतकरी. शेताचा 'कागुद' झाल्याच्या खुशीत गावातील चार माणसं आणि नातेवाईक यांच्याकरिता पंगत बसते आणि बी.ए. झालेल्या बाबूला त्याचा बाप म्हणतो, ''पुढचं शिक्षण बस्स झालं, आता पोटापाण्याचं बघ. नोकरी शोध, नाहीतर यापुढे तोंड दावू नको.'' मला वाटते हा खरा शेतकरी बाप. 'कोसला' मधील पांडुरंग सांगवीकरचा बाप हाही खरा जातीवंत शेतकरी. कापसाच्या एकेका बोंडासाठी मरमर करणारा. एकेक शेंग, एकेक कणीस, एकेक बोंड वेचून पैसे मिळवणारा.

अकोल्याच्या परिसरातील पुरुषोत्तम बोरकर यांची ''मेड इन इंडिया'' ही अशीच महत्त्वाची कादंबरी. भाऊ पंजाब हा या कादंबरीचा नायक शहरातील उच्च शिक्षण घेऊन, परत गावाकडे येऊन शेती करणारा आणि अपरिहार्यपणे गावच्या राजकारणात पडणारा. स्वातंत्र्यानंतरच्या तीस-पस्तीस वर्षात ग्रामीण भागाचे झालेले विद्रुपीकरण, विकास योजनातील फोलपणा, अवतीभवतीच्या जीवनातील सर्वच पातळ्यांवरील बकालपणा. यावर तिरकस भाष्य करणारी, 'धग' नंतर वऱ्हाडी भाषेचा इतका सक्षमपणे वापर करणारी महत्त्वाची कादंबरी. मराठवाड्यातील गणेश आवटे यांची 'चुकार' देखील एका उच्चशिक्षित पण नोकरी नसल्याने बेकारीत दिवस काढावे लागणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाची व्यथा मांडणारी कादंबरी. इंडियातून भारतात परत यावे लागलेल्या सुशिक्षित बेरोजगार शेतकऱ्यांच्या मुलांचे चित्रण करणारी तिसरी महत्त्वाची कादंबरी म्हणजे सदानंद देशमुख यांची 'बारोमास'. सभोवतालच्या ग्रामीण वास्तवाचे आणि शेतीच्या बिघडलेल्या अर्थकारणाचे योग्य भान राखून सदानंद देशमुख अतिशय महत्त्वाचे लेखन करणारा महत्त्वाचा असा लेखक आहे. तर शेतकरी स्त्रीचे भाव विश्व उलगडणाऱ्या कथा प्रतिमा इंगोले यांनी लिहिल्या आहेत.

पारंपरिक गावगाड्यातील पाटील आणि सरपंच यांच्या भांडणात एका सामान्य शेतकऱ्याच्या जीवनाची कशी वाताहत होते, याचे प्रभावी चित्रण करणारी बाबाराव मुसळे यांची ''हाल्या हाल्या दूध दे'' ही देखील महत्वाची कादंबरी. बहात्तरच्या दुष्काळाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकरी जीवनाचे चित्रण करणारी 'रान खळगी' ही भीमराव वाघचौरे यांची कादंबरी ही महत्त्वाची आहे. अगदी अलिकडेच त्यांची ''नवं काटवन'' नावाची कादंबरी बरीच चर्चेत आहे. मागच्या पिढीतील 'माणूस' ही सशक्त कादंबरी लिहिणारे मनोहर तनहार. उद्धव शेळके यांच्याच ताकदीचा हा लेखक. ललित गद्य आणि कथा यांच्या सीमारेषा पुसून टाकून अतिशय तरल स्वरुपाचे लेखन करणारे मधुकर केचे. शेती आणि शेतकरी जीवनाचे अतिशय मनोहारी चित्रण केचे यांनी केले आहे.

भालचंद्र नेमाडे यांनी आजवर जे काही लिहिले आहे ते सर्व एका शेतकऱ्याच्या मुलाने केलेले केवळ मराठीतीलच नव्हे तर देश पातळीवर आणि जागतिक पातळीवर दखल घेतले गेलेले अत्यंत महत्त्वाचे लेखन आहे. संत तुकाराम, म. फुले, बहिणाबाई चौधरी. साने गुरुजी या परंपरेला अधिक सशक्त करणारे त्यांचे लेखन आहे. भालचंद्र नेमाडे यांची ''हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ'' ही कादंबरी. केवळ ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला म्हणून महत्वाची नाही, तर नेमाडेंनी या पूर्वीच्या चार-पाच कादंबऱ्यांमधून त्यातील नायकांचे स्वतःच्या शेतकरी कुटुंबाशी असणारे घट्ट जैविक नाते यांच्या विषयी जे लिहायचे, सांगायचे टाळले होते, आले तरी खूप ओझरते, पुसटशे संदर्भ आले होते, ते इथे खूप आत्मीयतेने, ताकदीने मांडले आहेत. 'मेलडी' आणि नंतरच्या 'देखणी' या कविता संग्रहातील कवितांशी ''हिंदू'' चे नाते अधिक जवळचे आहे. श्रमाला केंद्रस्थानी ठेवून नैसर्गिक पिकांनी पृथ्वीची शान वाढविणारी आत्ममग्न कृषी संस्कृती हळूहळू परावलंबी आणि पराभूत कशी होत गेली ते समजून घेणे, इतकी पाच हजार वर्षांपासूनची समृद्ध कृषी परंपरा जगात कुणाच्याच वाट्याला आली नाही, हे जागतिक व्यासपीठावर अभिमानाने सिद्ध करणे हे खंडेरावचे जीवित कार्य तर आहेच; पण त्याच वेळी शेतीची आजची दुरावस्था का झाली? याचा शोध घेणे हे देखील खंडेरावचे जिवीत कार्य आहे. शेतीच शेतकऱ्याची पहिली वैरीण. तीच त्याचे सगळे आंड ठेचून टाकते. अमरवेल जशी जित्या झाडाला खाते तशी शेती शेतकऱ्याला खाते. मागच्या जन्मात काही पाप केले असेल म्हणून आपण शेतकरी झालो. शुद्ध मोकळी हवा आणि स्वच्छ सूर्यप्रकाश सोडला तर इथे काहीच नसते. एका वर्षी शेती बुडाली तर ती भरून काढायला दहा वर्ष पुरत नाहीत. खराब धान्य स्वतः खाऊन चांगले विकले तरी पोरापोरींना शिकवण्यापुरताही पैसा शिल्लक राहत नाही. हे कुणबीकीचे कुंपण तोडा न बाहेर खुल्या जगात पळा. शेतीमुळे या लोकांच्या सगळ्या सौंदर्य भावना नष्ट झालेल्या आहेत. शेती म्हणजे खरचटणे, टोचणे, लागणे, आपटणे, ढोसणे, कापणे, ठेचणे, चेपणे, मुरडणे, पिरगळणे, मुरगळणे, काहीतरी चावणे, डसणे. बैलांच्या शिंगांचे आकार पाहत त्यांच्या गळ्यातल्या

तिसऱ्या अखिल भारतीय शेतकरी मराठी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!



**प्रोप्रा. प्रविण महाजन**
Mob. 9767225104
9421726735

# नांगरधारी कृषक सेवक

गुरुदेव कॉम्प्लेक्स, गाळा नं. ७ नागपूर रोड,
बस स्टॉप समोर, जाम, त. समुद्रपूर

तिसऱ्या अखिल भारतीय शेतकरी मराठी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!

**श्री. नानासाहेब आर.जी. पाटील**
जळगांव जिल्हा परिषद
सदस्य





**शकिल खोडे**
सेलडोह, जि. वर्धा



**रविंद्र खोडे**
सेलडोह, जि. वर्धा



**श्री इंदरचंदजी बैद**
खैरी, जि. यवतमाळ

AN ISO 9001:2008 CERTIFIED SEED COMPANY

**राष्ट्रिय उत्पादकता बढानेमें अग्रणी वेस्टर्न सीड्स के "नवरत्न"**



रीसर्च हा. एरंडी
वेस्टर्न-६, वेस्टर्न-६+ (प्लस)
वेस्टर्न वीजे-६६+ (प्लस)
वेस्टर्न वीजे-६६, वेस्टर्न-२७
वेस्टर्न मारुती, वेस्टर्न मुखी, वेस्टर्न सरपंच

रीसर्च मूगफली
वेस्टर्न-१८-(धरती), वेस्टर्न-२०(विश्वास),
वेस्टर्न-४४(माका), वेस्टर्न-५१ (वरुणा),
वेस्टर्न अेचबी-५५(शिवा),
वेस्टर्न-६६(वंदना), वेस्टर्न वरदान,
वेस्टर्न महाबली, वेस्टर्न महाराणा

रीसर्च तिल
वेस्टर्न -११,
वेस्टर्न समर्थ,

रीसर्च जीरा
वेस्टर्न सी-४५,
वेस्टर्न सी-६०,
वेस्टर्न जीवन प्राईम,
क्युमेक्ष वेस्टर्न सी-६०

रीसर्च मुंग
वेस्टर्न महावीर,
वेस्टर्न प्रोटो
वेस्टर्न शुरवीर



रीसर्च गेहू
वेस्टर्न डबल वन डीलक्ष,
वेस्टर्न डबल वन, वेस्टर्न सोना,

रीसर्च चौली
अनंतहर्ष-१८,
वेस्टर्न अेवरग्रीन

रीसर्च सरसों
वेस्टर्न वीर, वेस्टर्न शारदा

रीसर्च धान
वेस्टर्न शक्ति, वेस्टर्न महाशक्ति

रीसर्च सौंफ
वेस्टर्न हरियाली

रीसर्च धनिया
वेस्टर्न स्वाद
वेस्टर्न सुगंधा (मल्टीकट)

रीसर्च हा. बाजरा
वेस्टर्न अेम-४५,
वेस्टर्न अेम-४६,
वेस्टर्न सेवा

रीसर्च गुवार
अनंतहर्ष-९
वेस्टर्न अवन्तिका

रीसर्च उडद
वेस्टर्न अमूल

रीसर्च हाईब्रीड कपास बीटी (बीजी-२)
वेस्टर्न निरोगी-५१, १०८
वेस्टर्न निरोगी-१५१, ५५५
वेस्टर्न कस्तुरी - ५५५, वेस्टर्न एक्षोर्ट
वेस्टर्न प्रोफिट, वेस्टर्न विझा

रीसर्च सोयाबीन
वेस्टर्न-१०१,
वेस्टर्न-१०८

रीसर्च गम गुवार
वेस्टर्न डोलर, वेस्टर्न समृध्धि

रीसर्च भींडी
अनंतहर्ष-८, वेस्टर्न वर्षा,
हा. भींडी वेस्टर्न-००७ (F1)

रीसर्च इसबगोल
वेस्टर्न निर्मल

समृद्धि का एकही नाम बोईए वेस्टर्न बीज कमाईए

WESTERN SEEDS "MORE FOR ALL" Since 1983

**वेस्टर्न एग्री सीड्स लिमीटेड**
कोर्पोरेट ओफिस : ८०२/११, वेस्टर्न हाउस, जी.आई.डी.सी. (एन्जी) अेस्टेट, सेकटर-२८, गांधीनगर-३८२०२८. (गुजरात)
फोन : ०७९-२३२१२४२७, २३२११८९१, फेकस : २३२१०३८२
Email : info@westernagriseeds.com Website : www.westernagriseeds.com



**Ramesh Natthuji Zade**

Assistant Professor in Chemistry
Siddharth College, Mumbai

हार्दिक शुभेच्छा !



**Bhupesh Marotrao Mude**

Mumbai

हार्दिक शुभेच्छा !



**Kushal Mude**

Mumbai

हार्दिक शुभेच्छा !



**विजय यादवराव लाकडे**

सिव्हील इंजिनिअर तथा कॉन्ट्रक्टर
ता. आरमोरी, जि. गडचिरोली कडून

हार्दिक शुभेच्छा !



**श्री बालाजी कृषी केंद्र**

बस स्टँड जवळ, वायगांव (नि.) ता.जि. वर्धा
M. 9764097033

बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके,
भाजीपाला बियाणे आणि स्प्रे पंप
मिळण्याचे एकमेव ठिकाण



**मा. अमिन लालानी**
आरमोरी शहर प्रमुख, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी

**LALANI MOTORS**
Near Bus Stand, Nagpur Road,
ARMORI, Dist. Gadchiroli (M.S.)
Ph.No.07137-266515
Mo. 9673087061
Email : herolalanimotors@gmail.com

**LALANI TYRES**
House No.2186, Main Road,
ARMORI - 441208
Dist. Gadchiroli
Ph.: 07137-266266
Mo.: 9421817200

घंटा ऐकत बथ्थड मेंदूने चाकांच्या धावाखाली नेहमीची चाकोरी धरून ठेवणे, म्हणजेच खेड्यातले जगणे. औत उन्हातच उभं करून कपाळावर उबडा हात ठेवत आभाळाकडे पाहणारा मृगातला शेतकरी हे माझं आयुष्यभराचं भयस्वप्न झालं आहे. ज्ञान आणि कला तर या ग्रामीण कृषी संस्कृतीत शत्रूच वाटतात. ज्ञानाबद्दल आहे ती आस्थाही इथे जपता येत नाही. इथली आमच्या आजी आजोबांच्या पूर्वी असावी, ती उत्स्फुर्त आदिमताही नष्ट झाली आहे आणि आधुनिकतेची विवेकशीलताही मुळ धरत नाही आहे. आम्ही काय करावे? आजच्या शेतकऱ्यांपेक्षा जंगलातले रानटी लोक काहीतरी संस्कृती सांभाळतात. इंग्रजांनी शेतीला आणि शेतीशी संबंधीत सगळ्या घटकांना इतके शोषून घेतले आहे, की आणखी शतकभर तरी खेड्यांचा आणि ज्ञानाचा संगम अशक्य आहे.

शेती म्हणजे वाऱ्याची वाट पाहा, पावसाची वाट पाहा, उन्हाची वाट पाहा, वर्षभर असंच. हेच तिफणीमागून फसाट्या ओढा-पाय लटपटताहेत. पण आटपा अंधार व्हायच्या आत.... खराब धंदा. एके ठिकाणी खंडेराव म्हणतो, ''खंडेराव तू शेती करायचं ठरवलंस तर नवरा होऊ नकोस किंवा लग्न करायचं ठरवलंस तर शेतकरी होऊ नकोस. दोन्ही पैकी एकच कर.''

आजच्या आपणा सारख्या शेती, गाव आणि शहरी जीवनाचं आकर्षण यात अडकून द्विधा मनःस्थितीत जगणाऱ्यांचे चित्रण हिंदू मध्ये येते. एके ठिकाणी खंडेराव म्हणतो, ''तू हे सगळं बौद्धिक, शिक्षणाचं, विद्यापीठाचं, पीएच.डी., पुस्तकं, लेख, संशोधन, सांस्कृतिक भानगडी, तुझ्या शिंगासारख्या मोडून टाक आणि शेतकरी हो. शेतीवाडी, घरदार, गुऱ्हाळं, शाळा, नेतेगिरी, खेड्यातलं राजकारण, लोकसेवा, मोरगाव केंद्राच्या कितीही दूर गेलास तर फक्त त्रिज्या वाढेल. म्हणून निर्णय घे. हे विश्वची माझे घर. मोरगाव सोड, देश सोड. हा विचार डोकं काढून वर येतो तोच दुसरा विचार त्याला खाली बुडवत वर येतो. खंडेराव तुझा वारसा केवळ तुझं घरदार जमीनजुमला, शेत शिवारं एवढाच नाही. गेल्या दहा हजार वर्षापासूनच्या कृषी संस्कृतीचा हा सतत तुझ्यापर्यंत झिरपत आलेला वारसा आहे. तो तुला असा पालीच्या शेपटीसारखा खटकन तोडून पुढे जाता येणार नाही. तोडताही येणार नाही. औद्योगिक, व्यापारी, महानगरी लोकांच्या उन्मलित भुतावळीत शिरणं काही फार कठीण नसतं. लाखो लोक ते करतच असतात; पण खंडेराव तू इतका क्षूद्र नाही आहेस. घराला अंगण आणि दारी पिंपळ ही तुझी ओळख. या गोष्टी नसलेलं भोवताल तुला चालेल? ऊन, पाऊस, चांदणं, जमीन, गवत, पशुपक्षी, प्राणी, झाडं झुडपं, लोकगीतं, दंतकथा, वाक्प्रचार हे काहीच नसलेला झगझगीत वांझ परिसर तुला चालेल? भरकटू नकोस. तुझे पाय शाबूत ठेव.''

तुकारामाचे अभंग नाचून म्हणणारे आणि हरित क्रांती नंतर पहिल्यांदाच हातात काही नगदी पैसा आल्यानंतर देखील ही शेतकरी माणसं घरातल्या स्त्रियांच्या बाबत किती निष्ठूरपणे वागतात याचे ही चित्रण हिंदू मध्ये नेमाडे करतात. शेतकऱ्याच्या शेतात सालदार म्हणून राबलेल्या गिरधरचं वर्णन एका ठिकाणी येतं. फाटकी बनियन, बरीच पाठ उघडी. पोट खपाटीला लागलेलं. डोळे खोल गेलेले. एके काळचा हा आडदांड भिल्ल राखोळी, ही एका संपन्न शेतकऱ्याच्या शेतात पंधरा वर्ष इमानानं काम करण्याची फलनिष्पत्ती.

आज खेड्यातील शेतीवाडी अन तिथली प्रॉपर्टी या विषयी हिंदू मधील एक पात्र म्हणते, ''पोराच्या दोन महिन्याच्या पगाराएवढी सुद्धा किंमत येणार नाही या वाडवडिलांचं सोनं म्हटल्या गेलेल्या शेताची न बैलांची न छपरांची. अहो या तुमच्या खेड्यातल्या प्रॉपर्ट्या कवडीमोलाच्या झाल्या आहेत.'' इमर्सन म्हणतो, 'प्रत्येक नव्या युगाचा अनुभव उलगडून सांगण्यासाठी एका नव्या प्रेषिताची गरज असते आणि जग त्यासाठी नव्या कवीची वाट पाहत असते.' संत तुकाराम हे जसे त्यांच्या काळाचे प्रेषीत ठरले, तसे बा.सी. मर्ढेकर देखील त्यांच्या काळाचे प्रेषीत ठरले. दुसऱ्या महायुद्धाने केलेली मानवी मूल्यांची मोडतोड, जगण्यातील अनिश्चितता, आंधळ्या-निर्बुद्ध नियतीशी माणसाला द्यावी लागत असलेली झुंज, जेव्हा त्यांच्या कवितेतून अवतरली, तेव्हा मराठी साहित्य विश्व अवाक झाले नसते तरच नवल!

**असशील भोळ्या कुठे भैरवा,**
**उघड तुझे तर तीनही डोळे**
**भस्म करी गा आता तरी हे ....**
**हे हाडांचे खडे सापळे !**

मानवी जीवनातील उद्ध्वस्तता, हताशा तेव्हा मर्ढेकरांच्या कवितेतून जशी व्यक्त झाली आणि आधुनिक मराठी कविता जन्माला आली. अगदी तसाच कालखंड आज खेड्यातून आलेल्या लेखक कविंच्या अभिव्यक्तीने मराठी साहित्य विश्वात अवतरला आहे. आज मराठीत जे जे लक्ष्यवेधक आणि महत्त्वाचे लेखन होत आहे. मग ते कादंबरीच्या रुपातील असेल. कथा, कवितेच्या रुपातील असेल किंवा नाटकाच्या रुपातील असेल; ते सर्व खेड्यातील लोकांविषयी आहे आणि ज्यांचे लहानपण, बालपण खेड्यात गेले आहे. शेतकरी, शेतमजूर, दलित कुटूंबात गेले आहे तेच लेखक, लेखिका आज प्रामुख्याने महत्त्वाचं लेखन करीत आहेत आणि तोच आज मराठी साहित्याचा मध्यवर्ती प्रवाह ठरला आहे. हे घडून येण्यासाठी भालचंद्र नेमाडे मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले आहेत. हे त्यांच्या टिकाकारांना देखील मान्य

करावे लागेल.

एके काळी इंग्रजी भाषा आणि इंग्रजी साहित्याचा संपर्क ज्यांना लाभला त्या इथल्या शहरी उच्चवर्गीय वर्तूळातील लेखक, कवींनी इथले खेडे, शेती, शेतकरी, त्यांचे जगणे हे संपूर्णपणे वाङ्मय व्यवहाराच्या परिघाबाहेरच ठेवले होते. जो इथला मुळ वाङ्मयीन प्रवाह होता, 'लीळाचरित्र' संत तुकाराम. तर ती परंपराच खंडीत झाली होती. म. फुलेच केवळ एकमेव त्या कृषी परंपरेचे महत्त्वाचे शिलेदार. तिकडे पर्ल बक् सारखी लेखिका एका चिनी शेतकऱ्याच्या जीवनावर आणि त्याच्या जीवन संघर्षावर ''द गुड अर्थ'' सारखी जागतिक पातळीवर वाखाणली गेलेली महान कादंबरी लिहू शकत होती. भारतातच हिंदी भाषेतील सर्व श्रेष्ठ गणली गेलेली 'गोदान' सारखी मुन्शी प्रेमचंद याची कादंबरी शेतकरी जीवनाचे चित्रण करणारी गाजत होती. पण मराठी मध्ये मात्र 'ज्ञानपद' कादंबरी म्हणून गीतातून शेती, खेडे, शेतकरी म्हणजे निसर्गाच्या कुशीतील अतिशय भाग्यवान जंगलची पाखरे. तिथला हिरवा गर्द निसर्ग, झुळझुळ वाहणारे पाण्याचे झरे, या आणि अशाच भाबड्या, निरागस, निष्पाप वर्णनात इथले कवी मश्गूल होते. 'शेतकीतील सुख' नावाची कवी यशवंत यांची कविता अनेकांना आठवत असेल.

**धुमाळ बाळा जोडी घेऊनि मोट धरावी कधी**
**करावी राखण मळणी कधी**
**रास घालुनी डोळे भरूनी संतोषे पाहुनी**
**निजावे वाकळ मग पसरूनी**
**वर चंद्र तारकामंडित ते अंबर**
**पायथ्यास पडुनी वाघ्या करि गुर्गुर**
**वाजती गळ्यांतील बैलांचे घुंगर**
**लाख पटींनी हे न सुखद का कृषी कर्मी राबणे!**
**नको ते परवशतेचे जिणे!**

असा सगळा शेत, शेतकरी म्हणजे कवींच्या दृष्टीने एक भरजरी आनंद सोहळा होता. याच कालखंडात बहिणाबाई चौधरी, साने गुरुजी यांच्या सारखे अपवादही होते; पण त्या मधल्या काळात हरवलेल्या, खंडीत झालेल्या इथल्या मातीतील मुळच्या मुख्य वाङ्मय प्रवाहाशी पुन्हा एकदा आजच्या आधुनिक मराठी वाङ्मयाचे नाते प्रस्थापित करण्याचे अतिशय जिकीरीचे काम भालचंद्र नेमाडे यांनीच केले आहे आणि शरद जोशी अन् शेतकरी संघटनेने काय केले असेल, तर इथल्या मुळ वाङ्मयीन परंपरेचे योग्य भान राखण्याची जाणीव संवेदनशील, तरुण साहित्यिकांमध्ये निर्माण केली.

अलीकडील काळात शेतकऱ्याच्या जगण्यातील 'स्वयंभूत्व' मोठ्या वेगाने नष्ट झाले. विशेषतः १९६५ ते १९७५ दरम्यानच्या दशकात देश अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण व्हावा म्हणून घडवून आणलेल्या हरित क्रांतीमुळे शेतकऱ्याचे परावलंबित्व पराकोटीचे वाढले. शेतकऱ्याचे उत्पादन वाढले पण उत्पन्न वाढले नाही. उलट खर्च भरमसाठ वाढला. त्यातून त्यांची हतबलता, हताशा वाढली. त्याच्या मनातील असंतोष उद्रेक होऊन शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने बाहेर पडला. हे अवती भोवतीचे गुदमरविणारे वास्तव आणि शेतकऱ्यांच्या मनातील उद्रेक यांना शब्दरुप देण्याचे काम अनेक कवींनी केले.

**आम्ही जलमलो मातीत**
**किती होणार गा माती?**
**खापराच्या दिव्यात या**
**कधी पेटणार वाती?**

हा विठ्ठल वाघ यांच्या कवितेतून उमटलेला पहिला उद्गार. नंतर ना.धों. महानोर यांची कविता ही बदलली. इंद्रजित भालेराव, प्रकाश होळकर, श्रीकांत देशमुख, संतोष पद्माकर पवार, लक्ष्मण महाडिक, नारायण सुमंत, प्रकाश किनगावकर, नारायण कुलकर्णी कवठेकर, कल्पना दुधाळ, वीरा राठोड, केशव खटींग, विनायक येवले, ज्ञानेश वाकुडकर, गंगाधर मुटे, बालाजी मदन इंगळे, ऐश्वर्य पाटेकर, रवी कोरडे, प्रमोद माने, अजय कांडर, प्रवीण दशरथ बांदेकर हे आज मराठीतील आघाडीचे कवी आहेत आणि त्यांच्या आस्थेचा विषय आहे इथला मोडून पडलेला, उद्ध्वस्त होत असलेला आणि आत्महत्या करीत असलेला शेतकरी. मंगेश नारायण काळे या कवीने तर 'शेतकरी' हा शब्द ''आत्महत्या'' असा सुद्धा लिहिता येतो असे म्हटले आहे. 'वहिती खालचं आयुष्य' ही लक्ष्मण महाडिक यांची कविता माझ्या अत्यंत आवडलेल्या कविता पैकी एक आहे. जी शेतकऱ्याच्या मनोवस्थेचे नेमके चित्रण करते.

**वहितीखाली काढलेल्या दोन चार बिघ्यात आयुष्य घडवताना**
**उन्मळून कधी पडलो नाही**
**अन् काठामेराचं हिरवंपण पेंडीत बांधताना**
**बिघाभर सोंगूनही पाचुंदा कधी भरला नाही**
**म्हणून कधी रडलो नाही.**
**कितीदा इर्जिक सोडून आयुष्य बटाईनं लावलं**
**खरीप गेलं म्हणून रब्बी पेरलं**
**तरीही सालाभराची घरादाराची चंदी कधी झाली नाही की,**
**जेष्ठाषाढात गुराढोरांसाठी कडब्याची पेंडी उरली नाही**
**म्हणून कधी कुढलो नाही**
**बिघाभर सोंगूनही.....**
**कधी कधी पेरूनही मोडी यावं शेतानं तसं आयुष्य वाट्याला आलं**
**नाही कसं म्हणू काठामेराला का होईना हिरवंपण देऊन गेलं**

**या सांदमोडीतच उभ्या आयुष्याची हेळसांड झाली**
**म्हणून डोळ्यांमधली आसवं वाटली नाही**
**की मातीवरचं प्रेम कधी घटलं नाही**
**बिघाभर सोंगूनही....**
**पिकासारखंच कधी मधी आयुष्यही बहरून आलं**
**बांधावरचं वठलं झाड पाखरांचं गोकुळ झालं**
**म्हणून काही पाखरांसाठी बांधावरती बुजगावणं बनलो नाही**
**की गोफणीचा दगड होऊन शिवारभर गिरगिरलो नाही.**

तर 'भ्रमिष्टाचा जाहिरनामा' 'पिढी पेस्तर प्यादे मात' आणि अगदी अलिकडेच प्रकाशित झालेला कविता संग्रह ''बहादूर थापा आणि इतर कविता'' या संग्रहाचे आजचे अत्यंत महत्वाची कविता लिहिणारे कवी संतोष पद्माकर पवार यांनी आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यास उद्देशून लिहिलेली ही कविता,

**हजारो वर्ष खपल्या तुझ्या पिढ्या**
**तुझ्या आयाबायांचं झालं शेण**
**तुझ्या शक्तीचं झालं कंपोस्ट**
**विकतील मातीमोल किंमतीला तुझी वंशावळ**
**तुझ्यावर भरला पाहिजे अधिकचा खटला**
**स्वत:ची फसवणूक केल्याचा**
**आता तू निघालास यातून सुटून निघायला**
**मात्र तू अडकलेला शेंबडातल्या माशीगत**
**हीच तुझी सक्त मजुरी, हेच तुझे कारागृह**

१९९० सालानंतर आपण आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. तेव्हापासून सभोवतालच्या बदलांचा वेग प्रचंड वाढला. पण त्या बदलांशी जुळवून घेण्याची क्षमताच शेतकऱ्यांमध्ये निर्माण होणार नाही अशीच आर्थिक धोरणं राहिली. खुलीकरण आले ते उद्योगधंद्याच्या क्षेत्रात. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात. शेती क्षेत्रात ते आलेच नाही. शेतीतून बाहेर पडण्याचा एक मार्ग किंवा साधन म्हणून आपण शिक्षणाकडे पाहत होतो; ते शिक्षण आज ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या, शेतमजुराच्या मुलाला जगण्याचा आधार देण्यास कुचकामी ठरले आहे आणि ज्या शिक्षणामुळे रोजगार मिळू शकतो ते शिक्षण घेण्याची खेड्यातील मुला-मुलींची आर्थिक कुवत नाही. शेतीतून बाहेर पडण्याच्या संधीचा अभाव, त्यामुळे ही शेतकऱ्यांची आणि त्यांच्या मुलांची कुचंबणा वाढली. खरे तर देशाच्या कुंठीत अर्थव्यवस्थेला त्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी देशाने १९९० नंतर खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. विकासाच्या प्रक्रियेतील तो एक अपरिहार्य टप्पा म्हणून आपण हे खुलीकरण स्वीकारले. पण राज्यकर्ते कोणत्याही पक्षाचे अन् विचारसरणीचे असोत, त्यांनी या खुल्या अर्थव्यवस्थेचा शिरकाव शेतीच्या धंद्यात होऊच दिला नाही. यातून शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण भयावह स्वरुपात वाढत चालले आहे.

सुशील धसकटे या लेखकाची ''जोहार'' नावाची कादंबरी नुकतीच आली आहे. शेतकऱ्याच्या उच्चशिक्षित मुलाची घुसमट व्यक्त करणारी ही महत्वाची कादंबरी आहे. कृष्णात खोत हा एक आजचा महत्वाचा कादंबरीकार त्याच्या 'धूळमाती' या कादंबरीत आजच्या खेड्यातील स्थित्यंतराची नोंद अतिशय बारकाईने घेण्यात आली आहे. मागच्या पिढीतील कादंबरीकार जसे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भांबावून आणि गोंधळून गेले होते; काहीसे संभ्रमीत झाले होते; तसे आजचे कादंबरीकार गोंधळलेले नाहीत. 'ग्रामीण बाज' लोकाभिमूख करण्याचे काम रवीकिरण मंडळातील कविंनी केले. तर आधुनिक काळात बहिणाबाई चौधरींच्या कवितेने मराठी ग्रामीण कविता खऱ्या अर्थाने सुरू झाली. १९५५ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजींची ग्रामगीता आली. संत तुकडोजी आणि डॉ. वि.भि. कोलते यांना शेतीच्या लुटीचे कारस्थान चांगल्याप्रकारे अवगत होते. म्हणून त्यांचे लेखन प्रभावी झाले.

शरद जोशींनी जेव्हा सांगितले, ''पैसा खर्च करून, तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व प्रकारे रिपोर्ट तयार करून सर्व काही त्या कोरडवाहू शेतीत ओतल्यावर तीन वर्षांनी माझ्या असं लक्षात आलं की, हे सर्व फुकट चाललेलं आहे. आपण काहीही केलं तरी आपल्याला प्रत्येक वर्षी नुकसानच येणार आहे. आपण शेतीत जेवढा खर्च करतो, तेवढी किंमत आपल्याला कधीही सुटत नाही.'' लहान शेतकरी, मोठा शेतकरी, अल्पभूधारक, भूमिहिन हे वेगळे गट नसून ते शेतकऱ्यांच्या अधोगतीचे वेगवेगळे टप्पे आहेत. देशातील दारिद्र्याचा उगम शेतीमालाला रास्त भाव न मिळण्याच्या दुष्परिणामातून झाला, एवढेच नव्हे तर शहरातील वाढत्या झोपडपट्ट्या, बेकारी, भिकारी ही या दारिद्र्याचे परिणाम म्हणून समोर आले. या संबंधीची शास्त्रशुद्ध मांडणी शेतकरी संघटनेने केली. इतर पक्ष, संघटनापेक्षा शेतकरी संघटना वेगळी ठरली कारण तिने या विचारांच्या पाठपुराव्यासाठी शेतकऱ्यांना संघटीत करून अभूतपूर्व आंदोलनं केली. राज्यकर्त्यांचा, पोलिसांचा अमानुष अत्याचार सहन केला. १० नोव्हेंबर १९८० रोजी ऊस आंदोलनात मंगरूळपीर फाट्यावरील प्रसंगाचे विजय परुळकर यांनी असे वर्णन केले आहे, ''एस.आर.पी. कडून काठ्यांनी झोडपले गेलेले, बुटांनी तुडविले गेलेले चार-पाच हजार शेतकरी गुराप्रमाणे ओरडत माळोरान धावत सुटले होते. मी युद्धाचे अनेक प्रसंग पाहिले आहेत, पण असा अमानुष प्रकार कधीच पाहिला नाही. हा तर उघड उघड अत्याचार होता. युद्धामध्ये दोन्ही बाजूच्या सैन्याहाती शस्त्र असते. इथं तर सगळा एकतर्फी मामला होता. निशःस्त्र शेतकरी विरुद्ध शस्त्रधारी पोलीस''.

शेतकरी संघटनेने जी चळवळ उभी केली. तिचा खेड्यातील माणसांच्या दुःख, दारिद्र्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न अत्यंत प्रामाणिक होता. यातून एक नवे आत्मभान ग्रामीण समाजात निर्माण झाले. तसे ते साहित्यिकांनाही येत गेले. 'माणूस' चे संपादक श्री.ग. माजगावकर निपाणीच्या तंबाखू आंदोलनात लोटलेला शेतकऱ्यांचा उत्सफूर्त जनसागर पाहून म्हणाले होते, 'हे सन्याशाचं वैभव आहे'. ते असंही म्हणाले होते, ''चळवळ खरोखर नवी असेल तर तिच्या वाढी बरोबर नवे नवे शब्दही जन्मास येतात. हे शब्द चळवळीला पुढे नेतातच पण तिचा आशयही अधिकाधिक समृद्ध, व्यापक करतात. महाराष्ट्रातील शरद जोशी यांची चळवळ यापूर्वीच्या शेतकरी चळवळीपेक्षा निश्चित नवीन व वेगळी होती.''

'अंगारमळा' हे नाव शरद जोशींनी आपल्या आंबेठाणच्या शेताला दिले. आज ते नाव मराठी साहित्य विश्वात अतिशय प्रतिष्ठेने रूढ होत आहे. हे नाव सर्वप्रथम आपल्या कथा संग्रहासाठी भास्कर चंदनशीव यांनी निवडले. ''अंगारमाती'' हा तो कथासंग्रह. दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य यातील सीमारेषा धूसर करण्याची क्षमता असलेला हा मराठीतील समर्थ कथाकार. 'जांभळढव्ह', 'मरणकळा' या कथा संग्रहातील कथा म्हणजे जी.ए. कुलकर्णी यांच्या तोडीच्या कथा असा निर्वाळा समीक्षकांनी दिला आहे. 'लालचिखल', 'मेखमारो' या सारख्या त्यांच्या कथा आपणास माहित आहेत. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, ''मातीशी नातं सांगणारी कोणतीही विचारधारा, मला माझी वाटत आली आहे. त्यासाठी रस्त्यावरची 'हाक' असो, वा ललिताक्षराची 'साद' असो, ती मला, माझ्यासाठीच वाटत आलेली आहे. म. फुले यांचा 'असूड' असो की शरद जोशी यांची 'एककलमी' चळवळ असो, मला अधिक महत्त्वाची वाटली.

'अंगारवाटा : शोध शरद जोशींचा' हे भानू काळे यांनी अतिशय मेहनत घेऊन लिहिलेले पुस्तक. वसुंधरा काशीकर यांचे 'शरद जोशी एक अस्वस्थ कल्लोळ'. आज शरद जोशी आणि त्यांच्या विचारांची, कार्याची योग्य दखल घेतली जात असल्याची ही चांगली लक्षणं आहेत. 'इंडिया-भारत' 'रस्ता रोको' 'भिक नको घेऊ घामाचे दाम' हे काही नवे शब्द शेतकरी संघटनेच्या चळवळीने मराठीला दिले आहेत. आजचा मराठीतील आघाडीचा कथाकार म्हणून आसाराम लोमटे हे नाव आता स्थिर झाले आहे. २०१६ चा साहित्य अकादमी पुरस्कार त्यांच्या ज्या 'आलोक' या कथासंग्रहास मिळालेला आहे; त्या कथासंग्रहातील कथा; तसेच त्यांच्या आधीच्या 'इडा पिडा टळो' या कथा संग्रहातील कथा या आजचे आणि आताचे ग्रामीण वास्तव चित्रीत करणाऱ्या आहेत. शेतकरी संघटनेने ग्रामीण भागातील शेतकरी स्त्री पुरुषांच्या मनात जागवलेले आत्मभान; आजचे वर्तमान राजकीय आणि सामाजिक पर्यावरण शेतकऱ्यांचे बिघडलेले अर्थकारण; त्यातून घडून येणाऱ्या आत्महत्या; या सर्वांचा वेध आसारामची कथा घेते. शेतकरी संघटनेच्या चळवळीने घडवून आणलेले मन्वंतर अतिशय आत्मियतेने आणि तटस्थपणे टिपणारा हा लेखक आहे.

आज आपण म्हणतो जग फार वेगाने बदलत आहे. विज्ञान-तंत्रज्ञनाच्या क्षेत्रात मानवी समूहाने मोठी झेप घेतली आहे. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात मानवी पुरुषार्थाची नवनवीन दालनं उघडली जात आहेत. शेतकऱ्यांपर्यंत देखील हे सर्व सभोवताली घडून येणारे बदल प्रसार माध्यमातून माहीत तर होत आहे, पण त्यांना यात सहभागी होता येत नाही. शेतकऱ्यांनाही वाटतं, आपल्या मुला-बाळांना देखील या नव्याने उपलब्ध झालेल्या संधीचा लाभ मिळायला हवा. तेवढी गुणवत्ता आणि कष्ट करण्याची क्षमता तर आमच्याकडेही आहे. पण या स्पर्धेत उतरण्यासाठी जे आर्थिक पाठबळ शेतकऱ्यांच्या मुलांना हवं, ते मात्र तो शेतकरी आपला धंदा तोट्यात असल्यामुळे देऊ शकत नाही. आज संपूर्ण महाराष्ट्रात मराठा मुक मोर्चांना मिळणारा अभूतपूर्व पाठिंबा हे याचेच द्योतक आहे. आज सहजपणे आणि सवंगपणे म्हटले जाते की, ''बघा इतके दिवस सत्ता तर यांच्याच हाती होती. सर्वच क्षेत्रात हा समाज आणि शेतकऱ्यांची मुलं किती पुढे गेली आहेत. राजकारण, प्रशासन, खाजगी क्षेत्रातील उद्योगधंदे; अफाट पैसा मिळवून देणारी मेडिकल-इंजिनियरिंग सारखी क्षेत्रे आज यांनी काबीज केली आहेत. तरीही आज रस्त्यावर येऊन हाच समाज मोर्चे काढतो आहे.'' पण याचा थोडा बारकाईने शोध घेतला तर लक्षात येईल. निव्वळ शेतीकरणाऱ्या आणि केवळ शेतीवर उपजिवीका करणाऱ्या शेतकऱ्यांची मुलं ना राजकारणात आहेत, ना प्रशासन, उद्योग, शिक्षण. जे कुणी तिथं आहेत त्यातील कुणाचे बापजादे पूर्वापार सरंजामदार म्हणून राजकारणात असतील; कुणी सावकार असतील. कुणी शिक्षक, कारकून, तलाठी ईतर पगारदार नोकर. काही ना काही शेतीच्या बाहेरून आर्थिक आवक येण्याची सोय ज्या कुटूंबात झाली, त्याच कुटूंबातील, मग ती कोणत्याही जातीपातीची असोत, त्याच मुलांनी आपल्या उपजत क्षमतेच्या जोरावर ही क्षेत्रं काबीज केली, त्यात शिरकाव केला. आजही या सगळ्या बदलत्या परिस्थितीचा फायदा घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे. पण निव्वळ शेतीवर उपजिविका असणाऱ्या शेतकऱ्यांची मुलं या स्पर्धेत कुठेच नाहीत.

आपली सतत प्रगतीच झाली पाहिजे, उद्याचा दिवस कालच्या पेक्षा अधिक चांगला गेला पाहिजे, ही माणसाची मूलभूत प्रेरणा.

आपल्या प्रगतीच्या मार्गात येणाऱ्या सर्व अडथळ्यांवर तो आपले मन, बुद्धी, प्रज्ञा वापरून वेळोवेळी मात करीत असतो. आपली उन्नती कशात आहे, हे प्रत्येकालाच समजत असते. जीवनात शेती सोडून इतर क्षेत्रात जी माणसं प्रगती करतात, दैदीप्यमान यश मिळवितात. तेव्हा त्यांना तू हे कर, ते करू नकोस म्हणून सल्ला देत नाही. शेतकरी समोर आला म्हणजे तिथे मात्र ही 'बुवाबाजी' मोठ्या प्रमाणावर आढळून येते. कोणताही उद्योग-व्यवसाय जर तो करणाऱ्या लोकांच्या उत्कर्षास कारणीभूत ठरत असेल, तर त्या व्यवसायात जे जे काही नवीन येईल ते ते लोक स्वीकारतात. पण जो व्यवसाय कायम तोट्यातच आहे. हे वर्षानुवर्षाच्या अनुभवाने सिद्ध झाले असेल, तर ती माणसं सभोवतालच्या परिस्थितीत कसलाच बदल होत नाही हे पाहून मनाने खचून जातात. आत्मघाताचा मार्ग अवलंबितात. आज निघणारे हे मोर्चे त्या मुक आक्रंदनास वाट करून देत आहेत. डॉ. भारत पाटणकर म्हणाले ''हे मुक मोर्चे म्हणजे पीन न काढलेला टाईम बॉम्ब आहे.'' शरद जोशींनी उभी केलेली चळवळ आणि मांडलेला शेतकऱ्यांच्या उन्नतीचा विचार, याची दखल राज्यकर्त्यांनी वेळीच घेतली असती तर असे इतके स्फोटक वातावरण महाराष्ट्रात निर्माण झाले नसते. हा या मोर्चाच्या रुपाने संघटीत होत असलेला उद्रेक हा कुठल्याही नक्षलवादी चळवळी पेक्षा कमी दाहक नाही, याची योग्य दखल सर्वांनीच घेतली पाहिजे.

या सर्व अवती भोवतीच्या स्फोटक वर्तमान वास्तवाची लेखक, कवी म्हणून आपण दखल कशी घ्यायची? शरद जोशींनी ग्रामीण साहित्यिकांविषयी जो आक्षेप नोंदविला, त्याचे कारण म्हणजे ते म्हणायचे, ''शिकलेली माणसं नीट विचार करतात यावर माझा विश्वास नाही. बहुसंख्य शिक्षित लोक मग ते शेतकरी कुटूंबातून का आलेले असेनात, ते डोक्याने विचार करीत नाहीत; तर खिश्याने विचार करतात.'' यामुळे सगळी गडबड होते. आपण ज्या साहित्यिकांची आणि त्यांच्या साहित्य कृतींची दखल घेतली, ती डोक्याने विचार करणारी आहेत. पण याचे प्रमाण अत्यल्प आहे. शेतकऱ्यांविषयी खोटे लिहिणाऱ्यांचे प्रमाण आजही प्रचंड आहे. स्वतः शेती करणारा शेतकरी तर लिहीत नाही. एका बहिणाबाई चौधरीचा किंवा ताराबाई शिंदे यांचा अपवाद केला तर कोणा शेतकरी स्त्रीने काही लिहिले नाही. शेतकऱ्यावर आणि शेतकरी स्त्रियांवर लिहिणारे लेखक, लेखिका आहेत. पण स्वतः शेतकरी स्त्री-पुरुषांनी लिहिलेले फारसे आढळत नाही हे असे का व्हावे? थोर गांधीवादी विचारवंत अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी ''माझी घडण'' या आत्मवृत्तात एके ठिकाणी नमूद केले आहे की, ''खेडेगावात जाऊन श्रमजीवी बनावे, याचे मला फार आकर्षण होते, पण जेव्हा मी हा प्रयोग केला तेव्हा आठ-दहा तासांच्या श्रमानंतर विचारशक्ती क्षीण होते असा अनुभव मला आला.'' प्रत्यक्ष शेती करणारी माणसं का लिहीत नाहीत, याचे रहस्य हे तर नसावे? यातून तर सर्व अनर्थ घडत नसावा? तेव्हा शेतकरी कुटूंबातून आलेल्या तुम्हा-आम्हावरील जबाबदारीचे भान यावे. दलित समाजावर देखिल हजारो वर्षापासून अनन्वीत अन्याय, अत्याचार झाले. पण तो अन्याय सहन करणारे पिढ्यान पिढ्या सहनच करीत राहिले. लिहिले कुणी फारसे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा त्या गुलामगीरीची जाणीव करून दिली अन् लढा उभारला तेव्हा दलित साहित्य जन्मास आले. 'कोंडवाडा' या कविता संग्रहातील दया पवारांची एक कविता आहे.

**आज विषाद वाटतो, कशा वागविल्या मणामणाच्या बेड्या**
**चिखलात हत्तीचा कळप रुतावा**
**तशा इच्छा, आशा आकांक्षा रुतलेल्या**
**शिळेखाली हात होता**
**तरी नाही फोडला हंबरडा**

आज आपणास ही या शेतीच्या कर्दमात अडकून आपण कसे गुलामगिरीचे जिणे जगत आहोत याची जाणीव शरद जोशींमुळे झाली. हातात शस्त्र घेऊन हिंसक होणं आपणासाठी अशक्य नव्हतं. पण बलाढ्य दमण यंत्रणा हाती असलेल्या राज्य सत्तेविरुद्ध लढणं म्हणजे पुन्हा आत्मघात. म. गांधींनी ही कधी इंग्रजाविरुद्ध लढताना अशा आतताई मार्गांचा अवलंब करण्याची परवानगी देशवासियांना दिली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तो मार्ग अवलंबिला नाही. आपण शेतकरी संघटनेच्या आंदोलनात ही एवढ्या हुतात्म्यांचे बळी जाऊनही हिंसाचाराचा आसरा घेतला नाही. पण आज शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ज्या पद्धतीने दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. ते पाहता, शेतकऱ्यांच्या मुलांच्या मनातील संयम कुठवर टिकेल या विषयी मन सांशक बनते. पण आज आपणापुरता विचार करायचा म्हटले तर स्वतः वर किंवा स्वतःच्या आई-वडिलांवर झालेल्या अन्यायाची चिड येऊन माणसास हिंसक होता येणे आणि हाती शस्त्र घेऊन समोरच्या माणसांचे मुडदे पाडणे खूप सोपे असते. पण त्या वेदनेचे आणि संतापाचे रुपांतर कवितेमध्ये करून शब्दांद्वारे ती वेदना, तो संताप व्यक्त करणे खूप कठीण आणि जिकीरीचे असते. आपल्यातील हिंसक उर्मींना म्हणजे एका परिने स्वतःलाच मारून टाकण्या ईतके ते अवघड असते. आपणास जे करावयाचे आहे ते हे आहे.

**- डॉ. शेषराव मोहिते**
**'जागल' यमुना हाऊसींग सोसायटी**
**बांधकाम भवना मागे, लातूर**
Email : smmohite16@gmail.com


दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास
संशोधन संस्था, गडचिरोली
रजि.नं. १८०/७२
ग्रामीण आदिवासी
विभागात प्राथमिक शाळेपासून ते
महाविद्यालयापर्यंत कार्यरत असलेली
शिक्षणसंस्था
समस्त विद्यार्थी, शिक्षकवृंदास
दीपावलीच्या पावन पर्वावर
सुखमय भविष्याच्या
हार्दिक शुभेच्छा
स्व. गोविंदराव मुनघाटे
संस्थापक अध्यक्ष
स्व. कमलबाई मुनघाटे
महाराष्ट्र शासनाचा
उत्कृष्ठ शिक्षण संस्था
पुरस्कार - १९९७
आदिवासी सेवा संस्था
पुरस्कार - १९९४
इंदिरा गांधी
फाऊंडेशन दिल्लीचा
आदिवासी संस्था
पुरस्कार-२००५
डॉ. राजाभाऊ मुनघाटे
अध्यक्ष
आर.के.ठाकरे
उपाध्यक्ष
डॉ. प्रमोद मुनघाटे
सचिव
सुरेश लडके
सदस्य
अ.गो.बंदे
सदस्य
पी.एन.म्हशाखेत्री
सदस्य
एस.डी. दुधमोचन
सदस्य
अनिल मुनघाटे
सदस्य
डी.एन.नरुले
सदस्य
नामदेव बानबले
सदस्य
संस्थेद्वारे चालविण्यात
• येणारे उपक्रम •
श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा
विद्याभारती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुराडा
विद्याभारती कन्या हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, गडचिरोली
आश्रमशाळा चांदाळा
राम्नगर प्राथमिक शाळा, गडचिरोली
जिल्हा कॉम्प्लेक्स हाय. व कनिष्ठ महाविद्यालय कॉम्प्लेक्स गड.
विद्याभारती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, आंबेशिवणी
विद्याभारती हायस्कूल गोगांव
आश्रमशाळा, मुरमाडी
प्रज्ञा संस्कार कॉन्व्हेंट सोनापूर कॉम्प्लेक्स, गडचिरोली
जिजामाता मुलींचे वसतिगृह, गडचिरोली

# तिसरे अ. भा. शेतकरी साहित्य संमेलन, गडचिरोली
# प्रमुख अतिथीचे भाषण : डॉ. किशोर सानप



तिसऱ्या शेतकरी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते, उद्घाटक सर्च या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या सेवाभावी संस्थेचे समाजसेवी कोवळी पानगळकार मा. डॉ. अभय बंग, स्वागताध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते मा. शालिक पाटील नाकाडे, अ. भा. शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष-शेतकरी संघटनेचे धडाडीचे झुंजार कार्यकर्ते-संमेलनाचे कार्याध्यक्ष कवी-लेखक गंगाधर मुटे, विशेष अतिथी मा. संजय पानसे, कृषी अर्थतज्ज्ञ, मा. योगीताताई पिपरे, नगराध्यक्षा आणि शेतकऱ्यांविषयी आस्थाभाव असणारे सर्वच उपस्थित लेखक-कवी-पत्रकार-आयोजक-पदाधिकारी-रसिक-जाणकार-मायबापहो!

कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेतीसाहित्याचा शेतीतील प्रत्यक्ष वास्तवाशी काही संबंध उरला आहे किंवा नाही, याचा शोध घेण्यासाठी; कृषिजगताला भेडसावणाऱ्या समस्यांची मराठी साहित्यविश्वाशी सांगड घालण्यासाठी; नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांना शेतीचे अर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी आणि मराठी साहित्यक्षेत्राकडून कृषिजगताला असलेल्या अपेक्षांची जाणीव करून देण्याच्या हेतूने; अ. भा. शेतकरी साहित्य चळवळीतून साहित्य संमेलनाच्या माध्यमाने, शेतकऱ्यांच्या कल्याणाचे अर्थशास्त्र आणि साहित्यसृजनाला मूर्तरूप देण्यासाठीच अ.भा. शेतकरी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते; ही सुस्पष्ट भूमिका अ. भा. शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष आमचे मित्रवर्य गंगाधर मुटे यांनी स्पष्ट केली आहे. भूमिका आणि कार्यकर्ता स्वच्छ, स्पष्ट असेल तर कृषिजगताला आबाद करणारी आर्थिक संपन्नता आणि सांस्कृतिकताही विश्वेश्वराकडून-निसर्गाकडून पसायदानाच्या रूपात समाजाला मिळण्याची शक्यता असते.

समाज, शासन आणि सांस्कृतिक क्षेत्रांत कृषिजगताकडे कसे पाहिले जाते? याचा आत्मशोध घेतला की गंगाधर मुटेची पोटतिडिकही लक्षात येते. मुख्यत्वे ग्रामीण साहित्यातून गावगाड्याचे आणि शेतकऱ्यांचे जीवन-वास्तव मांडण्याचा प्रयत्न खूप आधीपासूनच झालाय. शेतकऱ्यांची भाषा, शेती, हालअपेष्टा,जीवन जगण्याची निसर्गशैली आदींचे चित्रण आभासी परंतु मनोरंजनाच्या पातळीवर सुरूवातीला झाले, हेही खरे आहे. विनोदी साहित्य म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहिले गेले. हेही खरे आहे.

साठोत्तरी कालखंडात कवी विठ्ठल वाघ, सदानंद देशमुख, शेषराव मोहिते, भास्कर चंदनशीव, बाबाराव मुसळे, कैलास दौंड अशा काही मोजक्या खुद्द शेती कसणाऱ्या शेतकरी साहित्यिकांनी मात्र शेतकऱ्यांच्या जीवनाची वाताहत-आत्महत्या-दुष्काळ-अशा सर्वहारा अंगाने शेतकऱ्यांचे जीवन-वास्तव आपल्या सृजनशीलतेतून मांडले. मुळातच सृष्टीच्या जगद्व्याळात जन्मणाऱ्या प्रत्येकाची नाळ सृष्टीच्या पालनकर्त्या-पोषणकर्त्या-संतवृत्तीने बुडित धंद्याचा शेती-व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांशीच जुळलेली असते. परंपरागत शेती कसण्याची पद्धत कालबाह्य झाली. परंपरागत शेतीत केवळ कर्जच पिकते. पिकलेले भरमसाठ कर्ज स्वाभिमानी शेतकऱ्याला आत्महत्या करायला प्रवृत्त करते. शेतकऱ्याचाच घास घेते, बळी घेते. शेती आणि नफ्याची सांगड घालणारे तंत्रज्ञान कार्पोरेट ॲग्रीकल्चरने-सेझ कल्चरने ग्लोबल युगात अंमलात आणले आहे. तसे लहान लहान गटशेतीचे प्रकल्प गावोगावी उभारून शेतीची लागवड केवळ नफ्यातच होईल, यासाठी शेती आणि शेतकऱ्यांसाठी कळवळा असलेल्या शासनाने, समाजाने, स्वयंसेवी संघटनांनी निरपेक्ष पुढाकार घेण्याची आज आवश्यकता आहे. कारण, शेतकरी हा सृष्टीतील चराचराला जगवणारा अन्नदाता आहे. तो नसला तर या सृष्टीचाही प्रलय अटळच आहे. शेतकरी जगला तर जग जगेल. शेतकरी मेला तर जगही मरेल! शेतकरी आत्महत्या करतो, ही टोकाची निरीच्छाच त्याच्या अंतःकरणात का प्रवेश करते? याचाही शोध घेण्याची गरज आहे.

आज आपण भौतिक सुखसोयीत जगण्याचे गुलाम झालो आहोत. आपल्याच सुखाच्या वर्तुळात आपण जगतो. व्यवस्थाही सुखेनैव जगत आहे. जगातल्या तमाम समस्यांकडे दुर्लक्ष झाले तरी त्यामुळे जगबुडी होणार नाही. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र जर असेच अखंड-अविरत सुरू राहिले तर या सृष्टीला जन्माला घालणारे-सृष्टीचे पालनपोषण करणारे लोकच या ग्लोबल व्हिलेजमध्ये माणसांना जन्माला घालण्यासाठी भविष्यात शेष

उरणार नाहीत. मायबापच नसले तर माणसांच्या सृष्टीची उत्पत्ती तरी कशी होईल? हाच खरे तर ह्या वर्तमानातला कळीचा मुख्य मुद्दा आहे...

मुख्य मुद्दा हा आहे की, संतप्रवृत्तीने जगासाठी जगणाऱ्या सृष्टीच्या पालनहाऱ्याविषयीचा खोलवरचा करुणाभाव-कर्तृत्वभाव-जग्गदाताभाव एकूणच सृष्टीला जगवणाऱ्या व्यवस्थेला कितपत जाणवला आहे; याचाच खरे तर शोध घेण्याची गरज आहे. असेही लक्षात येते की, जगात शेतकऱ्यांविषयी केवळ कोरडी सहानुभूतीच शेष आहे. गांधीजींच्या तीन बंदराची अवस्था जगभर दिसते आहे. शेतकऱ्यांविषयी काहीही बोलायचं नाही. शेतकऱ्यांच्या बुडीत जगाविषयी काहीही ऐकायचे नाही. मृत्यूपंथाला कवटाळणाऱ्या शेतकऱ्यांची मढीही पाहायची नाहीत. समाज, शासन, साहित्य, संघटना अशा सर्वच स्तरांवर गांधीजींचे तीन बंदर सृष्टीच्या तारणहाऱ्याला केवळ वाकुल्या दाखवीत आहेत. मित्रहो, इतकी उदासिनता असेल आपल्याच जन्मदात्याकडे पाहण्याची तर या नव्या जगाला नक्कीच भवितव्य नाही.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीने देशाचा विकास मोजला जातो, हीच मूलभूत चूक आजवर आम्ही करीत आलो आहोत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीलाही शेतकऱ्यांचीच मुलं जगभर उपयोगी पडल्याचे वास्तव आहे. मायबाप शेतकऱ्यांची प्रगती झाली तरच त्यांची मुलं ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांत प्रगती करायला पुढे येतील. मायबापांच्या जीवनात, शेतीच्या तंत्रज्ञानाने-मार्केटिंगच्या प्रयोगाने शेतीचा व्यवसाय नफ्यातच कसा आणता येईल? याचा आधी शोध घ्यायला हवा. शेतीचा विकास हाच खरे तर उद्योग-धंदे-विज्ञान-तंत्रज्ञानाचाही विकास मानायला हवा. कोणत्याही देशाच्या विकासाचे मूलभूत स्त्रोत, क्षेत्र कृषी-सृजनशील जमीन-नैसर्गिक संपत्ती हेच असते. कृषिवलांची भूमी-कृषिसह कृषिवलांची प्रगती कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मोजमाप करण्याचेच मुख्य स्त्रोत असले पाहिजे. मापदंड असला पाहिजे. शेतकऱ्यांच्या जीवनाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीनेच, देशाच्या विकासाचे मोजमाप करण्याचा पायंडा कसा पडेल? याचीच चिंता करण्याचा हा काळ आहे. शेती आणि शेतकऱ्यांकडे पाहण्याची उदासिन दृष्टीच मुळातून बदलायला हवी.

हा बदल हळूहळू समाजात रुजतो आहे. जगात सर्वात आधी परिवर्तन व्हायला हवे असे हे शेतीचे मूलभूत क्षेत्र आहे. बाकी परिवर्तन आपोआपच होईल. आपल्या देशात-किमान महाराष्ट्रातल्या काही भागात सेवाभावी कार्यकर्ते आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांनी शेतीच्या आर्थिक विकासाचे प्रयोग नेटाने सुरू केलेले आहेत. मराठवाड्यात काही सामाजिक संघटनांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मुलं एकत्र करून, जनजागृती दिंडी दरवर्षी राज्यात १५ दिवस गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना जगण्याची हिंमत देताना-आमचे आईवडील सोडून गेले आणि आम्ही पोरके झालो. आईपासून दूर एका आश्रमशाळेत शिकतो. तुमच्या मुलाबाळांची परवड होऊ नये असं वाटत असेल तर आत्महत्या करू नका...तुमच्या मुलांना आश्रमशाळेत शिकावं लागू नये म्हणून तरी आत्महत्या करू नका...असा संदेश देतात. ही लहान मुलं गावोगावी शेतकऱ्यांना शपथ देऊन त्यांच्याकडून, काहीही झाले तरी आत्महत्या करू नका, असं वचन घेतात.

गेल्या तीन वर्षांपासून दिंडीचा उपक्रम राबविणाऱ्या त्र्यंबक गायकवाडांच्या मते, तशी मदत देणारे खूप आहेत. या मुलांना त्रास होऊ नये म्हणून सर्वतोपरी सहकार्यही मिळतं, पण असं आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना सांभाळायचं काम पुढे उभंच राहू नये, अशी परिस्थिती निर्माण करणं आवश्यक आहे. ते केवळ निसर्गावर अवलंबून नाही. त्यासाठी सरकारलाही नीट धोरणं आखावी लागतील...गटशेतीसाठी काम करणारे भगवान कापसे यांच्या मते, बहुतांश आत्महत्या करणाऱ्यांच्या शेतीचा आकार आक्रसलेला असतो. तो वाढविण्यासाठी गटशेती हा अत्यंत चांगला मार्ग आहे. जालना आणि औरंगाबाद जिल्ह्यात तीन हजार शेतकरी आता गटशेतीचा प्रयोग करीत आहेत. उत्पादन खर्चात होणारी बचत आणि मालाला एकत्रित बाजारपेठ मिळत असल्याने अनेकांचे आयुष्य बदलू लागले आहे. काही नवे प्रयोग करण्यासाठी व गावोगावी गटशेतीला प्रोत्साहित करण्यासाठी कार्यकर्ते निर्माण व्हायला हवेत. तरच शेती परवडेल...शेतीसमस्या सोडविण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या मुलांच्या भवितव्यासाठी गावोगावी शेतीसमस्या सोडविणारे-शेती करणारे कार्यकर्ते व राबणाऱ्याची गरज आहे. (दिंडी चालली...पोरक्या मुलांची, शेतकरी जागृतीसाठी...रविवार लोकसत्ता, मुखपृष्ठावरील वृत्तांत, दि. १५ जानेवारी २०१७ ) गटशेती हा एक चांगला उपाय मराठवाड्यात सुरू आहे, तो देशपातळीवर राबवायला समाज-शासन-संघटना-कार्यकर्ते आदींनी पुढे येण्याची गरज आहे.

जेष्ठ गांधीवादी कार्यकर्ते, आयआयटी दिल्ली आणि चेन्नईत प्राध्यापक राहिलेले, तामिळनाडूच्या गांधीग्राम आणि मध्य प्रदेशातील चित्रकूट विद्यापीठाचे कुलगुरू राहिलेले सेवाभावी कार्यकर्ते डॉ. करुणाकरन वर्तमानात गांधीग्राम-वर्धा येथे स्थायिक झाल्यावर त्यांनी स्मार्ट किसान कृतिकार्यक्रम आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना सोबत घेऊन वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यात राबवला. डॉ. करुणाकरन या अभ्यासू माणसाच्या मते, आत्महत्या शेतकऱ्यांची नाही, तर शेतीची होत आहे. एकही शेतकरी आपल्या मुलाला शेतकरी करण्यास तयार नाही. असे असेल, तर या कृषिप्रधान देशाचे भवितव्य काय? शेती फायदेशीर आणि सन्मानजनक होत नाही, तोपर्यंत ती वाचणे कठीण आहे. शेतीला वाचवले तरच शेतकरी वाचेल! शेती सन्मानजनक केली तरच शेतकऱ्यांची मुलंही शेती करतील. यातूनच डॉ. करुणाकरण यांनी स्मार्ट शेती-स्मार्ट किसान योजना प्रत्यक्ष अंमलात आणली. वर्धेजवळील दत्तपूर गावी महारोगी सेवा समितीच्या पडून असलेल्या

१८० एकर शेतजमिनीवर आत्महत्या करणाऱ्या व इतरही दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या-शेतमजूरांच्या मुलांना प्रशिक्षित करून, ॲग्रींडस(ॲग्रीकल्चर इंडस्टी)प्रकल्प उभारून, शेतकऱ्यांच्या मुलांना स्मार्ट किसान बनवून; शेती करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा विधायक आणि फायदेशीर शेती करण्याचा साक्षात उपक्रम डॉ. करुणाकरन सेवानिवृत्तीनंतरच्या काळात सेवाभावीपणे राबवीत आहेत.

लोकसत्ताचे वर्धाजिल्हा प्रतिनिधी, सुप्रसिद्ध पत्रकारमित्र प्रशांत देशमुख यांनी प्रत्यक्ष क्षेत्राचे आणि प्रशिक्षण संस्थेचे सर्वेक्षण करून लोकसत्ता मध्ये विस्तृत वृत्तांत देताना म्हटले, शेतकरी आत्महत्या का करतात? काय आहे त्यांचे दुखणे? केंद्र आणि राज्य सरकारने आजवर अब्जावधी रुपयांची पॅकेजे दिली. परंतु वाळूत पाणी टाकावे तसे त्या पैशाचे झाले. प्रश्न जागच्या जागीच राहिला, का थांबत नाहीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या? अनेकांच्या मनाला या सवालांच्या इंगळ्या डसत आहेत. अनेक जण या ना त्या प्रकारे या प्रश्नाला भिडण्याचा प्रयत्न करीत आहेत. डॉ. करुणाकरन हे त्यातलेच एक. त्यांनी या प्रश्नाचा आधी अभ्यास केला आणि आपल्या परीने त्यावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला. त्यातून उभे राहिले स्मार्ट किसान असे उपक्रम आणि उपक्रमशील कार्यकर्ते पाहिले की आपल्या समोरील कलंकमुक्तीचे आव्हान या महाराष्ट्राला नक्कीच पेलता येईल, असा विश्वास जागा होतो...(आव्हान कलंकमुक्तीचे...पेरणी स्मार्ट किसानांची!...पत्रकार प्रशांत देशमुख, वर्धा, रविवार लोकसत्ता, पृष्ठ ६ वरील सविस्तर वृत्तांत, दि. १५ जानेवारी २०१७ )

डॉ. करुणाकरन यांचा स्मार्ट किसान प्रशिक्षण कृतिकार्यक्रमही देशपातळीवर आणि राज्यपातळीवर केंद्र-राज्य सरकारनेही राबवायला हरकत नाही. कृषि खात्याचे अधिकारी, मंत्री, पॅकेजेस, धोरणे म्हणजे; वाळूत पाणी जिरवल्यासारखेच होणार. लालफितीपेक्षा डॉ. करुणाकरन आणि तत्सम सेवाभावी कृषितज्ज्ञांची आणि संस्थांची शासकीय समिती बनवून कोणताही सरकारी हस्तक्षेप न करता जर शासनस्तरावर शेतकरी आणि शेती वाचवण्याचे आवाहन कळकळीनं शेतकऱ्यांविषयी आस्था असणाऱ्या व्यवस्थेनं जबाबदारीनं, निरपेक्षभावानं, अभ्यास करून यशस्वी केल्यानं शेतीही वाचेल आणि शेतकरीही जगतील. शेतकऱ्यांची मुलंही शेतीचा नफ्यात चालणारा व्यवसाय-उद्योग करण्यासाठी पुढे येतील. देश आणि अन्नदाता वाचवण्याचे महत्कार्य सर्वच क्षेत्रांच्या अग्रणी असलेल्या मूलभूत शेतीच्या क्षेत्रात प्राथमिक मानून, अग्रक्रमाने केल्यानेच सृष्टीच्या निर्मार्त्याला न्याय मिळण्याची शक्यता आहे. हे होणे गरजेचे आहे, इतके जरी या अ. भा. शेतकरी साहित्य संमेलनातून शेती आणि शेतकऱ्यांविषयी आस्था असणाऱ्यांनी, आपल्या आयुष्यात अग्रक्रमाने साहित्य-संस्कृतीत उमेदवारी करणाऱ्यांनी, समाजसेवेत उमेदवारी करणाऱ्यांनी; सामाजिक व शासकीय स्तरांवर जागृतीद्वारे केले; तरी शेती वाचेल, जगही वाचेल, शेतकरीही वाचतील...
जगभरातल्या समाजाने, शासनाने, संघटनांनी, नव्या पिढीने शेतकऱ्यांच्या आणि गावाच्या विकासासाठी विधायकपणे-अथकपणे-सेवाभावाने शेतीच्या अर्थशास्त्राची आर्थिक प्रगतीच्या दृष्टिकोणातून पुनर्मांडणी इमानेइतबारे करण्याची गरज आहे. तेव्हाच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना पूर्णविराम मिळेल.

तूर्त तरी आम्ही सर्वच या भूतलावर अन्नदात्याच्या दयेनं जगणारी माणसं; महाविनाशाच्या ह्या युगात जगबुडीच्या भयाने, दहशतीने अस्वस्थच आहोत!...मार्ग आहे. व्रतस्थपणे; साहित्य, संस्कृती, समाज, शासनाला स्मार्ट किसान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा कृतिशील संदेश; या संमेलनाच्या-चळवळीच्या माध्यमाने देऊन, प्रत्यक्ष अंमलबजावणीवर लक्ष ठेवून, जर लोकजागृती झाली, तरच या देशाला आणि जगालाही भवितव्य आहे...अन्यथा; कुणाला कशाशीच काहीही घेणेदेणे शेष नसतानाच्याही ह्या ग्लोबल काळात; जगाचे सर्वच जैविक व्यवहार रामभरोसे सुरळीत सुरू आहेत... जहाँ डाल डाल पर सोने की चिडियाँ करती है बसेरा, वो भारत देश है मेरा, वो भारत देश है मेरा, ह्याच आभासी वास्तवात आजही आम्ही जगत आहोत... केव्हा जगबुडी येईल! त्याची वाटच आम्ही पाहत आहोत...जय स्मार्ट किसान!

**-डॉ. किशोर सानप**
**कमला नेहरू शाळेजवळ, रामनगर, वर्धा-४४२००१**
**दूरध्वनी-९३२६८८०५२३, ९४२२८९४२०५**
email-dr.kishorsanap@gmail.com
web-www.kishorsanap.com

*तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!*

**दिपकभाई चांडक**
**मु.पो. वायगाव (नि.) ता.जि. वर्धा**

**रविभाई राठी**
**मु.पो. वायगाव (नि.) ता.जि. वर्धा**

**मिराणी कृषी केंद्र**
**प्रो. बिपीनभाई मिराणी**
**मु.पो. वायगाव (नि.) ता.जि. वर्धा**

Instant Unique Fertility

**UPS AGRO**
IMPEX PVT LTD

Official Representative for
**Alliance In Motion Global Inc.**
Stay healthy & grow wealthy

**Prasad Sardesai**
Managing Director
Cell : 7387160688

तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनास
भूमीपुत्र संघर्षवाहिनीकडून
मन:पुर्वक शुभेच्छा



**शुभेच्छूक**

१. गजानन बोरोकार, अकोला
२. अमिताभ पावडे, नागपूर
३. अनिल बोंडे, अकोला
४. शिवकुमार चांडक, बुलढाणा
५. प्रकाश साबळे, अमरावती
६. अविनाश जोगदंड, वाशिम
७. प्रशांत देशमुख, वर्धा
८. तेजस्वी पाटील बारब्धे-लाहुडकर, अमरावती
९. रितेश घोगरे, वर्धा
१०. बालाजी हेंदरे पाटील, नांदेड
११. अभिजीत फाळके, पुणे

**Mr. Ramesh H. Bisani**
Ph.No.(07152) 245197
Mob. No. 9404042877

**BISANI TRADING CO.**
E-mail : bisanitradingcompany14@gmail.com

**Authorised Dealer :**

- ZUARI AGRO CHEMICALS LTD.
- MAIDC LTD./
  WARAD FERTILIZERS/
  K.P.R. FERTILIZERS

3, Maheshwari Market,
Main Road, WARDHA- 442001
(M.S.)

**कृषी उत्पन्न बाजार समिती**
गडचिरोली

कृषी उत्पन्न बाजार समिती, गडचिरोली तर्फे
मराठी शेतकरी साहित्य संमेलना प्रित्यर्थ
गडचिरोली जिल्हा वासियांना
हार्दिक शुभेच्छा!

**नरेंद्र राखडे**
प्रभारी सचिव
कृ.उ.बा.स.
गडचिरोली

# तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे उद्घाटक डॉ. अभय बंग यांच्या भाषणातील काही ठळक मुद्दे




वर्षापासून ग्रामिण भागात आरोग्य सुधारणेचे मी आणि राणी बंग काम करत असताना खेड्यातील शेतकऱ्यांचे वास्तव जवळून पाहिले. ग्रामीण शेतीशी संबध आल्याने स्वाभाविकपणे मी शरद जोशीच्या संपर्कात आलो. १९८० मध्ये जेव्हा शरद जोशी पहिल्यांदा विदर्भात आले आणि वर्धा जिल्ह्यातील रवी काशीकरांच्या शेतावर बैठक झाली तेव्हा १०-१२ मंडळी होती त्यात मीही एक होतो. सटाणा येथील शेतकरी संघटनेच्या अधिवेशनाला उत्सुकतेने गेलो, सहभाग घेतला, त्यानंतरच्या रस्ता रोको आंदोलनात सुध्दा मी सक्रीय सहभागी झालो. पुढे माझ्या कार्याचे विषय आणि कार्यक्षेत्र बदलले पण शरद जोशी सोबत १९८० मध्ये जुळलेला स्नेह शेवटपर्यंत कायम राहिला. मी त्यांचा अनुयायी नसलो तरी प्रशंसक आणि स्नेही होतो.

संपूर्ण भारतभर शेतकरी रस्त्यावर यायला लागला आहे. महाराष्ट्रात मराठ्यांचे असो, गुजरातेत पटेलांचे असो, अथवा उत्तरप्रदेश - हरियानात जाटांचे असो, या सर्व आंदोलनामागे शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नाही हेच मुलभूत कारण आहे.

अमेरिका - कॅनडात सुद्धा शेती फ़ायद्याची राहिली नसून तिथल्या एका मका उत्पादक शेतकर्यावर सुमारे २० कोटी रुपयाचे कर्ज असल्याचा उल्लेख एका पुस्तकात मी वाचला आहे. सदर शेतकरी प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेती करतो, फ़वारणी करायला हेलीकॅप्टरचा वापर करतो, बहुराष्ट्रीय कंपन्यांशी करार करुन त्यांना हवे तसे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण उत्पादन करुन देतो तरीही तो शेतकरी वेठबिगारासारखे जीवनमान जगत असतो.

शेतकऱ्यांच्या अवस्थेचा प्रश्न भारतापुरता मर्यादित राहिला नसून जागतिक झाला आहे. शेतकऱ्यांची स्थिती सुधारेल असे तात्काळ काहिही संकेत दिसत नाहीत. शेती साहित्यिकांनी वेळीच काळाची चाहुल ओळखून स्वत:ला तयार केले पाहिजे.

राज्यात ५५ टक्के जनता खेड्यात राहाते, फक्त ४० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. आज महाराष्ट्रातच शेतकरी अल्पसंख्यांक झाला आहे. महाराष्ट्रात शेतीचा स्टेट जिडीपीचा वाटा फक्त ११ टक्के उरला आहे. शेतकऱ्यांची राजकिय सत्ता संपली आहेच पण राज्यात कॉंग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता जाऊन भाजपची सत्ता आल्यानंतर शेतकऱ्यांच्या राजकिय सत्ता देखील संपायला लागली आहे. शेतकऱ्यांच्या जागी व्यापारी व व्यावसायीकांची सत्ता प्रस्तापित होत आहे. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस निर्बल होत चालला आहे.

क्लायमेट चेंज व ग्लोबल वार्मिंग हे शेतीवर येऊ घातलेले संभाव्य संकट असून जागतिक बदलत्या हवामानाचा फटका सर्वात जास्त शेतीलाच बसण्याची शक्यता आहे.

अस्सल शेती साहित्य निर्माण करायचे असेल तर पुण्या-मुंबईची सुशिक्षित शहरी व प्राध्यापकी भाषेचे अनुकरण करण्याऐवजी शेतीतील अनुभुतीचा प्रामुख्याने विचार करुन वास्तवाला प्राधान्य दिले पाहिजे. रोज शेतकरी आत्महत्या करत आहेत, रोज शेतकऱ्याची मुलं उपाशी झोपत आहेत. शेतीतली धग साहित्यात आली पाहिजे. शेतकरी साहित्य निर्माण करणे हे सतीचे वाण आहे, हे साहित्यिकांनी समजून घेतले पाहिजे.

आक्रोश आणि विलाप करण्यासारखी स्थिती आहे हे वास्तव असले तरी निव्वळ आक्रोश आणि विलाप करुनही उपयोग नाही कारण त्यातून फक्त निराशेचा गुणाकार होतो. साहित्यिक आमच्यापेक्षा बौद्धीकदृष्ट्या उंच उभे आहेत असे आम्ही मानतो म्हणूनच त्यांचेकडून अपेक्षाही व्यक्त करतो की त्यांनी जरा क्षितीजापलिकडले बघावे आणि शेतीची दुरावस्था संपविण्यासाठी प्रबोधन होईल असे कालभेदी साहित्य निर्माण केले पाहिजे.

गडचिरोलीतला आदिवासी त्याच्या मुलभूत हक्कापासून वंचित आहे. तोही शेतकर्यालसारखाच शोषित आहे. आदिवासींनी त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी हातात बंदूक घेतो आणि शेतकरी हातात विषाची बाटली घेतो. हातात बंदूक घेतल्याने किंवा विषाची बाटली घेतल्याने प्रश्न सुटले नाहीत, सुटणार नाहीत.

वनसंस्कृती व कृषिसंस्कृतीमध्ये जे लोक जगतात, निसर्गाच्या सानिध्यात जगतात, सगळ्या समाजासाठी अन्न उत्पादन करतात त्यांचा मार्ग कसा आणि कोणता याचा शोध शेतकरी साहित्यात घेतला जावा आणि असा शोध घेण्यासाठी ठरलेल्या चौकटीतून बाहेर पडण्याचे धाडस साहित्यिकांनी दाखवले पाहिजे.

**(शब्दांकन : प्रविण पोहाणे)**

# ऐकतो आहे पुन्हा एल्गार मातीचा...
# गझल मुशायऱ्याने शेतकऱ्यांच्या वेदनांना अधोरेखित केले




गडचिरोली दिनांक : २५ फेब्रुवारी २०१७

तिसरे अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलन दिनांक २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी संस्कृती सभागृह गडचिरोली येथे संपन्न झाले. या साहित्य संमेलनातील शेतकरी गझल मुशायरा खूप दर्जेदार झाला. गझल मुशायऱ्याला अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध गझलकार श्री. राज पठाण (बीड) हे लाभले होते. शेतकरी तथा शेतीवर आधारित गझल मुशायऱ्यात उपस्थित गझलकारांनी एकाहून एक सरस गझल पेश करून मुशायरा यशस्वी केला.

**गरिबा घरचे सदैव अर्धे पोट रिकामे**
**श्रीमंतांच्या दुरडीमध्ये रमते भाकर**

या शेरासह विनिता कुलकर्णी पाटील (लातूर) यांनी मुशायऱ्याचा आगाज केला. भाकरीसाठी पोशिंद्याची फरफट होते मात्र श्रीमंताच्या घरी अन्नाची नासाडी होते. हा आशय विनिता कुलकर्णी पाटील यांनी विषद केला. यानंतर विजय पाटील यांनी पावसावर आधारित गझल पेश केली. काही गोष्टींचं मूल्य पैशात मोजता येत नाही. बळीराजाच्या घामाचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे. घामाचे महत्त्व सांगणारा...

**अमुच्या घामाच्या थेंबानी आब राखला आहे**
**खतामुळे मातीला कोठे पोषक होता येते**

या नजीम खान (चिखली) यांच्या शेराने मैफलीला वेगळ्याच उंचीवर नेले. त्यांच्या

**वावराचा सातबारा पाहिला**
**कागदावर मी निखारा पाहिला**

ह्या शेतकऱ्यांच्या संघर्षमय जीवनाची हकीकत विशद करणाऱ्या गझलेला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. शेतकरी बापाचे चित्रण करणारी गझल चंद्रपूर येथील गझलकार श्री राम रोगे यांनी पेश केली त्यांचा...

**यातना ती जाणण्याला बाप व्हावे लागते**
**रिक्त पोटी जेवल्याचे सोंग घ्यावे लागते**
**शासनाचा चेक आला काय मी त्याचे करू**
**कुंकवाला जर चितेवर पेटवावे लागते**

या गझलेने सभागृह दणाणून टाकले. आपल्या देशाचे आर्थिकदृष्ट्या दोन भाग पडतात एक संपन्न इंडिया आणि दुसरा जनसामान्यांचा भारत. ही आर्थिक दरी चंद्रपूरचे गझलकार प्रा. राजेश देवाळकर यांनी अधोरेखित केली त्यांचा...

**कुणीच वाली जगात नाही अता बळीचा**
**म्हणून होतो दलाल इतका बळकट देवा**

या शेरातून आपल्या देशाची आर्थिक अगतिकता व्यक्त झाली. बळीराजाला जीवनाच्या प्रत्येक पावलावर लढावे लागते. बळीराजाच्या लढाऊ बाण्यावर आधारित...

**नसे सुखाचे जरी चांदणे बळ झुंजाया हाती दे**
**सूर्य तेवढा ठेवून जा मग खुशाल काळ्या राती दे**
**उंच उडाली जरी पाखरे घरट्यांसाठी झाड हवे**
**वादळवाऱ्यामधे टिकाया मुळास इतुकी माती दे**

ही गझल श्री रोशनकुमार पिलेवान (चंद्रपूर) यांनी पेश करून रसिकांची दाद मिळवली. तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या युवा शेतकऱ्याच्या हृदयांतील स्पंदनाना... 'सांग कुठले लावते अत्तर' या गझलेतून श्री. रवी धारणे (चंद्रपूर) यांनी व्यक्त करून मैफलीत शृंगार रस भरला.

अस्मानी आणि सुलतानी अशा दोन प्रकारच्या संकटांना

शेतकऱ्याला तोंड द्यावे लागते. शासनाच्या धोरणांमुळे अजूनही नैसर्गिक संसाधनावर आपली शेती अवलंबून आहे. पर्यावरणाच्या असमतोलाचा फटका थेट कोरडवाहू शेतीवर पडतो. हाच आशय व्यक्त करतांना...

**कुठे पाऊस ही धर्मास त्याच्या जागतो हल्ली**
**बळीला शासनागत नेहमी तो नाडतो हल्ली**

या शेरातून श्री. शरद धनगर (अमळनेर) यांनी पावसाच्या लहरीपणावर बोट ठेवले. त्यांनी

**'नको ना पुन्हा तो इशारा करू तू'** ही गझल पेश केली.

भारत देशाला १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले परंतु अद्यापही आपल्या देशाची यंत्रणा सामान्य नागरिकांच्या हातात आलेली दिसत नाही. ठराविक वर्गाच्या हातात ही व्यवस्था असल्याने बळीचे राज्य खऱ्या अर्थाने अजूनही आलेच नाही असे म्हणावे लागेल. व्यवस्थेची झळ सोसणाऱ्या शेतकऱ्याला जगण्यासाठी बळ देणारी...

**मरायचे आहे तर व्यवस्था मारून जा**
**तुझ्या हातचे विष तिलाही चारून जा**

श्री. विनय मिरासे (यवतमाळ) यांची ही गझल रसिकांना विशेष भावली. शेतकरी महिलेची जिद्द सांगणारी...

**अंधार वेचला मी वाटेत भेटलेला**
**माझ्याच वाटणीचा पुढ्यात साठलेला**

ही गझल चित्रा कहाते (नागपूर) यांनी पेश केली.

मराठी गझल गडचिरोली च्या मातीत रुजली आहे.याचा प्रत्यय या शेतकरी गझल मुशायऱ्यात आला. मुशायऱ्यात गडचिरोली च्या गझलकारांनी दमदार गझल पेश केल्या. बळीराजाची व्यथा... वेदना... त्यांचे दुःख सांगणारी तथा रसिकांच्या काळजाला हात घालणारी गझल...

**सुक्या शेतातली पडझड कधी कळते कुणाला?**
**सुन्या पोटातली कडकड कधी कळते कुणाला?**
**सदा घामात भिजतो देह पण मिळते.. निराशा**
**रित्या हातातली धडपड कधी कळते कुणाला..?**

गझलकार सुरेश शेन्डे (गडचिरोली) ह्यांनी पेश करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. अन्नधान्याचे पीक घेणारा शेतकरी दोन वेळचे जेवनही सुखाने करत नाही. हे जळजळीत सत्य गझलकार श्रीनिवास गेडाम (गडचिरोली) यांनी...

**मातीत राबणारे असतात अर्धपोटी**
**गाद्यात लोळणारे खातात तूपरोटी**

ह्या गझलेतून मांडले.व्यवसायाने पत्रकार असलेल्या मिलिंद उमरे (गडचिरोली) यांनी गडचिरोलीच्या मातीची व्यथा फार जवळून पाहिली आहे. गडचिरोलीच्या शेतकऱ्यांची उदारता त्यांनी...

**काळ्या आईची वचने पाळतो रे बळीराजा**
**पिकांसाठी जीवसुद्धा गाडतो रे बळीराजा**

या गझलेतून मांडली.मुळचे अकोल्याचे असलेले सद्या गडचिरोलीमध्ये पी.एस.आय. या पदावर सेवारत शिवकवी ईश्वर मते यांचा

**धरेवर बरसला, तहानी शमवल्या**
**मला वाटला तो, भला पावसाळा**

हा शेर विशेष भाव खाऊन गेला.श्री. वामन गेडाम (गडचिरोली) यांनी यावेळी कास्तकारांच्या वेदनेवर आधारित गझल पेश केली. शेतकरी पती पत्नी एकमेकांना सहाय्य करून संसाराचा गाडा हाकतात. एकमेकांशी त्यांची निष्ठा... कामाप्रती प्रामाणिकपणा... आणि समर्पित जीवन डॉ.देवराव चामनर (अंबेजोगाई) यांच्यागझलेतून व्यक्त झाले. त्यांच्या

**इतुके तरी पडू दे हातात पीक देवा!**
**औंदा तरी फिटू दे माझी पुरी उधारी**

या शेरातून बळीराजाची व्यथा व्यक्त झाली.वावराच्या मातीशी शेतकरी एकरूप होतो.मातीचा जिव्हाळा बळीराजाच्या काळजात असतो.आजन्म ज्या मातीच्या पदरात बळीराजाची हयात जाते त्या मातीप्रती शेतकरी कृतज्ञ असतो.मातीची हीच महती माझ्या गझलेत होती. मी पेश केलेल्या गझलेतील

**अजुनही वृद्धाश्रमाचा स्पर्श ना झाला**
**नांदतो गावामधे संस्कार मातीचा...**
**रोज पुजते, अंगणी काढून रांगोळी**
**माय करते केवढा सत्कार मातीचा...**

ह्या शेरांना रसिकांनी विशेष दाद देऊन आशिर्वाद दिला.

शेतकरी कायम शेतात घाम गाळतो.त्यांना केवळ मतदार या दृष्टीकोनातून आजवर येथल्या राज्यकर्त्यांनी पाहिले आहे.शेतकरी संघटनेचे कार्य करताना राज्यकर्त्यांच्या या नीच प्रवृत्तीचे वर्णन गझलकार गंगाधर मुटे यांनी आपल्या गझलेतून मांडले.

**कोणीतरी यांची आता, पडजीभ उपटली पाहिजे**
**नाटकी बोलतात साले, की गरिबी हटली पाहिजे**
**आत्महत्या बळीच्या तू रोख वामना**
**मी अभयदान इतुके मागून पाहिले**

या गंगाधर मुटे यांच्या पहिल्या शेरातील आक्रोशाला व दुसऱ्या शेरातील आर्जवाला सभागृहाने टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

शेतकरी गझल मुशायऱ्याला खरा न्याय दिला तो म्हणजे गझल मुशायरा चे बहारदार सुत्रसंचालन करणारे धुळ्याचे गझलकार विरेंद्र बेडसे यांनी. त्यांच्या सुत्रसंचालनाने गझल मुशायरा अधिक

रंगतदार झाला.

**रूजवले मातीत जाते मूळ येथे**
**मग कुठे झाडास मिळते खूळ येथे**
**या ढगांना जा जरा जाऊन सांगा**
**माणसे हतबल धरा व्याकूळ येथे**

त्यांच्या या गझलेतून दुष्काळी भीषणता प्रकट झाली.

बळीराजाला सततच्या दुष्काळाचा सामना करत स्थलांतर करावे लागते.त्याची हतबलता व्यक्त करणारी गझल मुशायऱ्याचे अध्यक्ष गझलकार श्री. राज पठाण (बीड) यांनी पेश केली. त्यांच्या

**पुन्हा डोंब पोटात डोळ्यात पाणी**
**मुकी जाहली काळजातील गाणी**
**जरी अन्न पाण्याविना लोक मेले**
**तुपाशीच राजा तुपाशीच राणी**
**तुझ्या इंडियाला दिसावीत केंव्हा...**
**कुपोषित हजारो मुले दीनवाणी**

या गझलेने मुशायऱ्याची सांगता झाली.

एकंदर शेतकऱ्यांच्या भावविश्वातील विविध अंगाना स्पर्श करणाऱ्या गझलांनी मुशायरा अधिक रंगतदार झाला.गडचिरोली सारख्या ठिकाणी मराठी गझल मुशायरा बहुधा हा पहिलाच असावा. गडचिरोलीकरांची गडचिरोली जिल्ह्यात पहिल्यांदाच झालेल्या या मराठी गझल मुशायऱ्याची नशा सहजासहजी उतरणार नाही हे मात्र नक्की. गडचिरोलीकरांना एक दर्जेदार गझल मुशायरा दिल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन...

**– निलेश श्रीकृष्ण कवडे**
**अकोला मो. ९८२२३६७७०६**

❖❖❖❖❖



**तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनात अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करताना**
**ॲड वामनराव चटप, राम नेवले, श्रीकांत उमरीकर, अनिल घनवट व राजेंद्रसिग ठाकूर**


***तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!***

| | |
|---|---|
| **सदानंद बोरकर**<br>उसराळ मेंढा, ता. नागभिड, जि. चंद्रपूर | **मोहन बोरकर**<br>उसराळ मेंढा, ता. नागभिड, जि. चंद्रपूर |
| **मुकेश बोरकर**<br>उसराळ मेंढा, ता. नागभिड, जि. चंद्रपूर | **देवाजी चचाणे**<br>वडसा, देसाईगंज, जि. गडचिरोली |

# शेतकरी कवी संमेलन भाग - २



तिसरे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन गडचिरोली येथे मोठ्या उत्साहात पार पडले. संमेलनात अनेक कार्यक्रमाची मेजवानी होती पण खरे आकर्षण ठरले ते शेतकरी कवी संमेलन. कवियत्री विनिता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली रंगलेल्या या कविसमेलनात महाराष्ट्रातील नवोदित कवींनी सहभाग घेतला होता. कवी संमेलनाचे सूत्र संचालन उत्कृष्ट पने सांभाळत किशोर कवठेकर यांनी सगळ्या कवींची ओळख करून दिली. कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांनी सगळ्या कवींचा मानचिन्ह देऊन प्रथम सत्कार केला. रवींद्र दळवी, नाशिक यांच्या लय झालं आता या कवितेने काव्य मैफिलीला सुरुवात झाली. त्यांनी कवितेतून शेतकऱ्याला आवाहन केले कि आता पुष्कळ झाले तू आता सहन करायचे नाही तर लढायला तयार व्हायचं. औरंगाबाद चे कवी संदीप ढाकणे यांनी बाप कविता सादर करून उपस्थित श्रोत्यांची वाहवा मिळवली. ''शेतकरी बाप माझा काय सांगू त्याची गाथा' या ओळी तुन बाप आणि त्याचे कष्ट उभे केले. बीड वरून आलेले केशव कुकडे यांनी 'रानपक्षी' हि कविता सादर करून बैलांप्रमाने राबणारा बाप सादर केला. 'बाप माझा गाड्या सुख पेरतो झोपडीत' अश्या ओळी तुन त्यानी बापाचे कष्ट विशद केले. अकोल्याचे अनिकेत देशमुख यांनी शेतकऱ्यांची आजची परिस्थिती सादर केली. 'टोपी गहन सावकाराच्या घरी, सरकार दलालांचे कशा उजवाव्या पोरी.' या कवितेने रसिकांना विचार करायला भाग पाडले. वाशिम चे कवी वैभव भिवरकर यांनी दुष्काळाच्या व्यथा अंगाईगीतातून सादर केल्या. मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया यांनी 'मूठभर माती' या कवितेतून काबाडकष्ट करून शेवटी हातामध्ये मूठभर मातीच येते हे सांगितले.

हिंगणघाटचे कवी धीरजकुमार ताकसांडे यांनी, 'कर्जाला कंटाळून बाप मेला पण जड जू मानेवर टाकून गेला' या आशयाची कविता सादर केली. लातूर येथील कवियत्री शैलजा कारंडे यांनी निसर्ग कविता सादर करून आपली व्यथा कवितेच्या माध्यमातून सादर केली. गडचिरोलीचे अशोक गडकरी यांनी 'कोणीच नाही वाली शेतकऱ्याचा' हि का आता सादर केली. हिंगणघाटचे कवि प्रा अभिजित डाखोरे यांची कविता भाव खाऊन गेली. 'राबणारा हात मी खुशीत पहिला, झोपडीत संसार हासीत पहिला, घामाचे दाम मिळाले का इथे कोणा, पण हा चमत्कार मी शरद जोशींत पहिला'.या कवितेसोबत संमेलन रंगत गेले. सुशांत बारहाते यांनी युवा या कवितेतून युवकांना शेतीची कामे करताना लाज वाटू देऊ नका असे काव्यातून आवाहन केले. प्रदीप देशमुख यांनी भोग कविता सादर करीत शेतकर्यां चे नशीब मांडले. राम वासेकार यांनी घामाचे मोल कवितेतून शेताला फुलवण्यासाठी पाणी पाहिजे हा धागा पकडून माती, पाऊस यांचा संवाद सादर केला. अमरावतीचे कवी दिलीप भोयर यांनी शेतकऱ्याचा विश्वास प्रत्येकाने कसा तोडला हे कवितेतून सादर केले. प्रज्ञा अपेगावकर या कवियत्रीने बैल आणि शेतकरी यांच्या संबंधाची व भावनांची कविता सादर केली. तळेगावचे नारायण निखाते यांनी त्यांच्या कवितेतून कष्ट केल्याशिवाय काहीच भेटत नाही हा आशय व्यक्त केला.





संमेलनाचे बहारदार संचालन किशोर कवठेकर यांनी केलेतर समारोप प्रसिद्ध कवी व शेतकरी नेते गंगाधर मुटे यांच्या कवितेनी झाला.

**– प्रा. अभिजित डाखोरे**
**हिंगणघाट**





## संचालक मंडळ

# कृषी उत्पन्न बाजार समिती, वर्धा










श्री. श्याम कार्लेकर सभापती | श्री. पांडुरंग देशमुख उपसभापती | श्री. रमेश खंडागळे सदस्य | श्री. मुकेश अळसपुरे सदस्य







श्री. दत्ता भ.महाजन सदस्य | श्री. कमलाकर शेंडे सदस्य | श्री. पवन गोडे सदस्य | श्री. सुरेशसिंग मेहर सदस्य



सौ. अपर्णा मेघे सदस्या | सौ. वैशाली उमाटे सदस्या | श्री. शरद देशमुख सदस्य | श्री. जगदिश मस्के सदस्य | श्री. अरविंद भुसारी सदस्य | श्री. शरद झोड सदस्य



श्री. पुरुषोत्तम टोनपे सदस्य | श्री. भुषण झाडे सदस्य | श्री. प्रकाश पाटील सदस्य | श्री. दिनेश गायकवाड सदस्य | श्री. विजय बंडेवार सदस्य | श्री. गंगाधर डाखोळे तज्ञ प्रतिनिधी | श्री. वैभव वैद्य तज्ञ प्रतिनिधी

### आमची वैशिष्टे

१) कापूस तथा धान्य बाजार भरविणेकरीता प्रशस्त आवार. २) केंद्र शासन अनुदानित प्रकल्प टि.एम.सी. अंतर्गत शेतकऱ्यांच्या कापूस विक्री करिता सिमेंटचे ओटे, शेड, सिमेंटचे रस्ते, पूर्ण यार्डचे सिमेंटीकरण, फायर फायटींगची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,उपहारगृह, शेतकऱ्यांकरिता निवास व्यवस्था, कापसाच्या तपासणी करिता प्रयोगशाळा, वजनमापाकरिता ४० मे.टनाचा भूईकाटा,विद्युत दिव्यांची व्यवस्था इ. सोयी करण्यात आल्या आहेत. ३) गोदामाची व्यवस्था. ४) सुरक्षिततेच्या दृष्टीने संपूर्ण आवाराला दगडी भिंत.५) ६०'' प्रोजेक्शन टि.व्ही. वर महाराष्ट्रातील सर्व बाजार समित्यां मधील दैनिक बाजार भाव दाखविण्याची व्यवस्था ६) बस स्टेशन ते रेल्वे स्टेशनच्या रस्त्यावर बजाज चौकाजवळ समितीच्या नियमनाखाली ठोक भाजी बाजार भरविल्या जातो.७) पाच रुपयात शेतकरी भोजन सुविधा.

वरील वैशिष्ट्यानिशी आम्ही आमचे शेतकरी बांधवांची सेवा करीत आहो. ह्यापुढे सुद्धा कृषी उत्पादीत माल आमचे पेठेत विकण्याकरिता आणून आपल्या सेवेची संधी देतील ही हार्दिक अपेक्षा.

# ग्राम पंचायत, आर्वी (छोटी), ता. हिंगणघाट, जि. वर्धा

**१) सर्व गावकऱ्यांना निवेदन करण्यात येते आहे की, ग्रा.पं. कराचा वेळेवर भरणा करावा.**
**२) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय बांधकाम करण्यासाठी १२,००० रु. अनुदानाचा लाभ घ्यावा.**
**३) स्वच्छता भारत योजनेअंतर्गत गांव स्वच्छ ठेवणे करीता ग्रा.पं. ला सहकार्य करावे.**

१) सौ. विमलताई गजाननराव उगेमुगे - सरपंच
२) श्री. सुरेशराव नथ्थुजी सातोकर - उपसरपंच
३) श्री. ज्ञानेश्वर एस. ढोके - सदस्य
४) सौ. वनिताताई दिलीपराव दारुणकर - सदस्या
५) सौ. शशिकला नारायणराव खोडे - सदस्या
६) सौ. छायाताई अंकुशराव येलके - सदस्या
७) श्री. गंगाधरराव एम. मुटे - सदस्य
८) सौ. मिनाताई कैलासराव जयपूरकर - सदस्या
९) सौ. पार्वताबाई संभाजी कांबळे - सदस्या
१०) **श्री. डी.व्ही. वाट** - सचिव




## तिसऱ्या अखिल भारतीय शेतकरी मराठी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!


श्री. केशव बाबुरावजी वऱ्हाडे
आरमोरी


श्री. महेश कोपुलवार
आरमोरी


श्री. निळकंठ सखाराम कोकोडे


श्री. व्यंकटेश मातोरे
लेंडारी


मा. किशोरभाऊ वामनरावजी
वनमाळी


श्री. प्रदीप देशमुख
चंद्रपूर


श्री. सुभाष बोकडे
कुरझडी, वर्धा


श्री. हेमंत चौधरी
नंदुरबार

# शेतकरी संघटनेच्या विजयी शिलेदार



**सौ. ज्योती गजानन निकम**
जि.प. विरुळ (वर्धा)



**अरुणा राजेश सावरकर**
पं.स. रसुलबाद (वर्धा)



**सौ. उषा उद्धव थुट्टे**
पं.स. मेरखुर्द (बुलढाणा)



**सौ. मंजुषा अनिल ठक**
पं.स. सावली (वर्धा)

# शेतीसाहित्य निर्मिती करणे हे सतीचे वाण!

## गडचिरोलीत तिसरे अ.भा. शेतकरी साहित्य संमेलन थाटात संपन्न

तिसरे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन दि. २५ व २६ फेब्रुवारी २०१७ रोजी गडचिरोली येथे मोठ्या थाटात पार पडले. यापूर्वीची दोन संमेलने अनुक्रमे वर्धा आणि नागपूर येथे घेण्यात आली होती. दोन दिवसीय संमेलनात कार्यक्रमांची अखंड रेलचेल दिसून आली. त्यात एकूण पाच परिसंवादातून शेती आणि शेतीशी संबंधीत समस्यावर विचार मंथन करण्यात आले.



संमेलनाध्यक्षांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

**आता तयार व्हावे लढण्यास लेखणीने**
**रक्षण अबोलतेचे करण्यास लेखणीने**
**लटकी–पुचाट वाणी शिरजोर होत आहे**
**यावे रमात गच्ची धरण्यास लेखीणीने**


हे ब्रीद मनात घेवून युगात्मा शरद जोशी साहित्य नगरी, संस्कृती सांस्कृतिक सभागृ, आरमोरी रोड, गडचिरोली येथे या संमेलनाचे आयोजन करण्यात आले. स्वागत समितीचे अरूण बाबू मुनघाटे, ईश्वर मते, विनय लाकडे, प्रभाकर दिवे, सुरेश शेंडे, राम वसेकर, अशोक गडकरी, रोशनकुमार पिलेवान, वंदनाताई चटप, अनिल बाळसराफ, रत्नाकर चटप, रवी धारणे, रमेश सरकाटे, मनिषा रिठे, रेखा हरणे, संध्या राऊत, अरविंदराव बोरकर, मदन कामडे, जगदीश नाना बोंडे, समाधान कणखर यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले.

शनिवार दि. २५ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ११ वाजता उद्‌घाटन सत्र ठेवण्यात आले. संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यीक प्रा. डॉ. शेषराव मोहिते हे होते. स्वागताध्यक्ष म्हणुन शालीक पा. नाकाडे तर प्रमुख अतिथी ज्येष्ठ समिक्षक डॉ. किशोर सानप, अ.भा. शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर मुटे, नगराध्यक्ष योगीता पिंपरे, नगरसेवक प्रमोद पिंपरे, माजी आमदार वामनराव चटप, देवराव पा. म्हशाखेत्री, ईश्वर मते, अशोक गडेकरी, सुरेश शेंडे आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे उद्‌घाटक डॉ. अभय बंग यांनी शेतकरी संघटनात्मक चळवळीस आत्मपरिक्षणाची गरज असून शेतकरी साहित्य लिहायचे असेल तर त्यात अस्सलपणा पाहिजे असे मत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची संख्या ४०% असून ही टक्केवारी दिवसेंदिवस रोडवित चालली आहे. तो अति मागासलेल्या स्वरूपात जीवन जगत आहे. शेतकरी आत्महत्या का होतात यावर संशोधन करणे गरजेचे आहे. शेतकरी साहित्य हे सतीच वाण असुन पुणे, मुंबईची कॉपी करणे म्हणजे अभिजात शेतकरी साहित्य नाही, तर शेतकऱ्यांची वास्तस्थिती, क्षितीजापलीकडचे भावदृश्य रेखाटून त्यांच्या समस्यांचे निराकरण करणाऱ्या साहित्याची निर्मिती करणे गरजेचे आहे.

नगराध्यक्षा योगीता पिंपरे यांनी शेतकऱ्यांच्या मानसिकतेचा विचार करून त्यांच्या आर्थिक स्थितीची वास्तविकता रेखाटने व आत्महत्यांची पार्श्वभूमी स्पष्ट करणे गरजेचे असल्याचे सांगितले. आज जगाचा पोशींदा असलेला शेतकरी मागासलेला असून त्याच्या समस्या सोडवून त्याची आर्थिक स्थिती सुधारण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात ज्येष्ठ साहित्यीक प्रा. डॉ. शेषराव मोहिते यांनी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था साहित्यातून प्रतिबिंबीत व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. ते पुढे म्हणाले की, आदिवासी व शेतकऱ्यांच्या वास्तव समस्यांची दखल घेवून त्याची मांडणी जगासमोर



दत्ता राऊत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकरी नमनगीत सादर केले.




**''शेतकऱ्यांचा स्वातंत्र्यसूर्य'' आणि ''कणसातली माणसं'' या ई-पुस्तकांचे याप्रसंगी विमोचन करण्यात आले.**




**''माझी गझल निराळी'' गझलसंग्रहाच्या तिसऱ्या आवृत्तीचे डॉ. किशोर सानप यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.**

प्रदर्शित करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या जीवनावर होणारे विपरीत परिणाम व त्यातून अगणिक होणाऱ्या आत्महत्याचे प्रमाण बघता जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी मागासलेला आहे याचे परीक्षण करून शेतकऱ्यांची अशी दयनीय वास्तविकता साहित्यातून प्रतिबिंबीत करणे गरजेचे आहे असेही ते म्हणाले. शेतकरी साहित्याबाबत बोलताना ते पुढे म्हणाले की, ग्रामीण साहित्य हेच या भुमीतील मध्यवर्ती साहित्य आहे. मुख्य म्हणजे हे शोषितांचे आणि वंचितांचे साहित्य असून शेतकऱ्यांच्या मानसिकतेला, त्यांच्या आर्थिक दडपणाला व्यक्त करण्यासाठी हे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. साहित्यातून शेतकऱ्यांचे वास्तववादी चित्र रेखाटणे मात्र गरजेचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

याच उद्‌घाटन सत्रात बोलताना ज्येष्ठ समीक्षक किशोर सानव म्हणाले की शेतकरी केवळ बियाणे पेरत नसून त्यासोबत त्याच्या रक्ताची पण पेरणी करतो. शेतकऱ्यांचा घाम जमिनीत मुरल्याविना नवांकुर निर्माण होत नाहीत. परंतू संपूर्ण जगाला पोसणारा शेतकरी हलाखीचे जीवन जगतो आहे. ही लोकशाही नसून भांडवलशाही आहे. या व्यवस्थेकडून शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण केले जाणे शक्य नाही असेही ते म्हणाले.

**वृत्तांकन : राज पठाण,**
**अंबाजोगाई जि. बीड**



**रात्री ''गिरमी'' ही नाटिका सादर करण्यात आली. त्यातील एक दृश्य**




**''शेतकरी विरोधी कायद्यांचा परिचय'' या विषयावरील परिसंवादात विचारपुष्प गुंफताना ॲड. प्रकाशसिंह पाटील**

# परिसंवाद - पारंपारिक कथा-लोकगीते ग्रामीण स्त्रित्वाचे वास्तवदर्शन




लोकसाहित्य हे अक्षरलेभं आहे. लोकगीत म्हणजे भावनांचा आविष्कार लोकनाट्य, दंडार, बहूरूपी, खडा तमाशा या प्रकारातून सामाजीक प्रबोधनाचं काम करते. कृषीवल गीते, काम करताना म्हणावयाची गाणी, उखाणे, म्हणी, हाना हे सगळे लोकगीतांचेच प्रकार यातून निखळ मनोरंजनाबरोबरच सामाजीक संस्कृतीचं दर्शन घडविल्या जाते.

३ ऱ्या शेतकरी साहित्य संमेलनाच्या निमीत्याने आयोजीत परिसंवादात पारंपारिक कथांवर सौ. प्रज्ञा बापट, यवतमाळ यांनी कथांवर फार सुंदर विवेचन केलं. 'बियानाचं गिराड' या कथेचं फार सुंदर विश्लेषण केलं. 'कणसात पिकलं मोती' या कथेतून दोन भावाचं स्वभाव चित्रण केलं. लोककथा ह्या खऱ्या अर्थाने बोधकथा असतात. निनीकथा असतात. त्यातून समाजाला मुल्याचं शिक्षण दिलं जातं. खर खोटं, चांगल वाईट काय ते समजावून सांगितलं जातं. लेकीला केवढ्या कौतुकानं वाढवलं जातं ते ही मोठ्या कौशल्याने प्रज्ञा बापट यांनी व्यक्त केलं.

लोकगीते म्हणजे लोकजीवनाचा आरसा. जीवन जसं आहे तसंच आपल्या गीतातून ग्रामीण बायका आपले मन चितारतात. ओवी बद्धातील गीते अत्यंत गेय व मधूर असतात. चंद्रपूर व गडचिरोली, भंडारा जिल्ह्यातील लोकगीतांचं त्यांच्या लयीसह डॉ. सुमीता कोंडबत्तुनवार यांनी सादरीकरण केले. त्या लोकसाहित्याच्या संशोधक व अभ्यासिका आहेत.

डॉ. कोंडबत्तुनवार म्हणाल्या की, पहाटेच्या जात्यावरच्या ओव्या सुंदर माझं जातं ग, फिरते बहून ओव्या गावू कौतुकेऐ येरे बा विठ्ठला। यातून विठ्ठलाला बोलावून आपलं काम हलकं करण्याची तीची मनोवृत्ती किती सहजपणे ती प्रगट करते.

कृषीवल गीतातून सुनेच्या सासुरवासाची दिर्घकाव्याची झलक पहायला मिळते. शेतामध्ये जर रोवण्याची पात धरली असेल तर ती संपेपर्यंत एखादं गाणं पूरेल का यानुसार त्या गाण्याची लांबी ठरविली जाते. हे त्या लोककवियित्री कडीला कडी जोडावी तशी काव्याची रचना करीत जातात. असचं एक गीत

**सीताबाई नं जाते वना**
**लकसूमन लडते मना व**
**लकसूमन लडते मना**
**काउन नेतराले पाणी**
**वल्या लावलीस सेगी व**
**मनून नेतराले पाणी।।**

गीतातील प्रतिक प्रतिमा पाहिल्यावर रचनांची अप्रतिम मूल्ये नाकारता येत नाहीत.

**रेला रेला रे रेला**
**चारी दरवाजे खोल व नाने**
**तुजा बापस आला**

ही गोंडी गीत सुद्धा अलौकीक जीवनमुल्यानी ओतप्रोत आहेत.

भोवतालची परिस्थिती, संवेदनशील मन, शेतकऱ्यांच्या भावभावना, संस्कृती, व्यवहार याचं दर्शन आपल्याला गीतातून होते.

लोकपरंपरा, लोकसंस्कृती, लोकगीतात शेतकऱ्यांच दुःख लपलेलं आहे. शेतकऱ्यांचं जीवन आजही दुःखमय आहे. आपल्या लोकगीतातून ग्रामीण स्त्रीयांचे वेदनाभोग पहावयास मिळतात. शेतकऱ्यांची मुलं नेहमी सरस ठरतात. धाडसाने त्यांनी पुढ जायला पाहिजे. शेतकऱ्यांच्या मुलींनी कधीही स्वतःला कमी लेखू नये. त्यांच्यात गुणवत्ता आहे. हातात मातीचं बळ आहे.

याप्रसंगी वसुंधरा काशीकर यांनीही स्त्रीत्वाच्या विविध पैलुवर प्रकाश टाकत प्रभावी विवेचन केले.

एकंदर संमेलनातून विचार मंथन सामाजीक प्रबोधनाचं काम सुद्धा प्रभावीपणे पार पाडण्यात आलं, असे म्हणता येईल.

**(अंगारमळा रिपोर्टींग ब्युरो)**

# शेतकरी संघटना

## ता. वरूड, जि. अमरावती

च्या वतीने

तिसरे अखिल भारतीय मराठी शेतकरी संमेलनाला हार्दीक शुभेच्छा!



दिलीप भोयर




दिलीप यावलकर



युवराज कराळे



हरिष आजनकर



अमोल चौधरी

फोन नं. (ऑ.) २६६२६३
(नि.) २६६२६४

# मे. किर्ती मशिनरी

सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि. वर्धा

प्रो. निळकंठराव घवघवे

**वितरक :**

- ✦ कोरोमंडल इंटरनॅशनल लि.
- ✦ सल्फर मिल्स, मुंबई
- ✦ भारत इन्सेक्टीसाईड, दिल्ली
- ✦ तुलशी सिडस् लि., गुंटूर
- ✦ सेन्ट्रोमेअर बॉयो सोल्यूशन, हैद्राबाद
- ✦ दफ्तरी सिडस्, सेलू
- ✦ PHG इंडस्ट्रीयल इंन्स्टिट्यूट, कोईमतूर
- ✦ प्लुगा पम्प्स अॅन्ड मोटर्स, बडोदा
- ✦ रॉकेट इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन प्रा.लि., कोल्हापूर
- ✦ पारस इरिगेशन लि. अहमदनगर

# सिंदी कृषी उत्पन्न बाजार समिती सिंदी

उपबाजारपेठ सेलू

त. सेलू, जि. वर्धा, फो.नं. ०७१५५-२६६२३७, २२१२४९

## शेतकऱ्यांना हार्दिक शुभेच्छा

१) समितीच्या सिंदी व उपबाजारपेठ सेलु येथील मार्केटला मोठ्या प्रमाणावर धान्य व कापसाची आवक रोज खरेदी विक्रीची व्यवस्था

२) शेतमालाची उघड लिलाव पद्धतीने विक्री त्वरित इलेक्ट्रॉनिक काट्यावर वजनमाप.

३) उपबाजारपेठ सेलु येथे प्रत्येक मंगळवारला बैलबाजार भरविण्यात येतो.

## शेतकऱ्यांना सूचना

१) शेतकऱ्यांनी आपला शेतमाल मार्केट मध्ये विक्री करावा.

२) आपला शेतमाल स्वच्छ करुन व वाळवुन आणावा यामुळे उच्च दर मिळण्यास मदत होते.

३) तारण योजना सुरु होत आहे. या योजनेचा लाभ घ्यावा. सोबत ७/१२ यात पेऱ्याची नोंद असणे आवश्यक.

४) ढगाळी वातावरण असल्यास माल विक्रीस आणु नये.

५) तुर तारण योजना सुरू आहे.

| आय.आ. सुफी | रामकृष्ण उमाटे | विद्याधर वानखेडे |
|---|---|---|
| सचिव | उपसभापती | सभापती |

**संचालक मंडळ :-** बबनराव हिंगणेकर, केशरीचंदजी खंगारे, दिलीपराव भजभुजे, राजेशजी जयस्वाल, अनिलराव जिकार, मो. युसुफभाई शेख, दिलीपराव ठाकरे, सौ. निलिमाताई दंढारे, सौ. शिलाताई धोटे, गुणवंतराव कडू, धनराजजी गिरी, संदीपराव वाणी, विठ्ठलराव कौरती, काशीनाथजी लोणकर, संजयराव तडस, अरुणराव चौधरी

# व्यंकटेश कृषी अॅन्ड मशिनरी

बाजार चौक, सिंदी (रेल्वे), त. सेलू, जि. वर्धा

मो. ९८६०३६३१६०, ७७९८३०९०४३, फोन नं. ०७१५५-२६६५००

❋ **Authorised Distributor -**

❋ **Fertiliser -** Deepak Fertiliser, Zuari Fertiliser, PPL Fertiliser, IFFCO, Krubhco Fertiliser.

❋ **Seeds -** Kaveri Seeds, Sriram Bioseed, Shrirama Agrigenetics, Zuari Seeds, Bayer Seeds, Sathya Seeds, Gayatri Seeds.

❋ **Insecticide -** Dupont, Bayer, Dhanuka, Sumil, Advance, Sumitomo, Patil Biotech, Devi Crop Science, Gayatri Micro Elements.

❋ **Machinery -** Drip & Spinkler, Godavari Polymers Pvt. Ltd., Shakti Motors, Turbo Motors.

# शेतकरी साहित्याच्या बदलत्या छटा



शेती क्षेत्रातील साहित्य लिहील्याच गेले नाही असा कोणाचाच समज नाही. शेतीत जगणाऱ्या शेतकऱ्याचे साहित्य असा जर विचार केला तर शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याचेच दिसून येते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शेती व शेतकरी साहित्य हे सुखवस्तु नांदता वाडा येणाऱ्या जाणाऱ्याचा राबता, खिल्लारी जोड्या, पडद्याच्या दमण्या, आवाज देताच धावून येणारा चाकरवर्ग असे वैभवशाली शेतीचे चित्रण केल्या गेले, हे खरेही होते. पाटील, देशमुख, जमीनदार, पाटलाचा वाडा, पाटलीन, जमीनदारीणीचे दागदागिने, त्यांचा चौसोपी वाडा, पाटलांचा शान-शौकीपणा, त्यांचा घरंदाज बाणा वगैरे. थोडक्यात दोन तीन गावचा अधिकारी, अफाट जमीन असलेले श्रीमंत यांचे साहित्य रेखाटले गेले. पण या वैभवाकरिता कष्ट करणारा, झटणारा तो कोण होता याचे साधे लेखन यात स्पष्टपणे आलेले दिसत नाही. फक्त स्त्रियांच्या शोषणाचे रंगेल वर्णन मात्र दिसून येते.

हे राबणारे खरे शेतकरी होते, त्यांच पोट शेतावर होतं याचं भान असलेले साहित्य क्वचितच आढळते. जमिनदारी गेली, सिलींग आले, शेतीचे विभाजन झाले. कष्ट करणाऱ्या चाकराला जमीन मिळाली. पण ती जमीनही त्याच्या आयुष्यमानाचा अभ्यास करून देण्यात आली नाही. जमीनदारीत गुलामीत पिचत गेलेल्या या समाजाला त्याच्या कष्टाचा मोबदला मिळाला तो ३ ते ५ एकरात. कधिही हक्काचं काहीच नव्हतं, त्यात मालकीची जमीन मिळाली हाच त्याला स्वर्ग मिळाल्यासारखा आनंद झाला. कसेल त्याची जमीन झाली. मायबाप आधी मालगुजार होते. आता सरकार मायबाप झाले. दोन्ही वर्गांना आता शेती खऱ्या अर्थाने कळू लागली.

उत्तम शेती कनिष्ट झाली. नव शेतमालकाचा आनंद मालकीच्या गुलामीत होता. त्यात 'चार' झोपडीचे माझे मज लखलाभ, जरी लहान खेडे तिथेच माझी आब'' या कवितेप्रमाणे आब राखून जगू लागला. पाटलाचा आधार तुटला, सावकाराने आधार दिला व लूट सुरू झाली. कारण कष्टाच्या हिशेबाचे व शेतीतील पिकी-नापिकीचे गणित कधी त्याला उमगले नाही. मायबाप सरकारने सुट सबसिडी दिली. सहकारी बँकेचे जाळे उभे केले. एकाधिकार हरितक्रांतीचे मोरपीस शेतकऱ्याच्या आयुष्यात फिरल्यासारखे वाटले. या सर्व उतार चढावाचे साहित्य शेतकरी म्हणून कुठे उमटले नाही. सधन शेतीचे स्वप्न मात्र साहित्यात आकारू लागले. सधनता येण्याकरिता कर्ज घेऊन उर फुटेस्तोवर कष्ट सुरू झाले. देशाचा मालक, अन्नदाता, बळीराजा अशा एक ना अनेक उपाध्या त्याला मिळत होत्या. साहित्यातून या सर्व गोष्टींचे कौतुक दिसू लागले.

शेतकऱ्यांना जमीनदाराच्या काळातही गुलामी आणि स्वातंत्र्यानंतरही मालकी मिळवूनही गुलामी. या सर्वांचा हिशेबच लागला नाही. यंदा तरी बरं साल पडेल या आशेवर कष्ट व कर्ज अशा चक्राचे गणित कोणत्याही साहित्याने उकलले नाही. त्याच्या वैफल्यतेमुळे पावलं दारूकडे जाऊ लागली. शेती पेक्षा इतर जुगार फायद्याचा होईल काय या शोधात फक्त आत्महत्या मिळाली. या दैन्याचे चित्रण फारसे कुठे दिसून आले नाही. शेतकरी आणि त्याचे कुटुंब ''मारित मिटक्या यथेच्छ खातो तुच्छ क्षुधा बापुडी सुरांची नवल न उरी'' हे काव्य ऐकत देवांना सुद्धा आमच्या भाकरीचा हेवा वाटतो एवढे आम्ही श्रीमंत या नशेत तर या साहित्याने शेतकऱ्यांना गुंगवत ठेवले नाही ना? हा प्रश्न आमच्या सारख्यांना पडतो. कोणतेही साहित्य कथाकथन आणि काव्य हे त्या त्या काळचे आरसे समजल्या जातात. त्या क्षेत्रातल्या समाजाचे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आर्थिक अशा चौरंगी स्वरूपाचे चित्रण त्यात अपेक्षित असते. शेतकऱ्यांचे अभ्यास करता त्याचे हे सर्वांगिण चित्रण रेखाटल्या गेल्याची स्पष्ट जाणीव कधीही झाली नाही. मात्र १९८० नंतर शेतकऱ्यांचे जे खरे स्वरूप पुढे आले त्याचा अभ्यास आर्थिक बाजूनेही होऊ लागला. त्याच्या आयुष्याचे लिखाण त्याच्या खऱ्या दर्शनातून लिहिल्या जाऊ लागले. त्याच्या चंद्रमोळी झोपडीचे रहस्य उलगडले जाऊ लागले. वाड्याच्या पडक्या भिंती आपले दैन्य बोलू लागल्या. हे साहित्य शेतकऱ्यांच्या सर्वंकष आयुष्याचे वर्णन आहे असे वाटू लागले. युगात्मा शरद जोशींनी शेतकरी साहित्यातून शेतकऱ्यांच्या कुटुंब व्यवस्थेपासून तर शैक्षणिक राजकीय व आर्थिक स्वरूपापर्यंतचे सत्य दर्शन घडवून आणले. निर्भिडपणे सरकारच्या कुचकामी मलमपट्ट्या, वरवर शेतकऱ्यांप्रती सरकारचे औदार्य हे किती भंपक आहे याचे स्पष्टीकरण परखड पणे मांडण्याचे धाडस यात आढळते.

कथा कादंबऱ्या न चितारता उघड वर्णन लिहून समाज जागृतीचे कार्य सा साहित्यात आहे. समाजाचा विस्तारित अर्थ या साहित्यात आहे. कारण अठरा पगड समाज जो शेतीवर जगत होता मग तो (मराठा, कुणबी, तेली, माळी, गोंड गवारी, चर्मकार बौद्ध, ब्राह्मण या) कोणत्याही समाजाचा असो, त्याचे राहणीमान, त्याचे शिक्षण, त्याचे घरदार, आर्थिक व्यवहार, घरच्या स्त्रीची अवस्था याची स्पष्ट मांडणी या साहित्यात आली आणि साहित्यकारांनी ८० च्या दशकानंतर शेतकरी साहित्याची दखल सत्यार्थाने घेण्याची सुरुवात केली असे मला वाटते. या लेखनात शेतकऱ्यांच्या खऱ्या अवस्थेचे, त्याच्या दारीद्र्याचे, अडाणीपणाचे, कर्जबाजारीपणाचे, शैक्षणिक मागासलेपणाचे चित्रण करणे जेवढे परखडपणे केल्या गेले तेवढेच स्पष्टपणे त्याच्या सोडवणूकीची मांडणी सुद्धा करण्यात आली. शेतकरी साहित्यातील युगात्मा शरद जोशींचे साहित्य हे महावस्त्र आहे. या वस्त्राच्या प्रत्येक धाग्यातून निर्माण होणारे साहित्य शेतकरी समाजाला चैतन्य देणारे ठरेल आणि या समाजाला वर्षानुवर्षे झालेल्या ससेहोलपटीतून बाहेर निघण्याचा मार्ग सापडेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

**– सरोजताई काशीकर**

♦ ♦ ♦

# आसाराम लोमटे यांच्या 'इडा पीडा टळो' तील शेतकरी

आसाराम लोमटे हे मराठवाड्यातील पत्रकारितेच्या व साहित्याच्या क्षेत्रातील लौकीक प्राप्त असे नाव. 'इडी पीडा टळो' व 'अलोक' या कथासंग्रहातून समकालीन ग्राम जीवनाचे वास्तव चित्र त्यांनी प्रभावीपणे मांडले आहे. आसाराम लोमटे यांच्या 'अलोक' या कथासंग्रहाला नुकताच प्रतिष्ठेचा साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, यावरूनच त्याच्या साहित्यिक लेखणीची पातळी व उंची लक्षात येते. जागतिकीकरण मुक्त अर्थव्यवस्थेच्या शिरकावाने ग्रामजीवनातील घडून येणारे बरेवाईट बदल, ग्रामस्तरावर राजकारणाचे वाढते महत्व, जातीनिहाय आरक्षण, शेतकऱ्यांच्या आत्महत्येतील लक्षणीय वाढ, सरंजामशाहीचे बदलते रूप, राज्यकर्त्यांचे शेतकरी विरोधी धोरण, शोषणव्यवस्थेच्या विरोधात विद्रोह करणारा ग्रामसमूह आदी विषयावर आसाराम लोमटे व्यापक अंगाने मांडणी करताना दिसतात. 'शेतकरी' हा लोमटे यांच्या चिंतनाचा विषय राहिला आहे. पत्रकारितेचे तटस्थ वाण त्यांनी अंगीकारले असले तरी शेती, शेतकरी व शेतकरी आंदोलन या विषयीची तळमळ व सहानुभाव त्यांच्या कृषीमंथनावरील अनेकविध लेखावरून दिसून येतो. शेतकऱ्यांच्या कुटुंबात जन्माला आलेल्या व ग्रामीण जाणिवा मुखर करणाऱ्या साहित्यिकापैकी महत्वपूर्ण साहित्यिक म्हणून आसाराम लोमटे यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. सभोवतालील ग्राम वास्तव्याच्या सुक्ष्म निरीक्षणातून प्रकट झालेले साहित्यिकांचे वैयक्तिक चिंतन स्वतंत्र असते. विशिष्ट भूमिकेशी एकनिष्ठ असलेले हे चिंतन कधी प्रेमानुभूतीची व्यापक जाणीव प्रकट करते. तर कधी सामाजिक बांधिलकीची धार अधिक तीव्र करते.

मागील काही वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण भाग असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येत प्रचंड वाढ झाली आहे. पिढ्यान्पिढ्या जगाचा पोशिंदा म्हणून नावाजलेला शेतकरी जेव्हा आत्महत्येस प्रवृत्त होतो. तेव्हा संवेदनशील मने अधिक अस्वस्थ होतात व या अवस्थेतून नवसाहित्य निर्मितीच्या प्रक्रियेकडे वाटचाल सुरू होते. आसाराम लोमटे यांच्या दीर्घ ग्रामीण कथेतून या अस्वस्थ भावनेचा हुंकार प्रकट होतांना दिसतो. 'इडा पीडा टळो' हे कथासंग्रहाचे शीर्षकच पारंपारिकतेने शोषणचक्रात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या भलेपणाचे सूचन करणारे दिसते. त्यांच्याठिकाणी शेतकऱ्यांच्या शोषणविरोधी आवाज उठविणाऱ्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनाविषयी आपुलकीची भावना राहत आलेली दिसते. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे, गरिबीचे उच्चाटन करण्यासाठी शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळाला पाहिजे, यासाठी शेतकरी संघटनेने अनेकविध आंदोलन केली. या आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या बहुतांश मागण्या मान्य झाल्याने शेतकरी वर्गात लढ्याविषयी आत्मविश्वास निर्माण झाला.



'भीक नको, घेऊ घामाचे दाम' हा मंत्र अंगीकारून सजग झालेला ग्रामसमूह विद्रोहाची भाषा बोलू लागला.

आसाराम लोमटे यांची 'इडा पीडा टळो' ही कथा शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची पार्श्वभूमी घेऊन प्रकटताना दिसते. पिढ्यान्पिढ्या शेतात अहोरात्र राबूनही शेतकऱ्यांच्या जीवनात दोन सुखाचे घास मिळत नाही. सावकारी पाश, निसर्गाचा लहरीपणा, वाढता उत्पादन खर्च, सरकारचे शेतीविरोधी धोरण व शेतमालाला मातीमोल भाव आदी अनेक कारणामुळे शेतकरी दारिद्र्यात जीवन जगतो. शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी लढल्याशिवाय पर्याय नाही. हा आत्मविश्वास शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने ग्रामसमूहात निर्माण केला. 'इडा पीडा टळो' या कथेतील आशयसूत्र याच अंगाने संचारतांना दिसते. सीताबाई, माळ्याची जना, दत्तराव माने, तुकाराम शिंदे, रुस्तूम, शाहीर भारती ही शेतकरी संघटनेची कार्यकर्ते आत्मभान आलेल्या ग्रामसमूहाचे प्रतिनिधीत्व करतांना दिसतात. कापसाच्या भाववाढीसाठी 'रास्ता रोको' करणारी सीता आक्का दीपावलीसाठी न्यायला आलेल्या (भावाला) बिभीषणाला व पतीला उद्देशून म्हणते की, ''इथं मरूस्तोवर काम करायचं अन् आपला माल दलालायनं मातीमोल भावानं घ्यायचा हे कव्हरक चालू द्यायचं बाबा! त्याच्यानं आम्ही दहा-वीस खेड्याच्या बायका गोळा होऊन भांडायलोत.... अन् तुम्ही बसा हरी हरी करीत! आषाढी कार्तिकीच्या वाऱ्या मातर बंद करू नका. इथं मरूस्तोवर काम करून पदरात काय पडायलंय, याचा हिशोब केलाय का कधी... तुम्हाला ते पांडुरंग सुधरू देईन तव्हा नं.''[०१] हा शोषण विरहीत जीवनाबद्दलचा दुर्दम्य आशावाद सीता आक्काच्या संवादातून दिसून येतो. 'दे रे हरी' ही सुखात्म कल्पना वास्तव जगण्यात दुबळी ठरू पाहते.

आपल्या जीवन उद्धारासाठी कुणीही प्रेषित धावून येणार नाही. आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार व शोषणावर आपणच संघर्ष केला पाहिजे, याची जाणीव शेतकरी संघटनेने दिली. परंतु आंदोलनातील हा लढा गांधीजीच्या सत्याग्रहावर निष्ठा ठेवून अहिंसात्मक शांततेच्या मार्गाने जाणारा असावा. या बाबीवर संघटनेची अपार निष्ठा आहे. 'डोंगरी शेत माझं... मी बेनू किती' ही नारायण सुर्वे यांची कविता ग्रामीण भागातील महिला वर्गाचा आवाज बनली. 'आलिया भोगासी....' ही भावना कालमान होऊन भांडल्याबिगर काही मिळत नाही. हा संघटनेचा विचार ग्रामसमूहात चांगलाच रुजलेला दिसतो. शेतकरी संघटनेच्या

रास्ता रोकोसाठी महिला वर्गाचे संघटन करताना सीताबाई शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचा विचार अस्सल मराठवाडी बोलीत ठासून सांगतात की, ''उद्याच्या रास्ता रोको' ला हजार पाचशे बाया दिसल्या पाहयजीत. चुलीचं लाकूड कव्हरक चुलीत घालायचं? आता ते सरकारच्या पाठीतबी बसायला पाहयजी.... त्या निकरट सरकारला कशी कुंभकर्णी झोप लागली कोणाला ठावं. सरकारी नौकराचे पैसे दणादण वाढायलेत अन् आमच्या मालालाच काय किडा लागला का? आपून काय फक्त ह्या दहा-पाच खेड्यातल्याच बाया उद्या रस्ता अडवायलोत असं नाही... उद्या सगळ्या राज्यात रस्ते जागोजाग अडविणारायत. आपल्याला सगळ्यांपेक्षा हे आंदोलन मोठ करायचंय आतापस्तोर सगळ्यानी भाव वाढवून देतो म्हणून सरकार चालविलंय. आपून ढोरावानी राबराब राबायलोत. हाती काहीच लागंना आसं किती दिवस घाण्याच्या बैलावाणी खाली मान घालून कोल वढायचा? कव्हातरी मान वरी करावा का नाही? बाई ह्या दिवसात तुझ्या घरात बसायला जागा नसनं इतकी कापसाची गंजी चढलीय... तुला सालाला दोन नवे लुगडे तरी भेटतेत का? आपून इचार करतोत का ह्या गोष्टीचा? आता गप्प बसून जमायचं नाही... आपलं आपलं म्हणणं सरकारला कळालं पाह्यजी.''[०२] आसाराम लोमटे यांच्या कथेतील हे आत्मभान नव बदलाची दिशा दर्शविताना दिसते.

आजपर्यंत लाचार, दयेची याचना करणारा शेतकरी वर्ग दान मागण्याऐवजी हक्क मागू लागला. शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने ग्रामीण भागातील समूहात गुलामीची जाणीव व शोषणाची अचूक कारणे समजू लागली. कधी नव्हे ते शेतकऱ्यांसह महिलावर्गही मोठ्या संख्येने आंदोलनात पदरची भाकरी बांधून उतरल्या. ही शेतकऱ्यांच्या ऐक्यासाठीची अभूतपूर्व व स्वागताहार्य बाब म्हणावी लागेल. सर्व कष्टकरी शेतकरी समाज शेतीच्या आर्थिक व्यवहाराबाबत सजग झाला. इतर राजकीय पक्षाच्या प्रलोभनाला बळी न पडता आपल्या श्रमसिद्ध न्याय मागणीसाठी रस्त्यावर उतरण्यास सज्ज झाला. कारण आत्तापर्यंत किती राजकीय पक्ष सत्तेवर आले, गेले. पण शेतकऱ्यांच्या पोटी जन्माला येऊनही सत्तेची लालसा लागताच. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे डोळेझाक करणारे सर्वच राजकीय पक्ष चोर आहेत, ही संघटनेची भूमिका राहिली. ऐतखाऊ वर्ग सुखविलासाचा मनसोक्त उपभोग घेतो. पण कष्टकरी शेतकरी धान्याची निर्मिती करूनही अंगभर वस्त्राला व पोटभर अन्नाला पारखा बनतो. ही इंडिया भारताची शोकांतिका सरकारच्या धोरणाचे फलित म्हणून उदयास आली. परिणामी राज्यकर्त्यांना धडा शिकविण्यासाठी आंदोलनाचे हत्यार स्वीकारले पाहिजे. हा आशय कथेतून अविष्कृत होताना दिसतो.

शेतकरी संघटनेने शेतकरी आंदोलनातून शेतकऱ्यांना आर्थिक हक्क मिळवून देऊन स्वाभिमान दिला, तशाच प्रकारची प्रतिष्ठा, निर्भयता लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमातून महिला वर्गानाही देण्याचे कार्य केले. शेतकरी महिलांना कुटुंबाच्या संपत्तीत हिस्सा देणारा, स्त्रियांना मालकी हक्क देणारा कार्यक्रम म्हणून लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाकडे पाहिले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू कोड बील' मांडून वडिलोपार्जीत संपत्तीत केवळ मुलांचा अधिकार न राहता मुलींनाही मिळाला पाहिजे, हा आग्रह धरला. परंतु राज्यकर्त्यानी त्यांचे स्वप्न पूर्ण होऊ दिले नाही. डॉ. आंबेडकरांच्या नंतर शेतकरी संघटनेने लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम राबवून लोकात जनजागृती केली. बऱ्याच प्रमाणात या कार्यक्रमाला यश मिळाले. आसाराम लोमटे यांच्या कथेतही जमीन वाटपात स्त्रियांनाही समान दर्जा दिल्याचा संबंध दर्शविल्याने कथेची खोली अधिक वाढली आहे. परंतु पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना जमिनीचे वाटप करण्याचे धोरण उदार असले तरी जमिनीत पिकविलेल्या मालाची किंमत जोपर्यंत योग्य मिळत नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणार नाही, याची खंत कथेतील प्रधानपात्र सीताबाई यांच्या संवादातून दिसून येते. ''त्या रानाचं काय रे... मी थोडीच त्याच्या आशेवर बसले. रानं मिळालं तर मिळालं नाही तर नाही. चार पाटे रान वाढलं म्हणजी माझे कष्ट काय कमी होणारयत का? बाईच्या जातीला त्याच काय नवलंय... तिनं आपलं जन्मभर धूपतच राहावं. तुम्ही मला रान द्यायलात ह्यो तुमच्या मनाचा मोठेपणा, पण सगळ्यांच्या नशिबी हे आसतं का? जमीन कितीबी आसूदी बिभीषण... जोवर शेतीमालाला भाव नाही तोवर त्याच्या जमिनीला कवडीची किंमत नाही... आमचं उद्याचं आंदोलन त्यासाठीचय.''[०३] शेतकऱ्यांच्या समृद्धीचं मूळ शेतीमालाच्या भावात दडल्याचे संकेत या विधानातून अविष्कृत होताना दिसतात. शेतकरी संघटनेच्या लक्ष्मीमुक्तीच्या कार्यक्रमाने स्त्रियांना समान दर्जाचा हक्क मिळालाच शिवाय संघटनेच्या आंदोलनात केवळ शेतकरीच उतरत होता. ही मर्यादा संपुष्टात येऊन स्त्रियाही मोठ्या संख्येने आंदोलनात उतरल्या. ''आंदोलन यशस्वी व्हायचे असेल तर एकट्या जोतिबाने पुढे होवून जमणार नाही. तुमच्या बरोबरीने सावित्रीही आली पाहिजे. जोपर्यंत घरची लक्ष्मी तुमच्या बरोबर यायला नाही तोपर्यंत बाहेरची लक्ष्मी तुमच्या घरात येण्याची शक्यता नाही.''[०४] हा शरद जोशी यांचा युक्तीवाद शेतकरी महिलांना खूपच भावला चांदवडच्या महिला अधिवेशनातील स्त्रियांचा लाखोंचा समुहाय हा शेतकरी संघटनेच्या अधिवेशनातील मैलाचा दगड ठरला. स्त्रियांच्या सहभागाने शेतकरी चळवळीच्या आंदोलनाला व्यापक रूप प्राप्त झाले. आसाराम लोमटे यांच्या कथेतील नायिकाही शेतकरी महिला आघाडीच्या संघटनाचे महत्व विशद करतांना सांगतात की, ''आमच्याबी आधी किती दिवसापासून आपले गडीमाणसं भावासाठी भांडायलेत, पण आता आपून यायला साथ द्यायची ठरवलंत. ह्या लढाईत त्यायच्या पावलावर पाऊल ठेवून आपल्याला सरकारसंग भांडायचंय.... त्यासाठी सोपा उपाय. उदयाला आपल्याला सगळ्यायला वाटूर फाट्यावर 'रास्ता रोको' आंदोलन करायचंय.''[०५]

शोषणव्यवस्थेच्या विरोधातील स्त्री-पुरुष ऐक्याचे संघटन नवबदलासाठी महत्वपूर्ण व ऐतिहासिक म्हणावे लागेल. शासनकर्त्यावर दबाव आणण्यासाठी महिला वर्गाची साथ महत्वपूर्ण ठरणार आहे. या कथेत 'सीताबाई' हे व्यक्तिमत्व धैर्याचे प्रतीक म्हणून जसं समोर येत तसं दत्तराव माने हे शेतकरी संघटनेचे निष्ठावान कार्यकर्ते आपल्या कार्यकर्तृत्वाने नजरेत भरल्याशिवाय राहत नाहीत. अनेक शेतमालाच्या आंदोलनात जेल भोगणे, शेतकऱ्यांच्या मोर्चात अग्रभागी राहणे, राजकीय आखाड्यापासून अलिप्त व निःस्वार्थी व्यक्तिमत्व म्हणून दत्तराव माने सुपरिचित आहेत. कापसाच्या भाववाढीसाठी आयोजित रस्ता रोको आंदोलनाच्या प्रचारार्थ दत्तराव माने यांनी जनजागरणाचे कार्य केले. या प्रचारातून शेतकरी संघटनेच्या विचार कार्याची ओळख दिसून येते.

शेतकरी संघटनेने आपल्या कार्याची आखणी करताना पोथीनिष्ट भूमिका स्वीकारली नाही तर पारंपारिक सण उत्सवाचे संदर्भ बदललेले दिसतात. वामनाने कपट नीतीने शेतकऱ्यांचा राजा बळीराजास पाताळात गाडले. तो दिवस बलिप्रतिपदा म्हणून आजही शेतकरी आनंदाने साजरा करतात. परंतु शेतकरी संघटनेच्या विचार आंदोलनामुळे सण उत्सवाचे पारंपारिक संदर्भ बदलून स्वाभिमान जागवणारा नवविचार शेतकरी बांधवात पेरला गेला. आसाराम लोमटे यांच्या कथेतील नायक दत्तराव माने शेतकरी बांधवाच्या जनजागरण प्रचार सभेत सांगतात की, ''माझ्या भावांनो, आज तुम्ही दिवाळीचं गोड-धोड खाऊन इथं आला असताल, पण ही दिवाळी आपली नाही. लाल चोपड्या घेऊन लक्ष्मीपुजनाला हिशोब मांडणाऱ्या दलांचीच हाये ही. हा जो फटाक्यांचा आवाज येतो, तो फटाक्याचा नाही. आपल्या बापाच्या पाठीवर वाजवणाऱ्या चाबकाचा आवाजय फरक इतकाच की ह्यो चाबूक दिसत नाही अन् त्याचे वळबी दसत नाही.''[०६] शेतकऱ्यांच्या शोषणव्यवस्थेची नवसंदर्भीय दृष्टी उपरोक्त विधानातून प्रतिध्वनीत होते. श्रद्धास्थानाच्या नावाखाली शेतकऱ्याची लुटीसाठी तत्पर असलेली यंत्रणा सुप्तावस्थेत लूटण्याचे अविरतपणे काम करत असते. तेव्हा शेतकऱ्यांनी विवेकवादी दृष्टीकोन समोर ठेऊन शोषकांना ठेचून काढण्यासाठी सज्ज असले पाहिजे. हा विचार शेतकरी आंदोलनाने शेतकऱ्यांच्या ठायी पेरण्यात त्यांनी यश मिळविले. शेतीव्यवसाय हा लूटण्याचे साधन बनला आहे. सेटजी, भटजी, व्यापारी, दलाल, आडते, सावकार, धर्ममार्तंड, फिरस्ते ही सर्व मंडळी शेतकऱ्यांच्या शोषणावर पोसली गेली. श्रम करणारा शेतकरी खगत गेला आणि ऐतखाऊ शोषकवर्ग सुखविलासात रममान झाला. शेतकऱ्यांनी संघटीत होऊन रास्त व न्याय मागण्यासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन केली. पण या आंदोलनाला हिंसक व खलनायकी रूप देण्याचे काम भांडवलदारांच्या हस्तकांनी केले. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, बसेस जाळणे, दरोडा घालणे अशा सारख्या गुन्ह्याखाली शेतकरी कार्यकर्त्यावर पोलिसी अत्याचार चालविला. न केलेल्या गुन्ह्याचे शिक्षा भोगलेले अनेक कार्यकर्ते पहावयास मिळतात. या बाबीचा संदर्भ कथेत पदोपदी पहावयास मिळतो. शेतकरी संघटनेच्या अनेकविध आंदोलनात अनेक शेतकरी बांधवांना होतात्मे पत्करावे लागले.

आसाराम लोमटे यांच्या कथेतूनही शेतकरी आंदोलनाच्या कार्यकर्त्यावरील पोलिसी अत्याचाराचा संदर्भ अतिशय वास्तवरित्या चित्रित केला आहे. कापसाच्या भाववाढीसाठी शेतकरी महिला व पुरुष मंडळींनी अहिंसेच्या मार्गाने रास्ता रोको आंदोलन उभारले. 'शेतकऱ्या रे.... कष्टकऱ्या रे, उचल तुझी तलवार.... अन्यायाचा कहर झाला, गप्प किती बसणार....' हे शाहीर भारती यांच्या गीताच्या बोलाने आंदोलकांना प्रेरित केले. परंतु पोलिसांच्या आंदोलनकर्त्यावरील चक्रव्यूहाने आंदोलनाला गंभीरता संचारली. आम्हाला शांतपणे आमचं आंदोलन करू या. आम्ही स्वतःहून अटक होतो, ही संघटना कार्यकर्त्याची समजस मागणी होती. कारण यामागे हेतू असा की, आंदोलनात बहुसंख्येने स्त्रिया, मुलं, वृद्धांचा समावेश होता. शिवाय अहिंसक सत्याग्रहाने संघटनेच्या आंदोलनाला नैतिक बळ मिळून त्याचे सामर्थ्य वाढणार होते. परंतु शासनकर्त्यानी पोलिसी अत्याचराने गोळीबार, लाठीचार, अश्रूधुराचा वापर करून आंदोलन चिरडून टाकले. पोलिसी अत्याचाराने चिरडलेल्या आंदोलनाचे वर्णन आसाराम लोमटे यांनी वास्तवरूपाने साकारले. ''काय होतय हे कळायच्या आत पोलिसांनी बखोटीला धरून माणसाना गाडीत टाकायला सुरुवात केली. बाया तर भाबावून गेल्या. मुरमुऱ्याचं पोतं सुटाव तशी माणसं वाट फुटलं तिकडं पळायला लागली... एखादा पळालेला दिसला की आडवी काठी लावूनच पोलीस फेकू लागले. दोन चार जणांना काठी पायाच्या नळीवर लागल्यानं चांगलाच मार लागला. एक दोघाच्या नळ्या फुटल्या... बायांना जबरदस्तीनं आत ढकलल्या जाऊ लागलं महिला पोलिसांच्या झिज्या पकडून बाया त्यांना बकलू लागल्या. बरेच कार्यकर्ते पोलिसांनी एस.टी. त कोंबले... तेवढ्यात एका पोलिसानं आगाऊपणा केला. रस्त्याच्या बाजूला असलेल्या गाडीवर त्यानं कडब्याच्या पेंढ्या टाकल्या अन् गाडी पेटवून दिली. गाडीतल्या कडब्यासह गाडी ढणढण जळू लागली. आता मात्र लोक खवळले. मिळेल त्या पोलिसाला धरून पकडू लागले. पण पोलिसांच्या हातात काठ्या होत्या. फौजदाराच्या इशाऱ्यासरसी पोलिसांनी बेदम लाठीमार सुरू केला. दिसेल त्याला झोडायला सुरुवात केली. अश्रुधूराच्या नळकांड्या सोडल्या. त्यामुळे समोर काहीच दिसना. नुसतं धुपणच धुपण अन् वरून काठ्याचा पाऊस.... रस्त्यावर बाया माणसांच्या चपला बुटांचा सडा दिसू लागला. कुठं कुठं रक्तांचे डाग दिसू लागले. बायांच्या फुटलेल्या बांगड्याचे तुकडे दिसू लागले. सोबत आणलेल्या भाकरीचे गठुडे जागोजाग पडले होते. कोणीच भानावर नव्हतं. माणसं मुक्या माराने ठणकत होती, कण्हत होती.''[०७]

आसाराम लोमटे यांच्या कथेतील पोलिसी अत्याचाराचे भीषण वास्तव अत्यंत भेदकपणे उभं केलं आहे. महाराष्ट्रात शेतकरी संघटनेच्या विविध आंदोलनात पोलिसी अत्याचाराचे निरपराध शेतकऱ्यांना स्वतःच्या जीव गमवावा लागला. आंदोलनातील पोलिसी अत्याचाराने प्रारंभी शेतकरी महिला वर्ग भयभीत दिशाहीन झाले. परंतु नंतर या अत्याचाराला भीक घातली नाही. जेलची हवा खाऊन आलेल्या शेतकऱ्यांची भीती नष्ट झाली. आंदोलनात शेतकऱ्यांचा अभूतपूर्व सहभागाने जेलमध्ये जागा कमी पडू लागली. महिलांना जेल म्हणजे माहेरासमान वाटू लागली. 'इडा पीडा टळो, बळीचे राज्य येवो' हे मनातल्या मनात गुंजन करणारं स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर शेतकऱ्यांच्या हक्काच्या मागणीसाठी महिलाही आंदोलनात सक्रीय झाल्या. या कथेतील शेवट हा सकारात्मक उभा केला आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या. रासूका खालील दाखल गुन्हे रद्द केली, गोळीबाराची चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. परिणामी शेतकऱ्यांचा आंदोलनावरील विश्वास वृद्धिंगत होऊन स्वाभिमान जागा झाला. आसाराम लोमटे यांच्या कथेचे स्वरूप दीर्घ असले तरी कथानकाच्या मांडणीतील पकड मजबूत आहे. ही कथा अस्सल देशी जाणीव व्यक्त करत शेतकऱ्यांच्या भलेपणाचे चिंतन करणारी आहे. म्हणून या कथेची उंची आकाशाएवढी विशाल आहे.

**संदर्भ :–**


०१. लोमटे आसाराम, 'इडा पीडा टळो' शब्द पब्लिकेशन, मुंबई २०१० पृ. १२१.
०२. लोमटे आसाराम, उपरोक्त पृ. १२३.
०३. लोमटे आसाराम, उपरोक्त पृ. १३१.
०४. जोशी शरद, 'शेतकरी संघटक ६ डिसें. १९९० पृ. ०४.
०५. लोमटे आसाराम, प्रवोक्त पृ. १२५
०६. लोमटे आसाराम, उपरोक्त पृ. १२९.
०७. लोमटे आसाराम, उपरोक्त पृ. १३६.



**प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत**
**ता. औसा, जि. लातूर.**
**शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी**
**मो. ९४२१४८५३८६**


♦ ♦ ♦

# संपलेली दिवाळी

कपाशीची बोंडं वेचनाऱ्या बहिणचं,
दोन दांडाचं लुगडं पाहुन
खुडणाऱ्या ज्वारीचं वन मागणाऱ्या मायचं,
खपाटी गेलेलं पोट पाहुन
भट्टीवरच्या विटांनी करपलेल्या भावांच्या,
गळणाऱ्या झोपडीचं रूप पाहुन
दिवाळी हासता हासता रडली....।।१।।

कर्जात बुडालेल्या शेतकरी भावाचा,
थकीत वसुल करणारा बेलीफ पाहुन
अर्थकरणाच्या आधारभुत कष्टकऱ्यांचे,
मरनाचे महागलेले सरण पाहुन
दिवाळी हासता हासता रडली....।।२।।

काल माझी आजी उघड्यावर शौच्याला बसत होती,
आज माझी माय बसते, उद्या पोरगिही तसचं करणार आहे
देशात प्रगतीचं हे चित्र पाहुन
दिवाळी हासता हासता रडली....।।३।।

भर चौकात देवाला भक्तीचा मोबदला,
मागणारे हजारो हात दिसले
पण देव घडवणाऱ्या हाताच्या पोटाचा,
कुणी विचारही केला नाही
त्यांच्या मरणावर पै-पैसे वाहणारे नव्हते
म्हणून दिवाळी हासता हासता रडली....।।४।।

माडिवरच्या तलम वस्त्र नेसणाऱ्या बिलंदरांनी,
रडणाऱ्या दिवाळीचा भोग घेतला
त्यांच्या दिव्यातुन गोडे तेलाचा पाट वहात,
ज्योती तेवत राहिल्या
इथे आमच्या भाजिसाठीही तेल नव्हतं
म्हणून दिवाळी हासता हासता रडली....।।५।।

इतिहासाचा दाखला देऊन सांगतो,
आमचा तरुण उदार आहे
आम्ही खोट्या शिक्यांना कलदार ठरउन
त्यांचे जोडे पुसले आहे
आमचा लिलाव झाला तरीही,
त्यांचे सत्कार करणाऱ्यांनो
खोटं बोलणार नाही, देवा शपथ सांगेन
आमचा प्रत्येकाचा देव, सैतानाच्या ताब्यात आहे
या षंढांना आम्ही आमचे नेते मानले आहे
केवळ आमच्या या चुकीच्या प्रायश्चितासाठी
आपली दिवाळी रडता रडता संपली....।।६।।


**– प्रकाश दलाल**
**शे.घाट, ता. वरूड, जि. अमरावती**

SSI Reg.No. 270081200088 Part 2 Dt. 27-04-2011

**WASUDEO PRESSING FACTORY**

**COTTON MERCHANTS & COMMISSION AGENT**

SINDI - 442 105 (C. Rly.) Dist.- Wardha


Email : wasudeopressingfactory@in.com

Fax : 07155-261679
Mob : 9422844004
9860967856
9890435034

*Annapurna*

**RICE AGRO INDUSTRIES**

Off.: Main Road, Gadchiroli (M.S.)-442605 Ph. 07132-232937, 222625
Fact.: Murkhala, Dist. Gadchiroli Ph.222625,7350912780,
Fax : 07132-233542, Email : nandkishorsarda@gmail.com



**कृषी विकास केन्द्र**

बस स्टँड जवळ, तरोड, त.जि. वर्धा
फोन : ०७५५२ – २८९००६

* बि–बियाणे
* रासायनिक खते
* किटकनाशके विक्रेता

**रामदेव ट्रेडर्स**

वर्धा प्रो. जे.आर. मुंधडा

**शेतकरी सुविधा**

सिंदी रेल्वे

**किसान ट्रेडींग कंपनी**

सिंदी रेल्वे

**WASUDEO INDUSTRIES**

**GINNING & PRESSING FACTORY**

Cotton Mearchant & Quality Cotton Supplier

SINDI - 442105 (C. Rly) Dist. Wardha, Main Road, SINDI

।। श्री संत सखुआई प्रसन्न।।

फोन नं. २६१२१६
मो. ९८६०५७३१८२

**भूषण कृषी केंद्र**

मेन रोड, बाजार चौक सिंदी (रेल्वे), ता. सेलु, जि. वर्धा

प्रो. सुरेशभाऊ लेंडे

*आमचे येथे सर्व प्रकारची रासायनिक खते, किटकनाशके व बि-बियाणे मिळेल.*

# घोषणा दुपटीची, धोरणे निमपटीची

वर्षभरापूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न ५ वर्षात दुप्पट करण्याची घोषणा केली होती. या घोषणेचे सरकारी पातळीवर सुतोवाच अर्थमंत्र्यांनी ताजा अर्थसंकल्प मांडताना केले. २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यास सरकार बांधील असल्याचे २०१७-१८ साठीचा अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्र्यांनी सांगितले. यावर भाष्य करताना अनेक तज्ज्ञांनी असे व्हायचे असेल तर शेतीक्षेत्राचा विकासदर १४ ते १६ टक्के असायला हवा असे प्रतिपादन केले. गतवर्षी २ टक्क्याच्या आसपास असलेला विकासदर यावर्षी ४ टक्क्याच्या किंचित वर राहील असा आशावाद सरकारी पातळीवरून व्यक्त होतो आहे. असा आशावाद व्यक्त होण्यामागे सरकारने अंमलात आणलेल्या कोणत्या योजनांचा हात नसून यावर्षी निसर्गाच्या कृपेने पाउसपाणी चांगले राहिले हे त्यामागचे मुलभूत कारण आहे. ज्याप्रकारची धोरणे अवलंबिल्या जात आहेत आणि शेतीक्षेत्रासाठी जी तरतूद केली जात आहे ते लक्षात घेतले तर निसर्ग अनुकूल राहिला तरी येत्या ५ नव्हे तर १० वर्षात अपेक्षित विकासदर गाठता येणे अशक्य आहे. मनमोहनसिंग यांच्या राजवटीत सलग ४-५ वर्षे पाउसपाणी चांगला राहूनही शेतीचा विकासदर वाढला नव्हता हे इथे लक्षात घेतले पाहिजे. निसर्गा सोबतच सरकारी धोरणे शेतीनुकुल नसतील तर शेतीक्षेत्राचा विकास आणि प्रगती शक्य नाही . पाण्याच्या दुष्काळाला शेतकरी नेहमीच तोंड देत आला आहे. शेतकऱ्याला तोंड देता येत नाही ते धोरणाच्या सरकारी दुष्काळाला . प्रश्न विकासदर वाढण्याचा नाही . विकासदर वाढणे याचा अर्थ जास्त उत्पादन होणे. आणि जास्त उत्पादन होणे याचा अर्थ शेतकरी गड्ड्यात जाणे. हरितक्रांती आली त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न नाही पण उत्पादन वाढले. उत्पादनवाढीची नितांत गरज होतीच. उत्पादन वाढण्याच्या प्रमाणात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले असते तर हरितक्रांतीने शेतीक्षेत्रात क्रांती घडविली असती. हरितक्रांतीने नेमके विपरीत घडले. शेतीचा खर्च वाढला , खर्च भागविण्यासाठी कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले पण खर्चाच्या तुलनेत उत्पन्न न वाढल्याने शेतकऱ्याची दैना वाढली. हरितक्रांतीपूर्वीही शेतकरी दीनच होता. हरितक्रांतीने उत्पादनात भर घातली तशी शेतकऱ्यांच्या दैन्यात देखील तितकीच भर घातली. अनेकांना आजही असे वाटते की हरितक्रांतीने शेतकऱ्यांची सगळी घडी विस्कटली. पण हे खरे नाही. यात चूक हरितक्रांतीची नव्हती. चूक सरकारी धोरणांची होती. सरकारने शेतीतील उत्पादनवाढीकडे जितके लक्ष दिले , त्यासाठी जितकी अनुकुलता निर्माण करण्याचा प्रयत्न केला तसे लक्ष शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते की नाही इकडे दिलेच नाही. किंबहुना धोरणे अशी आखली की शेतीतील उत्पादन वाढेल पण शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही. जनतेला



शेतीमाल - अन्नधान्य , भाजीपाला, फळ इत्यादी - स्वस्त मिळाले पाहिजे असाच पूर्वीपासून कटाक्ष होता आणि हरितक्रांतीने त्यात फरक पडला नाही. हरितक्रांतीने बाजारात शेतीमालाच पुरवठा वाढला आणि पुरवठा वाढला की किंमती घसरणार हा बाजाराचा नियमच आहे. पण सरकारने शेतीमालाचा व्यापार ना व्यापाराच्या नियमानुसार चालू दिला ना किंमतीच्या घसरणीला संरक्षण दिले. सरकारी धोरणच असे राहिले की ज्यामुळे व्यापार शर्ती कायम शेतकऱ्यांच्या विरुद्ध राहिल्या आहेत.

बाजारात शेतीमाल चढ्या भावाने राहिला तर भाव पाडण्याची तजवीज सरकारतर्फे अग्रक्रमाने केली जाते. भाव वाढलेल्या शेतीमालाच्या निर्यातीवर बंधने लादून आणि त्या मालाची तातडीने आयात करून शेतमालाचे भाव पाडण्याचे सरकारचे अधिकृत धोरण राहिले आहे. भाव वाढले तर सरकारचा हस्तक्षेप ठरलेला , पण भावात घसरण झाली तर हस्तक्षेप करून घसरण थांबविण्यासाठी किंवा घसरणीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कोणतेही संरक्षण द्यायचे नाही हे शेतीमाला बाबत सरकारचे कायम दुटप्पी धोरण राहिले आहे. उरलीसुरली कसर जीवनावश्यक वस्तूच्या कायद्याने भरून काढली आहे. १९५५ साली तयार केलेल्या या कायद्याने शेतीमालाच्या मुक्त व्यापारावर निर्बंध आला. बाजारपेठेचे नियम शेतकऱ्यांना आपल्या बाजूने करता येणार नाहीत अशी तजवीज सरकारने या कायद्याद्वारे केली. शेतकऱ्यांनी आपली कबर स्वत:हून खोदावी यासाठी सरकारने शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कृषी उत्पन्न बाजार समित्या निर्माण केल्या. देशहिताच्या नावावर शेतकरी हित गौण झाले. देशहित म्हणजे काय तर मध्यमवर्गीय, उच्चवर्गीय या बऱ्यापैकी उत्पन्न असलेल्या गटांना चैनीच्या वस्तूंवर अधिक खर्च करायला मिळावा यासाठी अन्नधान्य, भाजीपाला यावर कमीतकमी खर्च होईल अशी व्यवस्था ! सुरुवातीला सरकारनेच औद्योगिकरणाला गती देण्यासाठी कच्चामाल स्वस्त मिळावा यासाठी आणि मजुरांना जास्त पगार द्यावा लागू नये या हेतूने शेतीमाल स्वस्त ठेवण्याचे धोरण ठेवले आणि या धोरणाने सुस्थितीत आलेला , गब्बर झालेला वर्ग आपल्या हिताची ही व्यवस्था आता मोडू द्यायला तयार नाही. जीवनावश्यक नसलेल्या कांद्याचे भाव वाढले तर निवडणुकीत सरकार पाडण्या इतकी ताकद या वर्गाच्या हाती आली आहे. शेतीमालाचे भाव पडले म्हणून सरकार पडले असे स्वातंत्र्यानंतर कधी घडले नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या बाबतीत

सरकार नेहमी निश्चिंत राहात आले आहे. शेतकऱ्यांचे हित बघण्याची राजकीय निकड सरकारला फारसी कधी जाणवत नाही. थातुरमातुर घोषणा करून वेळ निभावता येते हे सरकारने जोखले आहे. मोदी सरकारने कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या जोखडातून शेतकऱ्यांना मुक्त करण्याचा देखावा निर्माण केला आहे. पण पर्यायी बाजाराशिवाय हे पाउल शेतकरी हिताचे ठरत नाही हे कमी दिवसात लक्षात आले आहे. मुळात कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे अधिकार कमी करण्याचा निर्णय आर्थिक असण्यापेक्षा राजकीय अधिक आहे. एकूणच सहकारावर आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यावर काँग्रेसचे वर्चस्व आहे. मोदी सरकारला ते मोडीत काढायचे आहे. पर्यायी चांगल्या व्यवस्थेसाठी शेतकरी या बाबतीत मोदी सरकारच्या पाठीशी राहू शकतो पण मोदी सरकारकडे पर्यायी व्यवस्थेचा किंवा शेतकरी हिताचा विचारच नाही. एकीकडे शेतकऱ्यांच्या हिताच्या नावावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकार कमी करायचे आणि दुसरीकडे ज्या ज्या शेतीमालाचे बाजारात भाव वाढले ते ते शेतीमाल तातडीने आयात करून भाव पाडण्याची मोदी सरकारची रणनीती राहिली आहे. आजवर टंचाई निर्माण झालेल्या शेतीमालाची आयात व्हायची .आतामात्र ज्या मालाची टंचाई नाही असा माल सुद्धा मोठ्या प्रमाणात आयात होवू लागला आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे मुबलक प्रमाणात देशांतर्गत गहू उपलब्ध असताना मोदी सरकारने गहू आयातीचा निर्णय घेतला आहे. गरज नसताना बहुमुल्य परकीय चलन खर्च करून आयात करण्यामागे आयती-निर्यातीतून मिळणारी दलाली हे जसे कारण असू शकेल तसेच भविष्यात गव्हाच्या भावात वाढ होवू नये यासाठी दूरदृष्टी'ने केलेली ही तरतूद असली पाहिजे. शेतकरी विरोधी तरतुदी धुमधडाक्याने लागू करण्याचा सरकारचा उत्साह बघता शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याची दूर दूर पर्यंत कोणतीही शक्यता दृष्टीपथात येत नाही.

एकीकडे शेतीतील उत्पादन वाढते राहिले पाहिजे आणि त्याच प्रमाणात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत राहिले तरच एक दशकात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याची शक्यता निर्माण होईल. यातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे जमिनीचे छोटे छोटे होत जाणारे तुकडे. शेतीबाह्य व्यवसाय वाढत असतात. त्यांची भरभराट होत राहते. कारण त्यात नफा मिळतो. शेतीमध्ये मात्र खर्च केलेले भांडवलही परत मिळत नाही. भांडवल खावून तग धरणारा शेतीव्यवसाय असल्याने शेतकरी भांडवल खाऊनच जगतो. त्याच्या जगण्यासाठी शेती उत्पन्न पुरेसे ठरत नाही आणि वाढते खर्च भागविण्यासाठी शेतीचे तुकडे करून विकण्याची पाळी येते. भांडवल आणि कौशल्य याचा अभाव असल्याने दुसरा व्यवसायही शेतकरी कुटुंबाला करता येत नाही. त्यामुळे शेतीच्या वाटण्या अपरिहार्य ठरतात. याच्या जोडीला सरकारने सिलिंग कायदा लागू करून लक्षावधी अल्पभूधारक निर्माण करून ठेवले आहेत. २०१०-११ च्या कृषी मंत्रालयाने केलेल्या शेती गणनेनुसार ६७ टक्क्यापेक्षा अधिक शेतकरी अल्पभूधारक आहेत ज्यांचे जवळ १ हेक्टर पेक्षाही कमी जमीन आहे. १ ते २ हेक्टर दरम्यान जमीन धारकांची संख्या जवळपास १८ टक्के आहे. म्हणजे देशातील ७५ टक्के शेतकरी असा आहे ज्याच्याकडे शेती करणे परवडणार नाही अशी जमीन धारणा आहे. याच वर्गातून मोठ्याप्रमाणावर आत्महत्या होत आहेत हे लक्षात घेतले तर छोटी जमीन धारणा शेती व्यवसायासाठी प्रतिकूल असल्याचे स्पष्ट होते. नवे संशोधन आणि नवे तंत्रज्ञान यासाठी अशी जमीनधारणा अनुकूल ठरत नाही. देशातील ७५ टक्के शेतकरी जर आधुनिक शेती करण्याची क्षमता बाळगून नसेल तर देशात शेतीसंबंधी तंत्राद्यान विकसित होणे आणि संशोधनाला चालना मिळणे कठीण आहे. २ ते १० हेक्टर पर्यंत जमीन धारणा असलेल्या शेतकऱ्यांची टक्केवारी १४.३ होती तर १० हेक्टर पेक्षा अधिक शेती असलेल्या मोठ्या' शेतकऱ्यांची संख्या १ टक्काही नव्हती. २०१०-११ च्या गणनेनुसार ही संख्या ०.७ टक्केच होती. या गणनेस ५-६ वर्षे उलटून गेली . त्यामुळे शेतीचे यापेक्षा जास्त तुकडे होवून मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांच्या संख्येत आणखी घट झाली असेल तर छोटे शेतकरी अल्पभूधारक आणि अल्पभूधारक भूमिहीन बनले असतील. शेतीचे असे तुकडे होत जाणार असतील तर शेती कधीच किफायतशीर होवू शकणार नाही. कमी जमीन धारणा शेतीसाठी फायद्याची नाही हे अधिकृतपणे सरकार मान्य करण्याची हिम्मत दाखवीत नाही तोपर्यंत शेती व्यवसायाची भरभराट होवू शकत नाही. ५ वर्षात दुप्पट उत्पन्न हे निव्वळ स्वप्नरंजन आहे. त्यासाठी शेती व्यवसायावर अवलंबून असलेला जनसंख्येचा भार मोठ्या प्रमाणावर कमी करावा लागणार आहे. शेतीविषयक सरकारी धोरणात मूलगामी परिवर्तन झाले नाही तर छोट्या आणि अल्पभूधारक शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट होण्या ऐवजी तो ५ वर्षात खात्रीने भूमिहीन होईल. आज गरज अल्पभूधारक आणि छोट्या शेतकऱ्यांना दुसऱ्या व्यवसायात सामावून घेण्याची गरज आहे. ज्यांच्याकडे भांडवल आहे आणि जे नवे संशोधन आणि तंत्रज्ञान शेतीत आणू शकण्याची क्षमता बाळगून आहेत अशा लोकांसाठी शेतीक्षेत्र खुले झाले पाहिजे. असे झाले तरच शेती उत्पादन वाढेल आणि शेतीतून शेतकऱ्याला चांगले उत्पन्नही मिळेल. शेतीविषयक सगळे कायदे या मार्गाने जाण्यातील सर्वात पहिला आणि मोठा अडथळा आहे. हा अडथळा दूर करणे सर्वस्वी सरकारच्या हाती आहे. शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट व्हायचे असेल तर सरकारने पहिला अडथळा दूर करून शेतीतील अतिरिक्त'लोकांचे समायोजन उद्योगात करण्याची पंचवार्षिक योजना आखली पाहिजे. यासाठी सरकारवर दडपण आणणे हेच शेतकरी चळवळीचे उद्दिष्ट असले पाहिजे.

**- सुधाकर जाधव,**
**पांढरकवडा , जि. यवतमाळ, मोबाईल - ९४२२१६८१५८**

# पुरस्कारांचे राजकारण

**खुशिया कम और अरमान बहुत है,**
**जिसे भी देखो परेशान बहुत है,**
**कहते है सच का कोई मुकाबला नही,**
**मगर आज झूठ की पहचान बहुत है।**

सध्याचे दिवस प्रामुख्याने पुरस्कारांचे दिवस आहेत. भारत सरकारचे पद्म नागरी पुरस्कार, विविध साहित्य सम्मेलने, विविध संस्थाचे पुरस्कार वितरण, विद्यापीठ व महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, कथा, कविता, लेखन तसेच सामाजिक संस्थांचे पुरस्कार सोहळे, खासगी कंपन्यांचे कार्यक्रम झालेत व होत आहेत. या सोहळ्यात खरोखरच किती लायक व्यक्तिंना पुरस्कार मिळतो? हा खरा प्रश्न आहे. जवळची, मोठी फायदेशीर ठरणारी व्यक्ती म्हणून पुरस्काराला दिला जातो का? पुरस्कार देणे म्हणजे कसली परतफेड तर नाही ना? आदी प्रश्न ही उपस्थित होतात. वास्तविक सद्धस्थितीत सर्वत्र पुरस्कारांची गर्दी झाली आहे. तर अशा कार्यक्रमात उपस्थिती फक्त दर्दींची (नगण्य) राहिली आहे. अनेक पुरस्कारांसाठी शिफारसी, पक्ष, कार्यकर्ता असे लागेबंध पाहता नुकताच २६ जानेवारीला भारत सरकारने पद्म पुरस्कार दिले. त्यामध्ये मा. शरद पवार, मुरलीमनोहर जोशी यांना पद्मविभूषण तर सुश्री निवेदिता भिडे यांना पद्मश्री व इतरांना दिलेल्या पुरस्कारावर अशीच चर्चा झाली आहे. दरम्यान भ्रष्टाचाराविरुद्ध लढणाऱ्या अण्णा हजारे यांना पद्मभूषण आणि ज्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध लढले त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्म विभूषण पुरस्कार. यालाच म्हणतात एक कदम भ्रष्टाचार मुक्त भारत की ओर! असा मार्मिक मॅसेज सोशल मीडियावर फिरत होता. असो. एकंदरीत पुरस्कारांची खरी मजाच निघून गेली की काय? असे वाटते.

अनेकवेळा पुरस्कार खिरापतीसारखे वाटले जातात. कुणाला तरी मोठे करण्यासाठी त्याच्या प्रसिद्धीसाठी पुरस्कार दिले जातात. तर कधी पुरस्कार देणाऱ्या संस्थेला मोठे करण्यासाठी (घेणारा मोठा असेल तर पुरस्कार मोठा होतो) पुरस्कार दिले जातात. अर्थात मॅनेज पुरस्कारांची संख्या खूप वाढली असून पैसे घेऊन पुरस्कार देणे, गल्ली बोळातून राज्यस्तरीय पुरस्कार देणे, 'तू मला मिळवून दे- मी तुला मिळवून देईल' असे साटेलोटे पुरस्कार देणे, पुरस्काराची रक्कम फक्त वृत्तपत्रात ते ही पुरस्कार घेणाऱ्यानेच जाहीर करणे, प्रत्यक्षात तसे काही नसणे, दरवर्षी पुरस्काराचे नाव बदलून एकाच व्यक्तिला पुरस्कार देणे, आदर्श नसताना आदर्श ठरवून पुरस्कार देणे, आदी प्रकार सर्वत्र जोमात सुरू आहेत. काही नामवंत संस्थाचे पुरस्कार याला अपवाद आहेत. त्यांनी पुरस्काराचे मोठेपण जपले आहेत. यामध्ये महाराष्ट्र फाऊंडेशनचे पुरस्कार, साहित्य अकादमीचे पुरस्कार तसेच सरस्वती

**देशात, राज्यात सरकार बदलले की, त्या-त्या पक्षाच्या विचारसरणीच्या किंवा जवळच्या लोकांना शासकीय पुरस्काराने सन्मानीत करण्याची जुनी पद्धत आहे. तर अनेकवेळा त्या व्यक्तिच्या ऋणातून राज्यकर्त्याने उतराई होण्याचा हा प्रकार असतो. त्यामुळेच सरकारच्या काही पुरस्कारांच्या विरोधात बोंबाबोंब होत असते. काही वेळा उत्कृष्ट कार्य असतानाही त्या व्यक्तिची जात, धर्म आडवा येतो तर कधी-कधी हे पाहूनच पुरस्कारासाठी विरोध केल्या जातो किंवा त्यांचे कार्य योग्य नसल्याचा आरोप केला जातो. अर्थात पुरस्कारांचे दोन्ही बाजूने राजकारण केले जाते.**

सन्मान अवार्ड अशी आणखी काही नावे घेता येतील. काही संस्थांकडून वाचकांच्या प्रतिक्रिया बोलवून प्रामाणिकपणे पुरस्कार दिल्या जातात. तर खऱ्या अर्थाने राज्यस्तरीय पुरस्कार देणे, पुरस्कार प्राप्त व्यक्तिंचा संपूर्ण मान सन्मान ठेवणे, त्यांची राहण्याची, भोजनाची व प्रवास खर्च देण्याची व्यवस्था करण्यासोबतच, पुरस्काराला साजेशी रक्कम देण्याच्या पद्धती काही संस्थांनी जोपासल्या आहेत. परंतु अशा प्रामाणिकपणे, निःपक्ष व निर्भीडपणे निवडूण कार्य करणाऱ्या संस्था आता नगण्य आहेत.

वास्तविक ज्ञान, साहित्य, कला, समाजकार्य आदी विविध क्षेत्रांमध्ये चांगले काम करणाऱ्या व्यक्तिला अनेक संस्था पुरस्कार देतात. त्यांच्या चांगल्या कार्याचे कौतूक व गौरव केल्याने इतरांनाही तसे कार्य करण्याची प्रेरणा व्हावी, यासाठी त्या व्यक्तिला सन्मानित केले जाते. त्या व्यक्तिला संस्थेकडून बक्षीस (पारितोषिक), पदक, चषक (करंडक), ढाल, मानपत्र, ताम्रपट, हारतुरे, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह किंवा रोख रकमेच्या रुपात हा सन्मान दिला जातो. संस्थांनी, संघटनांनी दिलेल्या पुरस्कारांची माहिती वेळोवेळी प्रसारमाध्यमातून किंवा त्या संस्थांच्या मुखपत्रातून, स्मरणिकेतून प्रसिद्ध होत असते. हे पुरस्कार केवळ मानाचे असतात, व्यक्तिनामाच्या आधी किंवा नंतर त्यांचा लिखित उल्लेख करायचा नसतो. तर त्या व्यक्तिला असा पुरस्कार मिळाला आहे, असा उल्लेख केवळ बोलताना, भाषण करताना किंवा व्यक्तिवृत्त (बायोडाटा) लिहिताना करायचा असतो. हे संकेतही पाळले जात नाही. पुरस्काराचा असाच प्रकार विद्यापीठातून डी.लिट. (डॉक्टर) या सन्मानार्थ दिलेल्या पदवीचा आहे. ही पदवी मिळविण्यासाठी कोणताही अभ्यास करावा लागत नाही, परीक्षाही द्यावी लागत नाही किंवा जगावेगळे असे काही करावे लागतेच असे नाही. ही पदवी मिळालेल्या व्यक्तिच्या नावाआधी डॉ. (डॉक्टर) असे लिहिण्याची प्रथा अयोग्य आहे. एखाद्या राजकारणी माणसाला ही मानाची डॉक्टरेट एका विद्यापीठाकडून मिळाली

की अन्य विद्यापीठांमध्ये त्याच व्यक्तिला डी.लिट. देण्याची स्पर्धा लागते. योगगुरु रामदेव बाबा यांना चार विद्यापीठांनी डॉक्टरेट दिली आहे. हा प्रकारही चुकीचाच म्हणावा लागेल.

देशात, राज्यात सरकार बदलले की, त्या-त्या पक्षाच्या विचारसरणीच्या किंवा जवळच्या लोकांना शासकीय पुरस्काराने सन्मानीत करण्याची जुनी पद्धत आहे. तर अनेकवेळा त्या व्यक्तिच्या ऋणातून राज्यकर्त्यांने उतराई होण्याचा हा प्रकार असतो. त्यामुळेच सरकारच्या काही पुरस्कारांच्या विरोधात बोंबाबोंब होत असते. काही वेळा उत्कृष्ट कार्य असतानाही त्या व्यक्तिची जात, धर्म आडवा येतो तर कधी-कधी हे पाहूनच पुरस्कारासाठी विरोध केल्या जातो किंवा त्यांचे कार्य योग्य नसल्याचा आरोप केला जातो. अर्थात पुरस्कारांचे दोन्ही बाजूने राजकारण केले जाते.

समाज भूषण, समाजरत्न आदी नमूद करून जातिनिहाय पुरस्कार देण्याची व मिळविण्याची अनेकांना हौस असते. थोर पुरुषाच्या नावाला त्यांची जात जोडूनही पुरस्कार दिले जातात. सामाजिक कर्तृत्व, सामाजिक दातृत्व व वाङमयीन नेतृत्व नसताना, दिल्या जाणारे हे पुरस्कार खरे तर जातीय पुरस्कार असतात, तर जातीसाठी काही करावे असे सांगून दिलेले हे पुरस्कार आवळा देऊन भोपळा काढण्याच्या प्रकारात मोडतात. दुसरीकडे अशा प्रकारातून थोर पुरुषांची, राष्ट्रीय नेत्यांची बदनामी होत असते. त्यांना छोटे करण्याचा हा प्रयत्न ठरतो, एव्हढे भानही या महाभागांना नसते.

अनेक संस्थांनी पुरस्कार देण्याचा धंदा सुरू केला असून पुरस्कार प्राप्त व्यक्तिकडून रोख रक्कम घेणे, पुस्तीका काढून त्यात परिचय छापण्याची रक्कम घेणे, विविध स्पर्धा आयोजित करून प्रवेश फी व सहयोग रक्कम घेणे व नंतर त्यातीलच थोडी रक्कम खर्च करून गावात किंवा मोठ्या शहरात कार्यक्रम, समारंभ आयोजित करून पुरस्कार व प्रमाणपत्र वाटण्याचे प्रकार खूप वाढले आहेत. फेलोशिप पुरस्कार सांगुनही दरमहा पैसे दिले जात नाही, तर ३ ते ५ हजारामध्ये फेलोशिपचे प्रमाणपत्र दिल्या जाते. विविध राज्यातून असे शेकडो पुरस्कार दिले जातात. दिल्ली किंवा मोठ्या शहरात यामधील फक्त दहा पुरस्कार प्रतिनिधीक स्वरुपात देऊन इतर पुरस्कारांसाठी काऊंटर उघडले जातात, तेथून ते मिळवा, असे सांगितले जाते. अनेक ॲच्युमेंट अवार्ड हे मॅनेज करून पुरस्कारांसाठी हापापलेल्यांनी मिळविलेले असतात. (पुरस्कार मिळाल्यावर तो थैलीत घालून सर्वांना दाखवत मिरविणारेही महाभाग आहेतच.) वैद्यकीय क्षेत्रात त्या-त्या कंपनीची जास्त औषधी लिहून विक्री वाढविली म्हणून विविध पुरस्कार दिल्या जातात. तसेच कुठलेही सामाजिक कार्य नसताना त्यांचा गौरव केल्या जातो. तर वृत्तपत्रांनाही जागा भरण्यासाठी बातम्या पाहिजेत म्हणून तेही अशा पुरस्कारांच्या बातम्यांना प्रसिद्धी देतात, परिणामी असे गैरप्रकार आणखी वाढतात, असे हे चित्र आहे. तर साहित्यिकांमध्ये असे प्रकार खूप चालतात. काही चांगले साहित्यिक व प्रतिष्ठित व्यक्ती आधी चौकशी करून बोगस पुरस्कारांना विनम्र नकार देत असतात. एकंदरीत साहित्यक्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र, शिक्षण, प्रशासन, समाजसेवा व पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रात मॅनेज पुरस्कारांचे राजकारण खूप मोठे असून पुरस्कारांचे पेव फुटले असून पात्रता नसतांना दिलेल्या व मिळविलेल्या पुरस्कारांचे प्रकार रोखण्यासाठी काही करायला हवे. वास्तविक संबंधीत शुभेच्छूकांनी व नागरिकांनी पुरस्कार प्राप्त व्यक्तिचे कौतूक समारंभ आयोजित करण्यापूर्वी जाणकारांकडून माहिती घ्यावी, चुकीच्या अर्थातच अपात्र व्यक्तिचे अभिनंदन करू नये. एव्हढे जरी केले, तरी या प्रकाराला थोडे फार रोखता येऊ शकेल, असे वाटते. तसेही पुरस्कार प्राप्त योग्य व्यक्तिचे कार्य, विचार व आचार तसेच त्याचे साहित्य, पुस्तक हेच जीवंत स्मारक असतात. तेव्हा तेच वाचले पाहिजे, त्याचाच प्रचार व प्रसार केला पाहिजे, त्यातूनच प्रेरणा व स्फूर्ती मिळते. शेवटी आयुष्यात आपणच खूप यशस्वी आणि पुरस्कृत आहोत हे दाखविण्याचे प्रयत्नात नैसर्गिक आनंदापासून दूर जाणाऱ्यांसाठी एक शेर आठवतो....

**जिंदगी में भाग जा रहे है, कामयाबी की तलाश में,**
**सुकुन से ही दूर जा रहे है, सुकून की तलाश में।**

**– राजेश राजोरे, पत्रकार**
**खामगाव, जि. बुलढाणा,**
**मो. ९८२२५९३९०३**

# तुमचा तक्रारलेख


स्विकारताना 'पद्मविभूषण'
शेतकरी कष्टकऱ्याच्या
कार्यकर्तृत्वाचे श्रेय लाटता।
मात्र
लक्षावधि माय-भगिनींच्या
पांढऱ्या कपाळावर
ललाटलेख लिहिल्याचे
तुमचे कार्यकर्तृत्व।।
विसरलात तुम्ही
सोयिस्कर जरी,
लेखाजोखा त्याचा
नियती ठेवते आहे
आपल्या दप्तरी
न्यायासाठी.

**– श्याम पवार**
**महाकुगे, मो.९८६०८९२९६७**

# बांधावरचे मोती

विश्वस्तरीय लेखनस्पर्धा-२०१६ : विजेत्या प्रवेशिका





## जोमात पीक आले

जोमात पीक आले पण मातले तणाने
खचतोस काय वेड्या इतक्यात संकटाने

हातात दोर बघता भयभीत बांध खचला
अन् उन्मळून पडली बाभळ तुझ्या भयाने

आता ऋतू तिन्हीही झालेत हाड वैरी
दुष्काळ जीव घेणा टपलाय संभ्रमाने

कर्जात जन्म झाला अन् फेडण्यात गेला
खाऊन तूप रोटी ते झिंगले सुखाने

तू साजरा करावा बस् फक्त बैल पोळा
ते डान्स बार बाला बघतात विस्मयाने

तू पोसलीस जनता उपसून कष्ट तेव्हा
ते चांदण्यात फिरले तू खंगला श्रमाने

बाजारभाव खाली घसरेल ऐनवेळी
ते लावतील बोली तू ऐक संयमाने

**- सौ. संध्या पाटील,**
**कराड**

## माणसासाठी कणसात दाणा

खळ्यावरचे खळते जगणे
कागदावरच पडती राशी
माना फिरवती ऊखळी सांधे
नगरामधले गणित उपाशी...

आशयाचे काळीज ओझे
शब्द कुणबी मळतो खांदा
सालभराच्या सोसिक तोंडी
सण पोळ्याचा रसिक मांडा...

हात हिकमती ओरबाडणारे
नागडी होते सुपीक माती
पंगत एकच खाणारांची
राबणारांच्या हजार जाती...

मांडीवरती दुष्कळाच्या
हंबरणारे दुधाळ चेहरे
पट मांडता महागाईचा
बदली सोंगट्या आपली घरे...

बुरखा ओढून निजती नगरे
माणुसकीने टाकल्या माना
माती मात्र जपते अजून
माणसासाठी कणसात दाणा...

**- रावसाहेब जाधव (चांदवड)**
**चांदवड, जि.नाशिक ४२३१०१**

तिसरे अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा !





Prop. Chandrakant Thakkar

# SHRI SANT GAJANAN SHETIMAL PRAKRIYA UDYOG

Deoli Road, Waigaon (Nipani) Th. & Dist. Wardha-442108
Phone : (O) 07152-280030, Mob. No. 9422141050

# शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपध्दती

## विश्वस्तरीय लेखनस्पर्धा–२०१६ : पुस्तक समीक्षण – विजेती प्रवेशिका

शेतकरी आंदोलन उभे करताना, मा. शरद जोशींनी जी शेतकरी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे घेतली, त्यात जी साधक-बाधक चर्चा झाली, त्या चचेचे शब्दांकित रुप म्हणजे हे पुस्तक आहे.

९ ऑगस्ट १९८९ रोजी चाकण येथे शेतकरी संघटनेच्या कार्यालयाचा शुभारंभ झाला. १९७९ पासून 'शेतीमालास रास्त भाव' या एककलमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, तंबाखू, दूध, भात, कापूस इत्यादी पिकांच्या शेतकरी आंदोलनांची सुरुवात झाली. शेतकरी आंदोलनाची उद्दिष्ट्ये/विचार, शेतकऱ्याचे प्रश्न, आंदोलनाची कार्यपद्धती कशी आहे? याचा सांगोपांग विचार या पुस्तकात मांडला आहे.

गांजलेला शेतकरी दिशाहिन होता. आधी झालेली आंदोलने दडपली गेली, अयशस्वी झाली. शेतकरी निराश झाला होता. अशा वेळी त्याला उठविणे, उभे करणे अवघड होते. पण छोट्या छोट्या आंदोलनांना मिळणाऱ्या यशाने त्याच्या आशा पल्लवित झाल्या व तो मा. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली उभा राहिला. यावेळी सर्वात जास्त गरज होती, त्याचे मनोधैर्य टिकवण्याची! मा. शरद जोशींनी हे शिवधनुष्य पेलले. सोबत आलेल्या शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळावा, त्यांचा मेहनताना मिळावा यासाठी ते सत्ताधीश सरकारविरुध्द ठामपणे उभे राहिले.

शेतकरी अंदोलनाची दिशा काय होती/असावी, कुठले प्रश्न मांडावेत कधी मांडावेत, आंदोलनाची वेळ काय असावी, याचा शेतकऱ्याच्या दृष्टीकोनातून विचार करून आखणी केली गेली. पेरणीची वेळ, ग्राहकाची गरज, मौसम या सर्वांचा विचार करून कशा प्रकारचे आंदोलन करायचे आहे ते ठरवले जायचे. जेणे करून शेतकऱ्याचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होऊ नये किंवा कमीत कमी नुकसान व्हावे. उदा. लग्नसराइतले दूध आंदोलन. शेतकरी आंदोलन हे केवळ शेतकरी श्रीमंत व्हावा म्हणून नव्हते तर त्यायोगे देशातले दारिद्र्य हटावे असाच विचार यामागे होता. आंदोलनातले प्रश्न पुढीलप्रमाणे होते:

१) शेतीमालाला रास्त भाव – शेतकऱ्याच्या दारिद्र्यामागे 'शेतीमालाला भाव मिळत नाही' हे एकमेव कारण अहे. कारण सरकारी धोरण आहे: अ) तूट असेल तर लूट, मुबलकता असेल तर लिलाव, ब) शेतीमालावर निर्यातबंदी आणि क) पक्क्या मालाचे कारखाने निघाले तरी शेतीमाल अल्प किंमतीत विकत घेणे.



शेतीमालाला उत्पादनखर्चा इतका भाव मिळाला तर बरेच प्रश्न सुटतील. जसे,

❊ शेती उत्पादन वाढेल.

❊ गरीबातील गरीब घटकांपर्यंत नवीन उत्पन्नाचा फायदा वाढत्या मजुरीच्या रुपाने पोहोचेल.

❊ ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा निकालात निघेल.

❊ इंडिया – भारत दरी नाहीशी होईल.

❊ ग्रामीण भागात उद्योगधंदे निर्माण होऊन बेकारी हटणार.

❊ आजच्या औद्यागिक विकासाच्या अनर्थकारक धोरणाचे दुष्परीणाम टळतील.

❊ ग्राहकांना आजपर्यंत न मिळालेली उपभोग्य वस्तूंची विविधता दिसेल.

❊ उद्योगधंद्यात तयार होणाऱ्या मालास बाजारपेठेत भरपूर मागणी मिमळून त्यांची ही भरभराट होइल.

२) शेतकऱ्याचे सरकार आणि सावकारांकडून होणारे शोषण थांबवणे – आर्थिकदृष्ट्या देशाचे दोन भाग झालेले आहेत : एक भारत अणि दुसरा इंडिया. ज्याच्यातला इंडिया हा भारताच्या शोषणावर जगतो आहे आणि जास्तीत जास्त शोषण करीत चालला आहे. स्वातंत्र्यानंतरही भारताचे शोषण होतेच आहे.

३) उलटी पट्टी – दलालामार्फत भाजीपाल्यासारखा शेतीमाल बाजारात पाठविल्यावर त्याच्या किमतीची जी पट्टी येते, त्यात वाहतूक, दलाली, हमाली, पॅकिंग वगैरेंचा खर्च वजा जाता काही शिल्लक न रहाता, शेतकऱ्याच्याच अंगावर काही देणे राहाते यालाच 'उलटी पट्टी' म्हणतात. ज्याला याचा अनुभव आला आहे, त्याला शेतीमालाच्या किमतींचा प्रश्न समजणे अवघड नसते.

४) दलालांची मनमानी – शेतकऱ्याला मिळणारा भाव व ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत यातली तफावत फार मोठी आहे, त्याला कारण आहेत मधले दलाल/व्यापारी.

१९८० पूर्वी शेतीची परिस्थिती वेगळी होती. 'जास्त माल : जास्त नफा' हे साधे सरळ गणित होते. पण नंतर परिस्थिती बदलली. 'जितका माल जास्त : तितका कमी भाव' हे नवीन तंत्र आले. गांजलेला शेतकरी हवालदिल झाला, खचला. आधीच

शेतीमालाचा उत्पादनखर्च निघत नव्हता. बेभरवशाचा पाऊस, सावकारांचे अवाजवी व्याज, सरकारी अपुरी मदत, शेतीमालाचा पडता भाव याने तो अधिकच दरीद्री होत गेला. परिस्थितीतून कसे बाहेर पडावे? अपले गाऱ्हाणे कुणाला सांगावे? हे त्याला कळत नव्हते. अशात मा. शरद जोशी, स्वतः शेतकरी नसताना ही, त्यांच्या प्रश्नांसाठी उभे राहिले, बोलू लागले. हळूहळू विखुरलेला शेतकरी, 'शेतकरी संघटने' च्या झेंड्याखाली गोळा होऊ लागला. पण हे जमलेले शेतकरी अल्पशिक्षीत, ग्रामीण भागांतून आलेले होते. त्यांना शेतकरी संघटनेची तत्त्वे साध्या सोप्या भाषेत समजावणे गरजेचे होते. त्याच विचाराने मा. शरद जोशींनी 'शेतकरी शिबीरे' घेतली. शेतीमाल कमीत कमी भावात घेण्याचे सरकारी धोरण, जे इंग्रजांनी लागू केले होते, ते तसेच सुरु होते. ते बदलणे गरजेचे होते.

या पुस्तकात शेतकऱ्याशी निगडीत प्रत्येक गोष्टींचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. जसे, शेतीमालाचा उत्पादनखर्च कसा काढावा? रास्त भाव म्हणजे काय? शेतकरी व शेतमजूरांचे प्रश्न, इंडीया व भारत यातली तफावत, मजूरीतला स्त्री – पुरुष भेदभाव, शेतीच्या ताळेबंदातील न मांडता येणारे नुकसान, जसे मातीची पिकांगणिक घसरणारी प्रतवारी.

प्रत्येक शेतकऱ्याने वाचावे व समजून घ्यावे असेच हे पुस्तक आहे. शेतकरी नसणाऱ्यांना यातला उत्पादन खर्च काढण्याचे जे प्रकरण आहे ते क्लिष्ट वाटू शकते, कारण त्या गोष्टींशी आपला प्रत्यक्ष संबंध येत नाही. पण ते समजून घेणे गरजेचे आहे. कारण तोच या सर्वांचा पाया आहे. शेतकऱ्याची परिस्थिती बदलावी म्हणून काय करायला हवे ते मा. शरद जोशींनी सरळपणे मांडले आहे. आधी सहकारी संस्था स्थापन व्हायच्या. पण तो मार्ग पण उपयोगाचा नाही. माल वेळेत विकणे गरजेचे आहे. आपला शेतकरी व्यापाऱ्याला टक्कर देवू शकत नाही, कारण त्यासाठी गोदामं हवीत. खर्चासाठी कर्जाची सोय हवी. पण आर्थिक कमकुवतपणामुळे तो हे करू शकत नाही. शासनाने ठरवले तर शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे कारखाने सुरू करून ते शेतकऱ्याला मदत करू शकतात. अशाने शेतकऱ्याची परिस्थिती सुधारत जाईल व इंडिया व भारतातील तफावत नष्ट होइल.

शेतीमालाला रास्त भाव मिळाला की शेतकऱ्याचे रहाणीमान सुधारत जाईल. शेतीत चांगले बियाणे, खते वापरल्याने उत्पादन वाढेल. कर्ज फिटतील. शेतमजुरीचे दर वाढतील. तो शेतजमिनीत सुधारणा करू शकेल, विहिर बांधून घेवू शकेल, पुरेसा पैसा गाठीला असला की शेतीला पूरक छोटे छोटे उद्योगधंदे काढू शकेल. त्यायोगे रोजगार उपलब्ध होतील. संघटनेचा हा लढा एका व्यवस्थेच्या विरुध्द आहे व तो आर्थिक पातळीवर आहे हे मा. शरद जोशींनी यात वारंवार उधृत केले आहे. शेतकरी संघटनेचे हे काम शेतकरी स्त्रीयांपर्यंत पोहोचणे अत्यंत गरजेचे होते. त्यादृष्टीने ही गावपातळीचर प्रयत्न केले गेले.

अर्थात कमी वेळात संकलन केले गेल्याने यात काही संपादकीय त्रुटी पण आहेत हे प्रकाशक स्वतःच मान्य करतात. असे असले तरी ही या पुस्तकांची हिंदी, गुजराती, कन्नड व तेलगू भाषांतरे झाली आहेत. आणि हेच या पुस्तकाचे मोठे यश म्हणावे लागेल. भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया असणारी शेती कशी व कुठल्या पायरीवर उभी आहे हे समजून घेण्यासाठी शेतकऱ्यानेच नाही तर प्रत्येक भारतीयाने हे पुस्तक अभ्यासावे असेच मी म्हणेन.

जय जवान! जय किसान!

शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती
लेखक – मा. शरद जोशी
प्रकाशक – जनशक्ती बुक्स अँड पब्लिकेशन प्रा. लि.

**– विनिता माने – पिसाळ**
**पुणे, महाराष्ट्र**

# राजसत्ता

निशस्त्र बाभळींना कंठ फुटण्याची वाट आहे
नशीबी तिच्या पिलांच्याही स्मशानघाट आहे

जुलूमी ठगांना तया आता काय सांगावे?
डोक्यांवरती तयांच्या फेट्यांचा थाट आहे

राबता राबता देह वाकले कुणाचे?
ओंजळीत कुणाच्या भरभराट आहे

हातात झेंडे देऊनिया विविधरंगी
कुणासाठी कुणी फक्तच लाट आहे

फासावरी उपाशी लटकण्यास सज्ज व्हावे
नभात निजण्यास चांदण्यांची खाट आहे

हुकूमी एक्क्यांचे त्या सारेच शिक्के खोटे
झिंगाट झाली राजसत्ता, कारभार सैराट आहे

**– राजेश जौंजाळ**
**पोहणा, जि. वर्धा**

# मायचं सपन

**विश्वस्तरीय लेखनस्पर्धा– २०१६ : कथा – विजेती प्रवेशिका**

'अल्लाह हुऽऽऽ अकबर अल्लाऽऽऽऽ ह हू अकबरऽऽऽ' इंदिरा नगरातल्या झाकटीतल्या अजानच्या सूराईनं शिता आथरनात खळकन उठून बसली. 'हुत माय... बुहाऱ्या वानाची झप तं! आज काहून का जनं चेवच नाई आला... माह्या लेकीचा लेक!' आंगावर पांघरलं हुवं लुगळं संगीच्या आंगावर टाकलं. मोकाट केसाईचा जुळा घालता घालता शिता सोताशीच वटवट करू लागली. 'आता कायचा भेट्टे एखादा शेनाचा पवटा?... थे सलमायाची बायको, सकीनी अजानच्याई आगुदर सावळून नेते सगळं शेन.... खाय माय शयरात शेनाचीई नवाई! काल्र्यात नोतं माय असं!'

''येसोंताऽऽऽ ओ बाबू येसोंताऽऽऽ उठ बाबू. उठ रे माह्या बापाऽऽऽ दिवस उजाळून राह्यला. झाकटीत अभ्यास केला की धानात राह्यते म्हंतात. तोंड-मोंड धुय अन् बस अभ्यासाले. उठ बरं बापा.'' तिच्या पोटाशी झोपेल येसोंताच्या केसाईत हात फिरवत, त्याले चोफलचाफल करत ते त्याले उठऊ लागली. एवळं चोफलचाफल केल्यावर बापू, बाप्पा म्हनूनई येसोंतान 'ऊंऽऽऽ' म्हनत फक्त कळ फेरला. ''याईले तं झपीनं खाल्लं जसं... झपीत तं याईले कोनं कापून टाकलं तरी चेव याचा नाई! अल्लालठ्ठी कहाँ गयी न् दो रोट्या खा गयी.... सट्ट खानं न् सट्ट पसरनं! नेट नाई ना काई जीवाले... ना कोन्या गोठीचा घोर! बायको धावतेच आपली ढोरावानी अन् मानसावानी मानूस हायेस आयत्या बिळात नागोबा! येसोंताच्या बाजूनं भितीजोळ झोपेल भिकूवर नजर रोखून शिता आग पाखळू लागली. तसं भिक्यानं तावं तावं आंगावरचं धोतर फक्त थुत्तर दिशीन एवळंच बाजूनं केलं न् आता खाते का ठुते असा डोये-मोये काळून तोंडाचा पट्टा सुरू केल्ला.

''काह्यची व्हय वं तुही भादरकथा दिवसई नाई निंघाला तं? मंगापासून आयकूनच राह्यला मानूस तिची वटवट... आता मुकी राईन, मंग मुकी राईन... चामळ्याचं हाये तं लामतेच लामते थुत्तर... धोतराले अन् पासोळीलेई आवरून नाई राह्यलं एवळं हिव! अन् त्यात मले उठऊन राह्यली झाकटीतच! कुठी धाळते कायजन कुंदा खंद्याले! ''एवळं तावं-तावं बोलून भिक्यानं धोतर थुतरावर वळलं.

'अख्ख्या मुलखातली थंडी तं जशी यायच्याच आंगावर इऊन पळली! जाग्यावरच गोठून मेल्ले जशे मानसं हिवानं...' कळक हिवायातई भिक्याचा पारा गरम हाये ओयखून शितीनं मनातलाया मनातच वटवट केली. या काळाचा ताया कळावर इतक्य वारखोळ करनिरा येसोता आता तळकन् उठला. इकून-तिकून कोयसा दातावर घासला. दोन-तीन गुयया टाकल्या न् बसलाई अभ्यासाले. शितीनं चूल पोथारली. पराट्याची मूठ लावली. त्यांच्यावर एक जाळं, एक बारीक लाकूळ आल्लादी ठून खालून कागद घळीपुळी करून अंगारडब्बीची काळी चेतवली. कागदाले उमटी लावली. हिवायात चूल धळधळ चेतली. जसं शितीवानी चुलीलेई सारं गाठलं व्हतं. 'येसोंताऽऽऽ जोऱ्यानं वाचना रे बाबूऽऽऽ खळखळ वाचलं पाह्यजे,' मंदातच येसोंता जागी हाये का निजला



याची तिनं परचिती घेतली. कालचीच वली गवरी मोळून आंगनात तितक्या झाकुयल्यात सळा टाकला. पान्यात चार बोटं हालव-हुलव करून शितीनं पानी कोयमट झालं काय ते पाह्यलं. बटलयी घिऊन न्हानीत गेली. भळंभळं आंगावर पानी घेतलं. कसंबसं लुगळं गोयलं. बातच वळ्यायची भाजी केली न् उल्यावर चळवली. चुलीवर तावा ठुयला न् ताव्यावर अंदन! कोपरात पिठाच्या आव्यात मंधात ते वतलं. सराट्यानं कालवलं. त्याचा डोंगर उजव्या बाजूनं केला. त्याले खसवून त्यात पानी टाकून त्याची तयहातानं मस्त मालीस केली. गोलगुटूंग गोया केला. मंग चाकावानी गोल चकोली. डावा हात खालून न् उजवा हात वरतून दाबत-दाबत मोठी केली. दोन्ही तयहातानं दाबत-दाबत एकसारखी पतली भाकर रांधली. एक, दोन, तीन, चार, पाच... भरंभरं भाकरी रांधल्या. बोटानं वळ्या दाबून पाह्यल्या, तेई शिजल्या व्हत्या. आता भिक्याई उठला व्हता. कोयश्यानं दात घाशाले बाहीर तापाजोळ गेला. तवलीत पानी घिवून वकऱ्या काळ्याले लागला. तसं शितीनं बकरी दोयली. च्या मांडला. 'अऽऽऽय, काई सकाय काळजा. च्या शिजला. गायतो. बाबूऽऽऽ त्या डब्ब्यातली डबररोटी घे. तुयासाठी लावून ठुयली व्हती.'' तिनं येसोंताले बोटानं डब्बा दाखोला. येसोंता च्या- डबररोटी खाल्ली. शितीनं च्या बशीत वतला. गटागटा गिटकला. भिक्यानंई च्या घेतला. शितीनं तीचं लुगळं घास-पिव केलं. चुलीजोळचे सब्बन भांडे-कुंडे बाहीर नेले. घास-घूस करून आनून ठुयले. चुलीजोळचं सप्पा केलं. काचाच्या कोरात पाऊन एकाच हातानं मोळ बराबर केली. बोटायनंच केसं दोन बाजूनं केले. कपायावर ठसठशीत कुंकू लावलं. संगीले उठोलं... तिचा शेंबूळ दोन बोटाच्या चिमटीत घेऊन भितीले पुसला. नाक पदराले पुसलं. आठक वाजले असतीन. फळक्यात भाकर न् भाकरीवर भाजी, त्याच्यावर एक उबळी भाकर ठुयली. शिदोरी बांधता-बांधता नवऱ्याले सांग्याले लागली. ''अऽऽऽय, कामाले तं तुमी जात नाईच, घर सोळून कुठीसा जाऊ नोका. संगीले पाह्यजा. तिले मीठ लावून भाकरगिकर देजा. निजू घालजा पायन्यात. नाई तं तुमचं हायेच ते शेवकराम मामाजीसंगं आकळे लावनं. एक नं दो

अन् दोन नं चार! अन् आकळा लागला की तेवळ्याई रुपयाची आन्ता आंगात!'' यावक्ती भिक्यानं मुक्यानंच आयकून घेतलं. जसा दिवसभरातला त्याच्या मनातलाच टाईमटेबल सांगतला. ''बाबूऽऽऽ जेऊन जाजो रे शाळेत. घरी राऊ-गीऊ नोको बाप्पा! जीव लाऊन अभ्यास कर.'' ते वावरात जायाले निंघेलोक येसोंताले काईना काई सांगतच व्हती. वट्टीनबुडी दिसली तशी शितीनं टायवरी पायात सरकोली. जनी मांगीनई आली. तिघीई रामेसोर पाटलाच्या गोंदनच्या वावरात जायाले निंघाल्या. ''बिचारे! साहामाई परीक्षेत येसोंताचा पह्यला नंबर आला ना. काल त्यानं सांगतलं तवा त्याले कुठी ठिऊ न् कुठी नाई... असं झाल्तं मले. इतका हरीक आल्ता की काय सांगू तुले! त्याले पोटाशी धरून म्या पटापट मुकेच घेतले नि-हा. बरं का वंऽऽऽ, तुवा मानक्या जाते शाळेत रोज?'' शितीनं जनीले इचारलं.

''नाई ना बिचारेऽऽऽ शिताऽऽऽ शाळेत जायच्या नावानं तं त्याले काटेच येतात! तो सुदा भावजीच्या गोल्या... तो रामकुस्ना टेलरचा पिंट्या... चिचिखालचा 'डोम्या' या पोट्यायची टोयच हाये ना!... दिवसभर थे गोया, गिल्लीदांडू, आबादुबी, आंब्याच्या गुठल्या अन् काय पुसतं?... मी तं बेज्जा हैरान झाली. मारल्यानई आईकत नाई बिचारे.... आजून जब्बरपना करते. नि-हा वाया गेला त्या पोट्यायसंग! कसं व्हईन तं होवो माय! देवानं देवाव तं सुदी देवाव माय जनपत! नि-हा जीवाले घोर!'' जनी सारा वैताग एका सासात बोलून मोकयी झाली. ''मारूगिरू नोय लेकराले.... त्यानं उलटं बारबंड व्हते लेकरू'' शितीनं समजावलं. गोठीमाठीत वावर आलं. सयसंध्याकाय झाली. पाचची अजान झाली. बायायनं उरकतं घेतलं. सगळ्यायचे पावलं घरच्या दिशेनं झपंझपं पळू लागले.

''काय माहित बुहारा मानूस... घरी व्हता की गेला व्हता मूत पियाले? पळला की काय कोन्या सांदीबेब्टीत?'' आता शितीले घरचे इचार सताऊ लागले. शितीनं ताटी उघळली तं येसोंता न् संगी खिऊन राह्यले व्हते. भिक्या कुठी दिसला नाई तिले. पायातली टायवरी फेकली. दोन तीन डब्बे पानी पायावर वतलं. तोंडाऊन हात फिरवला. दोन गुयल्या टाकल्या घाईघाईत. संगीले जोळ घिऊन चोफलचाफल करता करता येसोंताले इचारलं, ''तुवा बाप नाई दिसून राह्यला कुठी?'' येसोंता काईच बोल्ला नाई. ''बाबूऽऽऽ, आला माय शाळेतून?'' आता तिनं सरकंच इचारलं. येसोंतानं मान खाली घातली. तेवळ्यात भिक्या पळून येताखेपी दिसला. पुरा रस्ता त्याच्याच बापानं खरेदी केला जसा अन् त्याच्याच मालकीचा हाये असा झोकांड्या खात घरी येऊन राह्यला व्हता. शितीले हे सगळं तं जसं सकिऊनच समजलं होतं. आता आपली माय आपल्याले कितिक मारतेनं कितिक नाई या इचारानं येसोंता थर्र भेला.

भिक्या ताटी लोटून अंदर आला. तसं शितीनं पोट्टीले खाली ठुयलं. कंबरीले शेव खोसला. भिक्या ताटी लोटून अंदर आला. तसं शितीनं पोट्टीले खाली ठुयलं. कंबीरले शे खोसला. ''निंघा माया घरातून!.... चालते व्हा!... अर्धी उम्मर झाली तरी कवळीची अक्कल नाई आली अजून! गेलेच व्हते मूत पियाले... तिकळेच राहाव लागत व्हतं... 'हे' पैदाच केले फक्त.... तेवळाच कोचम आला!... माह्या जिंदगीचं तं मातेरं झालं तुमच्यापायी, पन् मी लेकरायचं तसं होऊ देनार नाई.... आजपासून तुमी मेले आमाले! मानसावानी धावीन तरी माह्या लेकराईले शिकवीन'' शिती कंठातला लळू गिवत व्हती.... तिच्या डोयातल्या धारा थांब्याचं नाव घेत नोत्या. तिनं येसोंताले पोटाशी धरलं. त्याच्यापुळे मेट्यावर बसली. ''मी जिती हावो तवरोक तुह्या जिंदगीची बरबादी होऊ देनार नाई... सकायपासून संगीले मी वावरात नेतो माह्यासंग, पन् त्वा शाळेत जायाचं. लय शिक. लय लय शिक. शिकून लय मोठ्ठा व्हय बाप्पा... तुह्या बापाच्या खानोटीवर नोको जाऊ. बाबासाह्यबावानी लय शिक माह्या बाप्पा... लय शिक....'' येसोंचा चेहरा आपल्या आंजोयीत धरून ते सांगत राह्यली. तिच्या डोयात येसोंताले मोठ्ठं सपन दिसलं व्हतं. ते असं वाहून जाऊ द्यायचं नाई असं त्यानं त्याच दिवशी मनाशी ठरोलं.... ''टीररींग टीररींग....'' फोनच्या खनखनाटानं खुर्चीवर डोये लावून बसलेला येसोंता खळकन वर्तमानात आला. ''हैलोऽऽऽ कलेक्टरसाहेब... इपल्या तुच्छ बहिणीची आठवण येते की नाही समाजकल्याण करताना?'' ''तुच्छ इन्कम ट्याक्स ऑफीसर संगीता भिकाजी माने!... आय वील सी यू सून. ये चपटे....'' दोन्ही बाजूनं फोनवर लयवारखोळ हाश्याचं उधाण आलं!....

मायचं सपन, आता सपन राह्यलं नोतं!

**– संघमित्रा खंडारे**
**साईनगर, दर्यापूर. ४४४ ८०३**

♦ ♦ ♦

*तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!*

**भारत बावनथडे**
**जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, गडचिरोली**

**डॉ. परशुराम खुने**
**गुरनोली, जि. गडचिरोली**

**बबनराव अवचट**
**मु. कातनगांव, ता. हिंगणघाट, जि. वर्धा**

# तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल

**विश्वस्तरीय लेखनस्पर्धा – २०१६ : कवितेचे रसग्रहण विजेती प्रवेशिका**



स्वदेशीचे ढोंगधतुरे ही कवी गंगाधर मुटे या अवलिया कवीची कविता वाचताना दाबलेल्या आवाजाला कंठ फुटल्याची जाणीव होते. ही कविता शेतकरी चळवळीसाठी एक मैलाचा दगड आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. शेतकरी आत्महत्या हा विषय तसा ज्याने त्याने बेगडी आस्थेचा आणि राजकारणासाठी मलिंध्याचा म्हणूनच आजतागायत चघळला गेल्याचा सर्वमान्य पुरावा आहे.

**एक आणखी झाडावरती लटकून मेला काल**
**तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल**

उद्वेग आणि विद्रोह ही जोडगोळी धगधगत्या निखाऱ्यावर ठेवून कागदी नियोजनाची भेंडोळी वास्तवतेच्या कचराकुंडीत भिरकावण्याचे धाडस या दोन ओळीत दिसून येते. हे धाडस करण्याच्या मानसिकतेचे कारण ही अगदी मूल्याधिष्ठित आहे. वस्तुस्थितीकडे पाठ फिरवणे सामान्य अनुभूतीला सहजासहजी शक्य नसल्याने एकंदर इतिहास विजेसारखा माथ्यावर कडाडतो आणि आसमंत फाटल्याची तसेच नेमके ठिगळ कुठे लावले गेले नाही याची रोखठोक जाणीव करून देतो.

शेतकरी आत्महत्येची जेवढी कारणें शोधली गेली आणि जेवढ्या उपाययोजना केल्या गेल्या त्या किती निरर्थक होत्या आणि आहेत याची प्रचिती येताच वाचक पुढच्या कवितेला सरसकट वाचण्यासाठी धडपडतो.

**पुन्हा एकदा बिनपाण्याने भाजून गेले शेत**
**एसीमध्ये आखतोस तू सटरमफटरम बेत**
**तुला दावतो भकासबंजर तू बांधावरती चाल**

या ओळीवाचताच वाचकांच्या तोंडून आपसूकच एक ओळ बाहेर पडते, 'तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल'. हा अनुभवी मी नागपूरच्या डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात प्रत्यक्ष घेतला. प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या सभागृहातील प्रत्येकाच्या तोंडून ही ओळ जयघोषासारखी ऐकणाऱ्याच्या कानावर जाऊन आदळत होती. यातील कटू सत्य नाकारणे कुणालाही शक्य नाही. आजही वीज आणि पाण्याचे शेतकरीहीन केंद्रीत नियोजन न केले गेल्याने कोरडवाहू शेती ही पडीक जमिनीहूनही अधिक घाट्यात जाताना तर दिसतेच, पण ती जमीन हळूहळू वाळवंट सदृश्य होत चालली आहे. एकीकडे जगात वाळवंटाचे नंदनवन करण्याचे यशस्वी प्रयत्न केले गेले तर दुसरीकडे मात्र स्वतंत्र भारताने सुजलाम सुफलाम् म्हणत म्हणत सुपीक जमिनीचे रूपांतर वाळवंटात केल्याने निर्माण झालेली दाहकता स्पष्ट जाणवते.

**शीक बाबा शीक लढायला शीक**
**कुणब्याच्या पोरा आता लढायला शीक**
**किंवा ज्ञानेश वाकुडकरांची**
**पालीच्या मुतन्याला मी पाऊस म्हणावे का** हो
किंवा गंगाधर मुटेंची
**एक आणखी झाडावरती लटकून मेला काल**
**तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल**

या कविता वाचून प्रस्थापित इंडियाच्या भुवया कायम तिरकस होण्याची शक्यता नाकारता येत नसली तरी त्यांचे साहित्यिक मूल्ये त्रिकालाबाधित आहे यात तिळमात्र शंका घेण्याचे कसलेही सद्सद्विवेक कारण असणे शक्य वाटत नाही.

गंगाधर मुटे पुढे म्हणतात–

**खते, औषधी, बीज, मजुरी दसपट झाले भाव**
**वीज, किराणा, डिझेल, डॉक्टर लुटून नेती गाव**
**अन् तुला पाहिजे स्वस्तामध्ये शेतीमधला माल**

कोणत्याही न्यायालयात या ओळी चुकीच्या आहेत किंवा कवी कल्पनेचा एक भाग आहे हे सिद्ध करता येणार नाहीत, याचाच अर्थ शेतकरी कविकल्पनेच्याही पल्याड शोषकांनी शोषला आहे असा होतो. एक पीक पिकविणे, ते पिकवून विकणे या कालावधीत दलालांची आणि सरकारी यंत्रणांची त्याला लुबाडण्यासाठी चाललेली बौद्धीक धडपड भाई, देखतेही बनती है! इंडियाने भारताकडे नेहमी बाजारपेठ म्हणूनच पाहिले. इथला कच्चा माल लुटून नेला आणि त्याचे पक्क्या मालात रूपांतर करून अव्वाच्या सव्वा किंमतीत विकावयास सुरुवात केली. शेतकऱ्यांना लागणारी शेती उपयोगी साधने विकत घेणे त्यांच्या आवाक्याच्या बाहेरचे होते. या उलट त्यांच्या संपूर्ण नियंत्रणात असलेली बाजारपेठ आपल्या मर्जीने वस्तूंच्या किंमती ठरवायला लागली. यामुळेच चतुःसूत्री तील एक सूत्र स्वदेशीचा स्विकार व परकीय मालावर बहिष्कार हे होते. मात्र इंडियनांच्या स्वातंत्र्यानंतर त्यांना भारताला मनमोकळेपणाने लुटण्याची मुभा मिळाली होती. याचाच अर्थ इंग्रजांच्या काळात जी आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली नाही ती इंडियाच्या काळात आली!

खरे तर वसाहतवाद्यांचा हा नवा डाव अजूनही भोळ्याभाबड्या शेतकऱ्यांच्या लक्षात आला नाही. खेडीपाडी, वस्त्या, तांडे याठिकाणी शेतीमालाच्या बाजारपेठा कधीच आणि कुठेच झाल्या नाहीत. आपला माल घेऊन याच्या–त्याच्या दारात फिरण्याशिवाय त्याला ईलाज नाही. शहरातून आपला माल प्रत्यक्ष गिऱ्हाईकास विकण्याची मुभा नाही. असलीच तर त्याच्यासाठी बसण्याची निवाऱ्याची सोय नाही. व्यापाऱ्यांसाठी मात्र अशा सोई वसाहतवाद्यांनी मोठ्या प्रमाणात निर्माण केलेल्या आहेत. शेतीमाल आणि शेतकरी या सर्व व्यूहरचनेमुळे कवडीमोल झाल्याचे विदारक

चित्र गंगाधर मुटें यांनी अगदी हुबेहूब रेखाटले आहे.

मागणीनुसार उत्पादन करण्याचे शास्त्रोक्त शासकीय स्त्रोत निर्माण करणे गरजेचे असूनही तसे होत नाही. इतर उद्योगाच्या बाबतीत मात्र हे नियोजन केले जाते. उत्पादित मालाला टिकविण्यासाठी किंवा साठवण्यासाठीचे शासकीय नियोजन शेतकऱ्यांसाठीच कुठेच नाही. चार कुडा पत्र्याच्या किंवा चार खोल्यांच्या घरात राहणारा शेतकरी अशी अवस्था निर्माण करू शकत नाही. आठवडी बाजारात भाजीपाला त्याच दिवशी विकला गेला नाही तर तिथेच त्यांचे ढीग सोडून शेतकरी परत फिरतात. यावर एकच नामी उपाय सरकारी यंत्रणेकडे आहे, तो म्हणजे तुटवडा झालेला किंवा तसा भास निर्माण झालेला माल आयात करणे! परंतु देशात पिकलेल्या अतिरिक्त पिकाचे काही नियोजन उपलब्ध आहे का हे सांगणे कठीण आहे. हा एसीमध्ये आखलेले 'सटरम फटरम बेत' चा नव्हे तर कशाचा परिणाम आहे?

निर्यातीचे एकीकडे तीनतेरा वाजवून दुसरीकडे मोठ्या प्रमाणात शेतीमालाची आयात करण्याचा प्रपंच केला जातो. यामुळे शेतकऱ्याची अवस्था ''धोबी का कुत्ता, ना घर का ना घाट का'' झाली आहे, असे सांगतांना गंगाधर मुटे पुढे म्हणतात–

**आयातीवर सुट देऊनी गाडलास तू बळीराजा**
**म्हणून वाजतो दारापुढती अंत्यक्रियेचा बाजा**
**स्वदेशीचे ढोंगधतुरे, खातोस विदेशातली दाल**

मुळात शेतीमालाच्या आयात निर्यातीचे संतुलन बिघडल्याची खंत त्यांनी ठासून सांगितली आहे. स्वदेशीचे ढोंगधतुरे हा शब्द इंडियाच्या बाबतीत तंतोतंत योजल्याने भाषा व भाष्य आलंकृत झालेली दिसून येतात. शेतीप्रधान देश ही संकल्पना इंडियातून समूळ हद्दपार झालेली दिसून येते. तसेच भांडवलदार किंवा राजकीय वर्चस्व असलेल्या भागापूर्ती मर्यादित झालेली आहे.

अंत्यक्रियेचा बाजा वाजल्यानंतर होणारे फोटोसेशन हा सुद्धा अलीकडच्या काळातील चवीने चर्चिण्याचा विषय होऊन राहिला आहे. ढोंग केल्यामुळे किंवा क्षणीक पुळका दाखवल्यामुळे या गंभीर प्रश्नाची उकल होणे शक्य दिसत नाही. त्यासाठी दीर्घकालीन कृती आराखडा युद्ध पातळीवर राबवला जाणे आवश्यक आहे, अन्यथा अनुशेषधारी जसा आहे तशा प्रांतात स्वतःला विभक्त करून घेतील.

म्हणूनच शेवटी गंगाधर मुटे प्रस्थापितांना स्पष्ट शब्दात बजावतात–

**छल कपटाचा नाद सोडून भानावर ये आता**
**'अभय' जाहली जर भूमीकन्या, मरशील लाथा खाता**
**तुझी हुशारी, अक्कल तज्ज्ञा बेसुरी बेताल**
**तुझे आहे तुजपाशी**
**पण तू जागा चुकलाशी**

अशीच जाणीव होऊन जाते.

एकंदर कायतर शेती आणि शेतकरी, माती आणि माणसे यांच्यापासून दूर गेलेल्या इंडियाला भारताने दिलेली ही एक हाळी आहे. तशीच ती होऊ घातलेल्या वैचारिक संक्रमणाची ऐतिहासिक नांदी पण आहे. अशाच 'दम'दार कवितांची मुक्यांना गरज आहे. कवीला तथा शेतकरी चळवळीला माझ्या हार्दिक शुभेच्छा!!

**– राज पठाण**
**अंबाजोगाई, जि. बीड भ्रमणध्वनी : ९७६४९८०२२४**

# शेतकरी चळवळीत पगारेंचा सक्रिय सहभाग : संतू झांबरे

## बीएसएनएलमधून स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने सत्कार

शेतकरी संघटनेच्या येथील आंदोलनात बापूसाहेब पगारे यांची भूमिका मार्गदर्शकाची राहिली असून, त्यांच्या पडद्यामागच्या भूमिकेमुळेच आंदोलने यशस्वी होत गेली आहेत. सामाजिक कार्यात पुढे राहणारे पगारे यांनी आता स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने शेतकरीहितासाठी यापुढे मोकळेपणाने सक्रिय काम करून शेतकरी चळवळीत सहभागी होणार असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे उत्तर महाराष्ट्रप्रमुख संतू पा. झांबरे यांनी दिली.

बीएसएनएलमधून ३४ वर्षांच्या सेवेनंतर बापू पगारे यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. याबद्दल बीएसएनएलतर्फे आयोजित सत्कार कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. बीएसएनएलचे उपअभियंता अविनाश पाटील अध्यक्षस्थानी होते. पगारे यांचा शेतकऱ्यांसह ग्रामीण भागात जनसंपर्क असल्याने त्याचा बीएसएनएलला मोठा फायदा झाला असून, महाकृषी योजनेत त्यांचे योगदान सर्वाधिक राहिले असल्याचे पाटील म्हणाले, मनमिळाऊ स्वभावामुळे पगारे यापुढे अधिकाधिक समाजसेवा करतील, असे डॉ. भाऊसाहेब गमे म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी नेहमी झटणाऱ्या पगारे यांनी स्व. शरद जोशी, स्व. मोहन गुंजाळ यांच्यासोबत काम केले. आजही संघटनेच्या कामकाजात ते हिरिरीने भाग घेतात. त्यांच्या सामाजिक कामाला अजून गती मिळणार असल्याचे अर्जुन कोकाटे, विक्रम गायकवाड, संध्या पगारे, सुभाष निकुंभ, संजय पगारे, बबन ढिकले, दिलीप गोडसे, शिवाजी जाधव, जितेश पगारे यांनी सांगितले. नोकरी करत असताना प्रत्येक कर्मचारी इच्छा असेल तर सामाजिक कार्य करू शकतो, अशी उदार भूमिका ठेवली तर नक्कीच मानसन्मान वाढतो, असे मत या वेळी पगारे यांनी मांडले. सतीश संत यांनी सूत्रसंचालन केले. श्री. बाविस्कर यांनी आभार मानले.

♦ ♦ ♦

# शेतकरी संघटनेचे शासनास पत्र

प्रति,
मा. मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन
मुंबई–३२

**विषय : आधारभूत किमतीनुसार तूर खरेदी करण्याविषयी शेतकरी संघटनेच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. १४ मार्च २०१७ रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याबाबत.**

महाशय,

सविनय निवेदन सादर करतो की, राज्यात तुरीच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झाले आहे. शासनाने आयात केलेल्या डाळी व कडधान्यामुळे तुरीचे दर आधारभूत किमती पेक्षा खाली कोसळले आहेत. शासनाने सुरू केलेल्या खरेदी केंद्रांची संख्या अतिशय कमी आहे. साठवणुकीसाठी गोदामे व बारदाना उपलब्ध नसल्यामुळे अनेक ठिकाणी सध्या खरेदी बंद आहे. शेतकऱ्यांना दिलेल्या चुकाऱ्याचे चेक महिना–महिना वटत नाहीत. पर्यायाने शेतकऱ्यांना, व्यापारी देईल त्या भावात आपली तूर विकावी लागत आहे. केंद्र शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. तूर उत्पादकांना दिलासा देण्यासाठी, शेतकरी संघटनेच्या खालील मागण्यांचा तातडीने विचार करून निर्णय घ्यावेत ही अपेक्षा.

१. तूर उत्पादक पट्ट्यात, सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या व मोठ्या बाजारपेठेच्या गावात तूर खरेदी केंद्र सुरू करून पुरेसे वजन काटे लावावेत.

२. केंद्रावर आलेल्या तुरीचे २४ तासात वजन झाले पाहिजे व ४८ तासात चेक वटुन शेतकऱ्यांच्या हाता पैसे मिळण्याची व्यवस्था करावी.

३. एफ.ए.क्यु. च्या नियमांमध्ये सुधारणा करून तुरीचे व इतर शेतीमालाचे चार प्रकारात (प्रतीत) वर्गीकरण करून चार दर निश्चित करावेत.

४. प्रतवारी बाबत शेतकऱ्यांची तक्रार असल्यास वांधा कमिटी स्थापन करून २४ तासात निर्णय द्यावा.

५. खरेदी केंद्रावर तूर विकण्यासाठी सात–बाराच्या उताऱ्याची अट रद्द करावी. तूर खरेदी बाबत शेतकरी संघटनेने केलेल्या सूचनांवर तातडीने व गांभीर्याने विचार व्हावा. रब्बी हंगामातील गहू व हरभरा या महत्त्वाच्या पिकांच्या बाबतीत सुद्धा अशीच परिस्थिती निर्माण होणार आहे. हे दोन्ही शेतमाल आधारभूत किमती पेक्षा कमी दराने विकली जाणार आहेत. केंद्र शासनाने केलेल्या अनावश्यक आयातीमुळे या शेतीमालाचे दर कोसळले आहेत. हा माल आधारभूत किमती नुसार खरेदी करणे शासनाला शक्य नसल्यास, शेतमालाच्या आधारभूत किमती जाहीर करण्याचे नाटक सरकारने बंद करावे.

केंद्र शासनाने अवलंबलेल्या शेतीच्या शोषणाच्या धोरणामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करीत आहे. शासन राबवीत असलेल्या या लुटीच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी व तूर, हरभरा, गहू या शेतीमालाच्या आधारभूत किमती नुसार खरेदीची प्रक्रिया अधिक सुलभ व जलद व्हावी व शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्यासाठी दि. १४ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरी शेतकरी संघटनेच्या वरील मागण्यांचा तातडीने उपाय योजना करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी ही विनंती.

आपला विश्वासू

**अनिल घनवट**
**अध्यक्ष, शेतकरी संघटना**

स्वच्छ चुडामणी सुंदर चुडामणी स्वस्थ चुडामणी

# चुडामणी नदी मित्र परिवार वरूड

ता. वरूड, जि. अमरावती, महाराष्ट्र

*"लोकसहभागातून व लोकचळवळीतून चुडामणी नदी स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ करण्याचा महाराष्ट्रातील पहीला परिवर्तनशील उपक्रम राबविणाऱ्या चुडामणी नदी मित्र परिवारातर्फे तिसऱ्या अखील भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!*

**- शुभेच्छुक -**

**श्री. लोकेश अग्रवाल** (अध्यक्ष, वरूड युवा व्यापारी संघ, वरूड)
**प्रा. किशोर तडस** (प्राचार्य, स्व. शिवरामजी हिवसे अध्यापक महा., वरूड)
**श्री. चंद्रकांत भड** (पत्रकार मातृभूमी, वरूड तालुका)
**श्री. मनिष कुबडे** (मंगलम कलेक्शन, वरूड)
**श्री. नितीन ढोरे** (वैष्णवी कलेक्शन, वरूड)
**श्री. आनंद खेरडे** (खेरडे इलेक्ट्रीकल्स, वरूड)
**श्री. विक्रमसिंह ठाकूर** (बजरंग दल जिल्हा संयोजक, अम.)
**श्री. कैलाश उपाध्याय** (कैलाश ट्रेडर्स, वरूड)
**श्री. संदीप तरार** (ओम पेन्ट हाऊस, वरूड)
**श्री. प्रवीण वाडबुधे** (गजानन हार्डवेअर, वरूड)
**ॲड. अनिल घाटोळे** (माजी नगरसेवक, वरूड)
**ॲड. शांतीभूषण छोगाणी** (कायदे सल्लागार, वरूड)
**श्री. गौरव इंगळे** (समाजसेवक, वरूड)

# मानवत कृषी उत्पन्न बाजार समिती मानवत जिल्हा-परभणी

**-: ठळक वैशिष्टे :-**

१) शेतकरी बांधवांनी आपला माल वाळवुन व स्वच्छ करून विक्रीस आणावा.
२) शेतमालाची पोहंच पावती घ्यावी.
३) उघड लिलाव व रोख चुकोती.
४) शेतकऱ्यांच्या तक्रारीवर त्वरीत दखल.
५) ईलेक्ट्रॉनिक वजणकाट्याची व्यवस्था.
६) मार्केट यार्डात आवश्यक सोयी सुविधा.
७) कापुस खरेदीसाठी मराठवाड्यातील एक अग्रगण्य बाजार पेठ.
८) शेतकरी सुखी तर जग सुखी.

**गंगाधरराव कदम**
सभापती

**पंकज जाधव (अंबेगांवकर)**
उपसभापती

**बि.एस. कदम**
सचिव

**मा. सदस्य गण :-**
श्री. माणिकराव बाबुराव काळे, श्री. पंडितराव मुंजाजीराव चोखट, श्री. आसारामजी वामनराव निर्मख,ॲड. सतीषराव नागोराव बारहाते, श्री. मदनराव दत्तराव लाडाणे, श्री. रामराव निळकंठराव सुरवसे, सौ. सुनिता बाबासाहेब अवचार, सौ. मिराबाई प्रभाकरराव जाधव, श्री. हरिभाऊ लक्ष्मणराव गिरी, श्री. केशवराव मुंजाजीराव गव्हाणे, सौ. मंगला नारायणराव भिसे, श्री. अंबादासराव कोंडिबा तुपसमुंद्रे, श्री. महादेवराव नारायणराव नानेकर, श्री. कत्रुवार गिरीष विजयकुमार, श्री. ज्ञानेश्वर राजारामजी मोरे, श्री. सोपानराव श्रीपती वाघमारे, श्री. बालकिशनजी पन्नालालजी चांडक, सौ. सविता भारतराव उक्कलकर, श्री. स्वराजसिंह परिहार

# गौतम बुद्ध आणि शरद जोशी

सिद्धार्थ गौतम यांनी राजमहालाच्या गच्चीतून रस्त्यावर जाणाऱ्या एका म्हातारीला पाहिले व एक प्रेतयात्रा पाहिली. तेव्हा त्यांचे मनात विचार आला की राजा असो वा रंक, सर्वांची हिच अवस्था होणार आहे. मग जीवन असेच वाया घालवल्या पेक्षा जीवनाचे खरे सत्य काय आहे? याचा शोध घेण्यासाठी त्यांनी राजमहालाचे ऐश्वर्य त्यागले व जंगलात बोधी वृक्षाखाली बसून चिंतन, मनन केले त्यातून त्यांना जो बोध प्राप्त झाला. त्याची शिकवण त्यांनी मानवांना दिली.

शरद जोशी हे सुद्धा स्वित्झरलॅन्ड सारख्या सुंदर देशात उच्च पदाची नोकरी करून ऐश्वर्याचे जीवन जगत होते. त्यांचेही मनात विचार आला जो शेतकरी एका दाण्याचे शंभर दाणे करतो. परंतु तयार केलेले दाणे विकल्यावर कोणाचे तरी देणे राहूनच जाते म्हणजे वजाबाकी. गुणाकार विरुद्ध वजाबाकी हे सूत्र गणितात बसत नाही. याचे रहस्य शोधणेसाठी ऐश्वर्याची नोकरी सोडून आंबेठाणला १८ एकर शेती विकत घेतली. प्रत्यक्ष शेती केली. त्यातून त्यांना जे ज्ञान प्राप्त झाले. ते त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले. तुमची गरिबी, कर्जबाजारीपणा हे तुमच्या चुकीमुळे नव्हे तर त्याचे कारण केवळ शासकीय धोरणामुळे तुमच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळत नाही हे आहे. शेतकऱ्यांना ते पटले व लाखोंच्या संख्येने शेतकरी त्यांचे अनुयायी बनले.

गौतम बुद्धांना भारतीयापेक्षा विदेशातील लोकांनी जास्त स्वीकारले. तेच शरद जोशींच्या बाबतीत होऊ नये ही अपेक्षा.

**– हसनराव देशमुख**
**बुलडाणा**

# जय जवान जय किसान

शेतकऱ्यांनी काय पेराव हे सांगणाऱ्याना विचारा कि, डाळी महागल्या तेव्हा बोंब कोणी मारली? तुम्हीच ना? आणि कांदा भाजीपाला थोडे दिवस महागला कि तुमच्या डोळ्यात पाणी येते मात्र, शेतकरी जेव्हा अडचणीत येतो तेव्हा तुम्ही स्वस्त शेतमाल खाऊन ढेकर देत म्हणता शेतकऱ्यांनी हे करायला पाहिजे, ते करायला पाहिजे, मात्र मला भाजी स्वस्तातच मिळाली पाहिजे. शेतकऱ्यांना किमान भाव मिळेल इतक्याच भावाने धान्य खरेदी करेल घ्याल का अशी शपथ? मातीमोल भावाने भाज्या खाणाऱ्यांनो तुम्ही तर शेतकऱ्यांच मांस खाता, दुधा ऐवजी शेतकऱ्यांचे रक्त पिता.... कारण तुमच्या फुकटखाऊ वृत्तीमुळे शेतकरी कधी गळफास घेतो तर कधी फवारणीचे औषध घेऊन जीवनयात्रा संपवितो!

हा राज्य आणि केंद्र सरकारचा नाकर्तेपणाच म्हणावा लागेल! जय जवान जय किसान ऐवजी जय जवान मर किसान म्हणायची वेळ आली आहे. शेतकऱ्यांनी आता असंही मरायच तसंही मरायच तर अन्याय करणाऱ्यांना मारता मारता लढता लढताच शहिद होण्याची वेळ आली आहे आणि लढणारे कधीच मरत नाही. कवी ईंद्रजित भालेराव एका कवितेत म्हणतात शिक बाबा शिक लढायला शिक मरायला नाही आता मारायला शिक पण आपण काय शिकतो विचार करा!

युगात्मा शरद जोशी साहेबांच्या विचारांचे आचरण करा! यशस्वी होण्यासाठी सर्व मार्ग आपोआप दिसतील!!

**– बापूसाहेब पगारे,**
**येवला जिल्हा, नाशिक**




◀ **१२ डिसेंबर १९८६ च्या सेवाग्राम रेल्वे रोको आंदोलनातील एक दृश्य.**

**चाणकीकोपरा, जि. वर्धा येथील पुष्पकुमार जाधव एक आंदोलक.**




**चांगदेवजी गोमाजी मेश्राम**

सिव्हील इंजिनिअर तथा कॉन्ट्रक्टर

ता. आरमोरी, जि. गडचिरो

**हार्दिक शुभेच्छा !**

---



सचिव

**योगराज कृष्णाजी कुथे**

**द्वारा-कुथे पाटील कॉन्व्हेंट,**

शिवाजी वॉर्ड, देसाईगंज, जि. गडचिरोली

**सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ**

गडचिरोली

---

**स्व. त्र्यंबक पाटील बुद्धे**
**स्मृती प्रतिष्ठाण चिखली तुकुम**

**निर्मित नाट्यरंगकर्मी, रंगभुमी**
**ता. वडसा (देसाईगंज)**

---

# शिव ॲग्रो सिडस्, पुलगाव

**ता. देवळी, जि. वर्धा**

---

ubarchitects

**UJWAL BHOLE**
ubaujwal@gmail.com
+919820566216

602-B, Sarvoday 11, Kher Nagar,
Bandra (East), Mumbai - 400051.
www.ubarchitects.in
infoubarch@gmail.com
+9122265477036

---

स्थापना : १४/८/९० -: कार्यालय :-

**आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. सावरगांव**

र.नं. ११०१, ता. नागभिड, जि. चंद्रपूर फोन नं.(०७१७९) २०२१६४

१) श्री. लालाजी सितकुराजी उईके, अध्यक्ष (वलनी)
२) श्री. शिवशंकर कृष्णाजी साहरे, उपाध्यक्ष, सावरगांव
३) श्री. माणिक राजाराम कुमरे, सावरगांव
४) श्री. वसंता रामचंद्र औरासे, चिखलगांव
५) श्री. रमेश मारोती गेडाम, चिखलगांव
६) श्री. खोजराज गोविंदा मरस्कोले, वलनी
७) श्री. माणिक रावजी कोकाडे, चारगांव-मावा
८) श्री. तुळशीराम पैकाजी पर्पते, वलनी
९) श्री. केवलराम केशव बोरकर, वलनी
१०) श्री. प्रेमदास बंशीजी मेश्राम, चारगांव चेक
११) श्री. अमर सावजी मोढरे, सावरगांव
१२) सौ. रसीका लालाजी उईके, संचालिका, वलनी
१३) सौ. उषाताई ईश्वर मसराम, संचालिका, वलनी
१४) श्री. मोरेश्वर कुकसु ठिकरे, सावरगांव
१५) श्री. सिताराम परसराम मडावी, चिखलगांव

---

**लिलाताई शरद जोशी**
**महिला औद्योगीक संस्था लि.**

सार्वे, ता. शिंदखेडा, जि. धुळे

**गुलाबसिंह रघुवंशी**
एम.डी.

**सौ.कांताबाई रघुवंशी**
चेअरमन

# शरद जोशी शोधताना

महाराष्ट्राचे दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख सत्तेवर असताना, 'शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या आणि त्या रोखण्यासाठी दिली जाणारी अनुदाने (पॅकेजेस)' या विषयावर अभ्यास करून, त्यावर प्रभावी उपाययोजना सुचविण्याकरिता महाराष्ट्र शासनाने अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची एकसदस्यीय समिती गठित केली होती.त्यावेळी मी या समितीला एक अनावृत पत्र लिहिले.दै.केसरीच्या दि.२ जून २००८च्या अंकात ते पत्र छापून आले. या पत्रात समितीसमोर मी चार मुद्दे मांडले होते; ते असे :-

१. स्वातंत्र्यानंतरची शेतकऱ्यांच्या डोक्यावर (अर्थात ७/१२ वर) असलेली सर्व प्रकारची कर्जे ही अनैतिक आहेत असे शेतकरी संघटनेचे निश्चित म्हणणे आहे. त्यामुळे जे अनैतिक आहे ते मुळातून नष्ट केले पाहिजे, म्हणजेच शेतकऱ्याचा ७/१२ कोरा केला पाहिजे या संघटनेच्या मांडणीवर आपली समिती काय काम करते याला फार महत्त्व आहे.

२. शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव मिळाल्याशिवाय शेतीची समस्या सुटणार नाही; किंबहुना, आपल्या संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था सुधारणार नाही. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची दिली जाणारी अनुदाने (पॅकेजेस), सोयीसवलती या मलमपट्ट्यांनी ही जखम बरी होणार नाही उलट, अधिकच चिघळण्याची शक्यता आहे या संघटनेच्या भूमिकेवर आपली समिती कोणते काम करते हेही महत्त्वाचे आहे.

३. कष्ट करणाऱ्या माणसाची आत्महत्या ही एक असाधारण गोष्ट आहे. कारण, हातापायाची बोटे सडून गळून गेलेला महारोगीसुद्धा जगण्याची धडपड करीत असतो. अश्या वेळी हातीपायी धडधाकट असणारा, घाम गाळणारा, कष्ट करणारा माणूस आत्महत्या करतो आहे या समस्येचे स्वरूप एका आर्थिक प्रश्नाशी (केवळ पॅकेजेसशी) जोडून विचार करणे परिपूर्ण होणार नाही असे समितीला वाटते का?

४. आज समाजात 'मी शेतकऱ्याचा मुलगा आहे, माझ्या कुटुंबाचा प्रमुख व एकमेव उद्योग शेती हाच आहे' हे सांगण्याची लाज वाटावी अशी परिस्थिती या क्षेत्रात निर्माण झाली आहे. ही परिस्थिती बदलण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना आपली समिती सुचविणार आहे हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

आज हे आठवण्याचे कारण शनिवार दि.१८ फेब्रुवारी २०१७ रोजी दै.लोकसत्ताचे 'घराणेशाहीची गरज' हे संपादकीय. शेतकऱ्यांची पुढची पिढी आज शेतातून निघून चालली आहे.ती शेतात राबण्यासाठी येतच नाही.आज देशासमोरील सर्वांत मोठी समस्या कोणती असेल, तर ती हीच आहे, अशी खंत ज्येष्ठ शेतीसंशोधक एम.एस.स्वामीनाथन यांनी व्यक्त केली.आणि 'शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढीने पुकारलेला हा अघोषित संप देशाला अंधाराकडे घेऊन जाणारा असणार आहे' असे मत संपादकीयात व्यक्त झाले आहे.खरे तर, शेतकरी संघटनेच्या स्थापनेपासून वेगवेगळ्या मांडणीतून शरद जोशी यांनी अशा प्रकारच्या भविष्याची निश्चित शक्यता देशासमोर मांडण्याचा आकांत केला. विनाशाकडे चाललेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला सुधारण्यासाठी आणि पर्यायाने शेतकऱ्याला देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने जगता येईल अशी स्थिती निर्माण होण्याची गरज प्रतिपादन करून त्यासाठी संघटना उभारून अहिंसात्मक आंदोलनाचा मार्ग त्यांनी अवलंबला. आपल्या सर्वस्वाची होळी त्यांनी या लढ्यासाठी केली हे आपल्याला वेगळे सांगण्याची गरज नाही.

अगोदरच्याच म्हणजे शुक्रवार दि.१७ फेब्रुवारी २०१७ च्या दै.लोकसत्ताच्या अंकात स्वाभिमानी शेतकरी संघटना नेते खासदार राजू शेट्टी यांच्या वक्तव्याचा वृत्तांत आला आहे.'शेतकऱ्यांची कर्जमुक्ती' आणि 'शेतीमालाचा रास्त भाव' यासाठी रस्त्यावरचा लढा उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. या वक्तव्यात, विचार करायला भाग पाडणाऱ्या काही महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख राजू शेट्टी यांनी केलेला आहे हे निश्चित. त्या वक्तव्यात शरद जोशी यांचाही संदर्भ आला आहे म्हणून त्याची दाखल घ्यावी असे वाटले. अर्थात, त्यांनी व्यक्त केलेला निर्धार पोकळ ठरणार याचीही पूर्ण खात्री वाटते.कारण, स्वाभिमानी शेतकरी संघटना ही ढु ाशप ीू आहे. आणि सध्या हे दोन पहिलवान एकमेकांसमोर शड्डू ठोकून उभे ठाकले आहेत. महत्त्वाचे म्हणजे ते दोघे, तमाम शेतकऱ्यांचे स्वयंघोषित नेते स्वत:ला आता विद्वानही समजू लागले आहेत. निदान त्यात राजू शेट्टी यांचे वेगळेपण असे की, त्यांना जनतेने (त्यांच्या मतदारसंघातील) आपला प्रतिनिधी मान्य केले आहे. परंतु दुसरे नेते सदाभाऊ खोत हे विकत घेतलेल्या मंत्रीपदाने खूष होऊन आता लेखकही बनले आहेत. (अर्थात, मला स्वत:ला त्यांचा ग्रंथ वाचायला मिळाला नसल्याने त्याची खोली-रुंदी मला माहीत नाही.) आणि अलीकडे ते शरद जोशींनी सांगितलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिकारवाणीने मते व्यक्त करू लागले आहेत. त्याचा कसदारपणा भविष्यात आपल्या प्रत्ययाला येईलच. तर, दै.लोकसत्तामध्ये खासदार शेट्टी यांची साप्ताहिक लेखमाला सुरू आहे.सुरुवातीच्या दोनतीन लेखांत त्यांची शेतकरी आणि शेतीअर्थशास्त्र याविषयीच्या जाणकारीची झलक वाचायला मिळाली. आणि मागच्या आठवड्याच्या लेखात ते ललित लेखनाकडे वळले आहेत. (कारण काही थोडा स्वत:चा अनुभव आणि डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी सांगितलेला आकडेवारीचा अभ्यास याच्या मर्यादा आहेत.) पुढे पाहू या, कोणते अर्थशास्त्राचे

धडे ते देताहेत! आपण जे कोणी शरद जोशी यांचा वारसा निष्ठेने पुढे चालविण्याचा आभास निर्माण करीत आहोत (चालविण्याची धडपड करीत आहोत) त्यांच्यापाशी एवढेही सामाजिक व राजकीय वलय असल्याचे दिसत नाही.

------ दोन ------

संपूर्ण देशाला आणि संवेदनशील अखंड मानवजगताला धक्का देणारे एक वृत्त शनिवार दि.४ मार्च २०१७ रोजी विविध दैनिकांत प्रसिद्ध झाले आहे. गुजराथमधील एका सेवाभावी संस्थेने तेथील शेतकरी आत्महत्या समस्येबाबत दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात झालेल्या कामकाजाचा वृत्तांत त्यात देण्यात आला आहे. या याचिकेची व्याप्ती संपूर्ण देशासाठी करण्यात यावी असे नमूद करून न्यायालयाने सरकारची चांगलीच कानउघाडणी केली आहे. पीकबुडीच्या आणि कर्जाच्या चक्रात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याबाबत सरकार चुकीची पावले उचलत असल्याची टीका न्यायालयाने शुक्रवारी (३ मार्च २०१७) या कामकाजाच्या संदर्भात केली. देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल चिंता व्यक्त करत सरकार ही समस्या सोडवताना चुकीच्या दिशेने जात असल्याचे न्यायालयाने कठोर शब्दांत सुनावले. ही समस्या आत्यंतिक महत्त्वाची असून, आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना केवळ आर्थिक नुकसानभरपाई देणे हा यावर उपाय नसून त्यासाठी सरकारने तातडीने निश्चित धोरण आखण्याचे आवश्यक असल्याचे न्यायालयाने केंद्राला सुनावले. गेल्या काही दशकांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत असून त्यामागची कारणे शोधण्याची कोणतीही कार्यवाही झालेली नाही. जर हा प्रश्न योग्य पद्धतीने सोडवला तर शेतीच्या आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीने बऱ्याच चांगल्या गोष्टी साध्य करता येऊ शकतील. मृत्यूनंतर आत्महत्याग्रस्तांना मदत करण्याऐवजी हा प्रकार थांबवण्यासाठी धोरणे राबवावी असे मुख्य न्यायाधीश जे. एस.केहर यांच्या खंडपीठाने सरकारला सुनावले.

गेली ३०-३५ वर्षे शरद जोशींनी शेतकरी संघटनेच्या व्यासपीठावरून आणि वेगवेगळ्या आंदोलनांतून हीच भूमिका देशासमोर मांडली. 'स्वातंत्र्यानंतरची शेतकऱ्याच्या डोक्यावर असलेली सर्व प्रकारची कर्जे ही बेकायदेशीर व अनैतिक आहेत', 'शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव द्यावा' आणि 'आम्हाला भीक नको, तर घामाचे दाम हवे' ही संघटनेची मागणी असून कर्जबाजारीपणावरील उपाय म्हणून दिली जाणारी सरकारी अनुदाने व अन्य प्रकारच्या सोयीसवलती यामुळे ही समस्या चिघळण्याची शक्यता अधिक असल्याचे द्रष्टे विचारवंत शरद जोशी यांचे भाकित किती खरे होते हेच आजच्या सर्वोच्च न्यायालयातील कामकाजातून स्पष्ट झाले आहे. आपल्या मागण्यांसाठी शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली संघटनेने केलेली आंदोलने राज्य सरकारांनी कठोर उपायांनी मोडून काढली.आंदोलकांचे अनन्वित छळ त्यासाठी करण्यात आले.अनेक शेतकरी या कारवाईत बळी पडले. खरे तर यासाठी त्या त्या वेळी सत्तेवर असलेल्या सरकारांवर हत्येचे गुन्हे दाखल केले पाहिजेत आणि त्यासाठी जबाबदार धरून कठोर शिक्षा केल्या पाहिजेत. आणि अश्या विपरीत परिस्थितीतही शेतकरी व कष्टकरी यांच्या परिश्रमांचे श्रेय घेऊन जे सर्वोच्च सरकारी सन्मान स्वीकारण्यास धजावतात त्यांच्या बेशरमपणाची त्यांना लाज वाटली पाहिजे. लक्षावधी मायभगिनींच्या पांढऱ्या कपाळांवरचे ललाटलेख ज्यांच्या नालायक कर्तृत्वाचे फलित आहेत त्यांनी आपल्या दळभद्री कामाची शरम म्हणून ते पुरस्कार परत करून थोडेफार प्रायश्चित्ततरी घेतले पाहिजे.

------ तीन ------

माझ्या भावांनो आणि बहिणींनो,

शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली नोव्हेंबर २००८मध्ये औरंगाबादला आणि त्यानंतरचे नोव्हेंबर २०१३मध्ये चंद्रपूरला अशी दोन अधिवेशने झाली.या दोनही अधिवेशनांची घोषणा होती 'पुन्हा एकदा उत्तम शेती.' २००८ मध्ये झालेल्या अधिवेशनाचे निमंत्रण देण्यासाठी या नेत्याने स्वत: दौरा करून शेतकरी भावांना आणि मायबहिणींना निमंत्रित केले. शेतीक्षेत्रात आलेल्या नवनवीन तंत्रज्ञानाची, जैविक बियाण्यांची ओळख करून देऊन आपल्या पाईकांची दृष्टी व्यापक व्हावी या उद्दिष्टपूर्तीसाठी घेण्यात आलेले औरंगाबादचे अधिवेशन कारणी लागावे म्हणून त्यांनी परिश्रम केले. २०१३मध्ये चंद्रपूर येथे झालेल्या अधिवेशनात 'स्वतंत्र भारताचे नैतिक दर्शन' आणि 'शेतकरी संघटनेचे नैतिक दर्शन' या आपल्या मांडणीतून कृषिअर्थशास्त्राचे व्यापक स्वरूप आणि त्याचबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावत ठेवण्याची संघटनेची बुद्धिवादी तर्ककठोर विचार- व आचारपद्धती त्यांनी कार्यकर्त्यांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला.

'पुन्हा एकदा उत्तम शेती' या बीजमंत्राचा आयुष्याच्या अखेरच्या कालखंडात शरद जोशी यांनी पुनरुच्चार करून देशाला निश्चितपणे एका नव्या क्रांतीसाठी हाक घातली आहे. शेतकरी संघटनेच्या बांधणीची झालेली वाताहत आणि संघटनेच्या पाइकांनी मूळ उद्दिष्टांकडे फिरवलेली पाठ यामुळे शरद जोशी जरी व्यथित झाले तरी आपल्या जबाबदारीचे आणि ध्येयाचे भान यातून त्यांनी या मार्गाचा अवलंब केल्याचे दिसून येते. कदाचित, शिवरायांप्रमाणे दोन लढायांच्या मधल्या काळात आपल्या सैनिकांच्या हाताला काम दिले नाही तर ते स्वत:साठी आणि समाजासाठीही घातक ठरू शकतील असेही त्यांना वाटले असावे.

या बीजमंत्राचा व्यापक अंगांनी विचार करून शेती विकासाच्या दृष्टीने पाया भक्कम करून देशाच्या संपन्नतेसाठी आणि शेतकऱ्यांच्या सर्वांगीण फायद्यासाठी त्याचा कसा उपयोग होईल यासाठी अभ्यास करण्याची आवश्यकता लक्षात घेणे गरजेचे

आहे.

शरद जोशी यांनी एक अभूतपूर्व आंदोलन उभारले ते त्यांच्या अंगाच्या काही गुणवैशिष्ट्यांच्या आधारावर. भविष्यकाळात अतिशयोक्ती वाटतील असे घटनाप्रसंग संघटनेच्या चळवळीत घडले आहेत. मी स्वत:ही त्याचा साक्षीदार आहे. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात संघटनेची अधिवेशने झाली.या अधिवेशनांत खुल्या मैदानांत लाखोंच्या संख्येने संघटनापाईक स्त्री-पुरुष विविध राज्यांतून एकत्र जमत.शरद जोशी नावाचा एक अवलिया अर्थशास्त्रज्ञ व्यासपीठावरून अर्थशास्त्रातले अवघड विषय त्यांना समजावून सांगत असे.मला वाटते गांधी-नेहरू यांनाही अश्या महासभा लाभल्या नसाव्यात. ही केवळ गर्दी होती असेही नाही.उदाहरणेच घ्यायची झाली तर, परभणीचे दुसरे अधिवेशन, चांदवडचे महिला अधिवेशन, औरंगाबादचे 'प्रचीतीचे देणे' अधिवेशन. कृषिअर्थशास्त्राची मूलतत्त्वे, महिलांचे संपत्तिअधिकार व त्याअनुषंगाने 'लक्ष्मीमुक्ती'ची तयारी, गॅट करार यांसारख्या विषयांवरील शरद जोशींचे विवेचन मैदानावरील लाखो अशिक्षित, अर्धशिक्षित पाईक अभ्यासपूर्वक ग्रहण करीत असत. ज्या वेळी गॅट करार, डंकेल ड्राफ्ट या विषयांत विद्यापीठांतले उच्चशिक्षित चाचपडत होते त्या वेळी औरंगाबादच्या खुल्या मैदानावर लाखो अर्धशिक्षित व अशिक्षित पाईक जागतिक बाजाराची चर्चा करीत होते. पुढे तर, या ज्ञानसत्रांत तयार झालेल्या संघटना पाइकांनी विद्यापीठांतील मंडळींना गॅट करार आणि डंकेल ड्राफ्ट समजावला हे आपण पाहिले आहे.हा चमत्कार शरद जोशीच करू शकले. शरद जोशी संपूर्णपणे अभ्यासण्याची आपल्या सर्वांनाच गरज आहे हे त्यातून स्पष्ट दिसून येईल. यापूर्वीची अधिवेशने आणि मेळावे यामध्ये रस्त्यावरच्या आंदोलनासाठी कार्यक्रम देणारे लढाऊ नेतृत्व आणि अखेरची दोन अधिवेशने यामध्ये दिसणारे नेतृत्व यातला फरक अभ्यासणे महत्त्वाचे आहे. कदाचित, वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या कारणांमुळे संघटनेतून अनेक नेते व कार्यकर्ते बाहेर पडले आणि संघटनेची लढण्याची शक्ती क्षीण झाली.नवीन लढाऊ नेतृत्व तयार होऊ शकले नाही.याचाही परिणाम पुढच्या वाटचालीत झालेला दिसतो.मूळचे संघटनेचे स्वरूप बदलले. स्वत: शरद जोशी यामुळे व्यथित झाले.

'दुर्दैवाने काही मंडळी व्यक्तिश: माझ्याबद्दल कटुता बाळगून वेगळी झाली. त्याबद्दल मात्र मला खूप दु:ख होतं. माझ्या हातून, कदाचित, काही चुकलं असेल. मी स्वत: त्यांच्यातल्या अनेकांच्या घरी जावून, त्यांना भेटून त्यांची क्षमा मागितली आहे आणि त्यांनी पुन्हा संघटनेत यावं असं जाहीर सभांमधूनही सांगितलं आहे.' अशा शब्दांत जाहीरपणे माफीनामा व्यक्त करण्याचा शरद जोशी यांनी प्रयत्न केला. संघटनेचे नुकसान होऊ नये असा त्यांचा त्यामागे प्रामाणिक हेतू होता.तथापि, आम्हा सगळ्यांचा व्यक्तिगत अहंकार वरचढ ठरला आणि संघटना आणखी क्षीण होत गेली.शेतकरी समाजाचे व्यापक हित त्यामुळे धोक्यात आले. शरद जोशी यांच्यासारख्या महान विचारवंत नेत्याचा माफीनामा बेदखल वाटण्याइतके आम्ही कठोर (मुर्दाड?) बनलो!

या संदर्भात, संघटनेतल्या दोन घटनांचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो.संघटनेत ज्या वेळी फाटाफूट सुरू झाली त्या वेळी व्यथित होऊन एका कार्यकर्त्याने प्रामाणिक हेतूने शरद जोशी यांना पत्र लिहिले. संघटनेतून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांना भेटण्याची व त्यांच्याशी बोलून त्या सर्वांना पुन्हा एकत्र येण्यासाठी विनंती करण्याची परवानगी आपल्याला मिळावी अशी भावना त्याने त्या पत्रात व्यक्त केली. माझ्या निश्चित माहितीप्रमाणे शरद जोशी यांनी त्या कार्यकर्त्याला तशी संमती दिली होती.त्या प्रयत्नातून काय झाले हे जरी समोर आले नसले तरी शरद जोशी यांची इच्छा त्या घटनेतून दिसल्याशिवाय रहात नाही.

दुसऱ्या घटनाप्रसंगी, श्रीरंगनाना मोरे यांच्या अमृतमहोत्सव सत्कारसमारंभातील भाषणात शरद जोशी म्हणाले, तुमच्यापैकी कोणाच्या मनात असं असेल की शेतकरी संघटनेत तुम्हाला योग्य तो मान मिळाला नाही किंवा सावत्रपणाची वागणूक दिली गेली, तर श्रीरंगनानांच्या साक्षीने मी कुटुंबप्रमुख म्हणून ती माझी चूक मानतो, तुमची माफी मागतो आणि 'परत या' अशी हाक देतो. इतके होऊनही आमची बधीरता कायम राहिली आहे.

मला सरकारांनी मी बुद्धिवान आहे म्हणून नाही बोलावलं, मी हाक मारली की तुम्ही शेतकरी लाखोंच्या संख्येने जमता, प्रसंगी लाठ्यागोळ्या खाण्याच्या, तुरुंगवास भोगण्याच्या तयारीने जमता या ताकदीची दखल घेऊन त्यांनी मला बोलावलं आहे अशा शब्दांत संघटनेची एकजूट, संघटनेची ताकद किती महत्त्वाची आहे याची जाणीव अनेकदा शरद जोशी यांनी वेगवेगळ्या अधिवेशनांत आपल्याला करून दिली आहे.

आपण एक ऐतिहासिक लढा लढतो आहोत. या लढ्याला त्यांनी 'दुसरे स्वातंत्र्ययुद्ध' घोषित केले इतकेच नाही तर या लढ्यात जागतिक-वैश्विक लढ्याची बीजे आहेत हेही सांगितले.हे समजून घेण्यात आम्ही सर्वजण कमी पडलो. केवळ उदात्त तत्त्वज्ञान किंवा विचार महत्त्वाचे नाहीत तर लोकशाही व्यवस्थेमध्ये त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी त्यापाठीमागे संघटनेची ताकद उभी करणे आवश्यक असल्याचे शरद जोशी यांचे म्हणणे समजून घेण्यास आणि कृतीत उतरवण्यास आम्ही नालायक ठरलो.

या संदर्भात, राजकीय हेतूंनी संघटनेतून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांची-नेत्यांची आजची स्थिती अभ्यासण्यासारखी आहे.त्यातले काहीजण केवळ भाषणबाजी आणि वेगवेगळ्या चॅनेलवरच्या चर्चांसाठी उपयोगी ठरत आहेत. बाकी इतरांचे अस्तित्वही आज कुणाला जाणवत नाही.किंबहुना, ते दखलपात्रही राहिलेले नाहीत. मला वाटते, आज जे कोणी या दृष्टीने उठाठेव करीत आहेत त्यांच्याही वाट्याला हाच भोग येणार आहे. यातून एक मात्र झाले की यातल्या बहुतेकांची स्वत:ची गरिबी दूर झाली आहे. मात्र संघटनेला आणि एका महान नेतृत्वाला त्यांनी



**व्हि.टू.विशाल वैभव धान सोयाबीन मल्टीक्रॉप टर्बो मळणी यंत्र कारखाना कुर्जेकर ॲग्रो कोरेगांव/चोप**

ऑफीसः ता.वडसा,देसाईगंज जि.गडचिरोली

फोनः 07137-280162 मो.: 9922151826

9922152036 / 9765040717

निर्माताः दिनेश एन.कुर्जेकर
कोरेगांव/चोप
















**व्हि.टू.विशाल वैभव धान सोयाबीन मल्टीक्रॉप टर्बो मळणी यंत्र कारखाना कुर्जेकर ॲग्रो कोरेगांव/चोप**

---

तिसऱ्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!

नुतन शिक्षण प्रसारक मंडळ, देसाईगंज द्वारा संचालित

# आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय देसाईगंज (वडसा)

जि. गडचिरोली

फोन नं. ०७१३७-२७२५५४, २७३८२३, २७३३३०

**डॉ. एन.पी. टुटेजा** अध्यक्ष

**जगदीश शर्मा** उपाध्यक्ष

**मोतीलाल कुकरेजा** सचिव

**डॉ. एच.एम. कामडी** कार्यकारी प्राचार्य

**तथा सर्व संचालक मंडळ, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी**

---

आम्ही आमच्या ग्राहक, ठेवीदार, शेतकरी बंधू व हितचिंतकाचे शुभ चिंतीतो !

सहकाराचं व्रत निष्ठेनी आचारावं
समृद्धीने हसत दारी यांव!

नफा ₹ ९.२५ कोटी

आमचे मार्गदर्शक



अरविंद ना.पोरेड्डीवार



मा. प्रविन अ.पोरेड्डीवार
अध्यक्ष

गतीमान नेतृत्व



मा.प्रकाश ना.पोरेड्डीवार



मा. एस.पी. आचलवार
मु.का.अधिकारी

अ.घ. साळवे
मानद सचिव

श्री.ना. भंडारीवार
उपाध्यक्ष

**दि गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.**
**मुख्य कार्यालय :** धानोरा रोड, गडचिरोली-४४२६०५
फोन : २३३५७०, २३२४३८, २३२९६५, फॅक्स : ०७१३२-२३२४४४

---

*तिसरे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा...!*

# संत तुकडोजी नागरी सह. पत संस्था

नंदोरी रोड, हिंगणघाट. र.नं. ८४६ M. 9673869555

ठेवीदारांच्या विश्वासास पात्र असलेली एकमेव पत संस्था

**राजेंद्र चाफले** अध्यक्ष

**सौ. चंदाताई आसुटकर** उपाध्यक्ष

**प्रभाकर कोळसे** सचिव

फोन नं. (ऑ.) २४८१७१, अध्यक्ष (नि.) २४५४९१

संचालक मंडळ :

प्रदीप झाडे, रमेश लोंढे, गजानन मांडवकर, पांडुरंग भंडारे, प्रमोद झाडे, अरविंद पाटोळे, अरविंद कोपरे, श्रीरामजी धनरे, रविंद्र बुटले, सौ. केसरबाई बाराहाते

घायाळ केले; त्यांना पराभूत ठरण्यासाठी ते कारणीभूत झाले हे त्यांचे ऐतिहासिक पाप ठरणार आहे.

वेगळ्या शब्दांत सांगायचे झाले तर, डबक्यातल्या बेडकाने कितीही फुगून मोठे होण्याचा प्रयत्न केला तरी तो बैलाइतका मोठा होऊ शकणार नाही.तशा प्रयत्नात फुटून त्याचा घातच ठरलेला आहे.एवढे तरी शहाणपण त्यांनी घ्यायला पाहिजे असे वाटते.

------ चार ------

नास्तिक असलेल्या युवक नरेन्द्राचे रामकृष्ण परमहंस यांच्या भेटीनंतर आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून उच्चस्थानी विराजमान झालेले विवेकानंद रूपांतर आणि जीवनातील सर्व भौतिक साधनांची उपलब्धता जाणीवपूर्वक अव्हेरून हालाखीचे जीवन स्वीकारून जगाच्या अर्थशास्त्राला कृषिकेंद्रित वेगळे परिमाण देणारे अर्थतज्ज्ञ शरद जोशी यांच्या जीवनप्रवासातील साम्य मला उल्लेखनीय वाटते. 'जगाला दीड हजार वर्षे पुरेल एवढे विचारधन मी देऊन ठेवले आहे' असे आत्मविश्वासाचे उद्गार स्वामी विवेकानंद यांनी स्वत:विषयी काढले आहेत.

शेतकऱ्यांचे शोषण न होता जलद आर्थिक विकास होऊ शकतो हे सिद्ध करण्यासाठी माझा लढा आहे.महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा असूड'मध्ये जे सांगितले त्यामध्ये आणि आज मी जे काही सांगतो आहे त्यामध्ये काहीही फरक नाही.फक्त फुल्यांच्या नंतर हा विचार प्रथमच पुढे येतो आहे, आणि मी तो अर्थशास्त्रीय परिभाषेत मांडतो आहे. एक ऐतिहासिक लढा आपण लढतो आहोत. यामधून जगाच्या आर्थिक जडणघडणीला नवी दिशा मिळणार आहे. शेतकरी संघटनेच्या स्थापनेच्या सुरुवातीलाच शरद जोशी यांनी आत्मविश्वासाने मांडलेल्या या विचाराची प्रचीती आपण घेत आहोत. दीर्घ काळ शरद जोशी यांनी मांडलेल्या विचारांची दखल या देशाला घ्यावी लागणार आहे हे निश्चित.

डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर यांनी नोव्हेंबर २००८मध्ये लिहिलेल्या आपल्या एका लेखात या आंदोलनाच्या संदर्भात नोंदवलेले निरीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.त्यात ते म्हणतात, एक विचारधारा आणि त्यातून निर्माण झालेल्या या आंदोलनाची केवळ भारतातच नव्हे तर जगभर कमी-अधिक प्रमाणात चर्चा झाली.कारण हे जगाच्या इतिहासातील एक अभूतपूर्व आंदोलन होते.आणि या आंदोलनाचा अभ्यास करावयास आणि त्यात सामील व्हावयास जगभरचे पत्रकार आणि कार्यकर्ते भारतात आले होते.गोलान हाईट्सला आपल्या ट्रॅक्टर्सचा वेढा घालून शेतीमालाला रास्त भाव मागणारे इस्रायली शेतकरी 'लाँग लिव्ह शरद जोशी' हा नारा देत होते.

शरद जोशी यांना 'शेतकऱ्यांचे पंचप्राण', 'महामानव' अश्या उपाधि आम्ही संघटना पाईकांनी आणि तमाम शेतकऱ्यांनी बहाल केल्या.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही त्यांच्या अनुयायांनी अशीच 'महामानव' उपाधि दिली आणि त्याचा उदोउदो आपण गेली अनेक वर्षे ऐकतो आहोत. आजची त्यांच्या अनुयायांची परिस्थिती व वागणूक मात्र अत्यंत विपरीत आहे. प्रत्येकजण आपण मांडतो आहोत ते आंबेडकर हेच खरे आणि मी त्यांचा वारसा पुढे चालवणारा खरा असे समजून इतरांच्या नावाने बोंबाबोंब करतो आहे.डॉ.बाबासाहेबांनी सुरू केलेल्या संघटना, पक्ष यांची लांडगेतोड सुरू आहे. एक प्रकारे त्यांचे तत्त्वज्ञान आणि विचार यातील आपापल्या सोयीचे तुकडे विकून स्वत:चा वैयक्तिक स्वार्थ साधण्याचेच काम त्यातून होताना दिसते. या महान नेत्याने जे व्यापक समाजहित आणि देशहित गृहीत धरून जीवन समर्पित केले त्याची पर्वा या अनुयायी म्हणवून घेणाऱ्यांना नाही असेच म्हणावे लागते.हा संदर्भ यासाठी नमूद केला कारण आम्हीही आता याच मार्गाने जाणार आहोत का याचा विचार करण्याची गरज आहे.इतिहासाची पुनरावृत्ती अटळ आहे असे म्हटले जाते.पण ते कोणत्या अर्थाने आपण घेणार आहोत? संघटनेत राहून योग्य वाटचाल करून संस्थापकाने दाखवलेल्या मार्गाने व्यापक हितासाठी वाटचाल करीत, का त्याच नेतृत्वाचे लचके तोडून स्वार्थासाठी त्यांचा बाजार मांडून? याचा आताच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील दिवंगत साहित्यिक प्रा.अरविंद वामन कुळकर्णी यांनी 'साप्ताहिक माणूस' साठी (१४ मार्च १९८१) लेख लिहिला.त्यात डॉ.आंबेडकर आणि शरद जोशी यांच्या संबंधाने तुलनात्मक लिखाण केले आहे.त्या लेखात प्रा.कुळकर्णी लिहितात, नेहमीच्या मराठी पठडीला जागून शरद जोशी यांची खिल्ली उडविण्याचे कर्म जवळजवळ सर्व मराठी पत्रकारितेने केले.भारतात सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यांची आर्थिक गळचेपी चव्हाट्यावर मांडावी, त्यांच्यासाठी न्याय मागावा हे अर्थशास्त्राला आजवर सुचले नाही.हे सारे छातीठोकपणे सांगणारा आणि, नुसते आपल्या केबिनमध्ये बसून न सांगता, त्यासाठी आवश्यक ती जागृती करणारा, संघटना उभारणारा शरद जोशी हा पहिला नि खराखुरा शेतकरी नेता आहे.आज कदाचित अतिशयोक्तीचा आरोप होईल; पण तो पत्करूनही असे म्हणावेसे वाटते की दलितांना डॉ. आंबेडकरांच्या रूपाने जसा पहिल्यांदा सर्वार्थाने नेता लाभला, तसाच या शरद जोशींच्या रूपाने आज शेतकऱ्यांना नेता लाभला आहे. या तुलनेमागचा हेतू लक्षात घेणे मात्र महत्त्वाचे आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाग्य असे की, त्यांना आपल्या लाखो सर्वसामान्य अनुयायांच्या अंत:करणात अढळ स्थान प्राप्त झाले. आज त्यांना जाऊन इतकी वर्षे झाली तरी त्यांना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी त्यांचे लक्षावधी अनुयायी त्यांच्या स्मृतिस्थळापाशी नतमस्तक होऊन नियमितपणे कृतज्ञता व्यक्त करीत आहेत. मात्र दुसऱ्या बाजूला शरद जोशी यांना जिवंतपणी आणि मृत्यूनंतरही उपेक्षाच वाट्याला आली असे म्हणावे लागेल. गतवर्षी शरद जोशी यांचा अंत्यविधी पुण्यात झाला. अंत्यविधीप्रसंगी संघटना पाइकांची जी उपस्थिती होती

ती शरम वाटावी इतकी कमी होती.आमच्या कृतघ्नपणाचा कळस म्हणजे त्याही प्रसंगी मानपानाची नाट्ये सुरू असल्याचे जाणवत होते. इतिहासाला कलाटणी देण्याचे कर्तृत्व ज्या विचारवंताने सिद्ध केले, 'माझ्या देशांतील उपेक्षित शेतकऱ्याला आणि कष्टकऱ्याला सन्मानाने जीवन जगण्याचे सामर्थ्य मिळावे' यासाठी ज्याने सर्वस्व पणाला लावले त्या महान व्यक्तित्वाला आपल्या परलोक प्रवासाच्या खर्चाची व्यवस्था स्वत:लाच करावी लागली याच्या इतकी शरमेची बाब काही असेल असे वाटत नाही. आणि आज लगेचच आम्ही वारसाहक्कासाठी ऊर बडवून घेत आहोत. हे दुर्दैव त्या नेत्याचे की आम्हा दळभद्री वारसांचे?याची कठोर चिकित्सा होण्याची गरज आहे.

आपण हाती घेतलेले कार्य किती कठीण आहे याची शरद जोशी यांना निश्चित जाणीव होती.आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.आणि आपल्या संघटना पाइकांनीही या कार्यासाठी आज काही त्यागाची तयारी ठेवली पाहिजे अशी रास्त अपेक्षा त्यांनी ठेवली असणारच. संघटनेचे अंतिम लक्ष्य आणि त्यासाठी करावी लागणारी कठीण वाटचाल याची मांडणी अत्यंत परखडपणे शरद जोशी यांनी संघटनेच्या व्यासपीठावरून व लिखाणातून वारंवार व्यक्त केली आहे; त्याच बरोबर एक माणूस म्हणून आपल्या मर्यादा कोणत्या आहेत याचीही पुरेपूर चिकित्सा केली आहे.

कोणतीही व्यक्ती ही माणूस म्हणून काही आनुवंशिक गुणदोष घेऊनच जन्माला येते.अपवादानेच ते मूळातून नष्ट केले जाऊ शकतात, हे लक्षात घ्यावे लागते.त्यामुळे शरद जोशी यांच्या संबंधाने काही आमचे वैयक्तिक मतभेदाचे कारण घडू शकते.तथापि, शरद जोशी यांच्यासारख्या महान व्यक्तित्वाचे दोष दाखविण्याची आपली पात्रता ज्याने त्याने नीट तपासून पाहिली पाहिजे. म्हणजे सुधारण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल. 'स्वातंत्र्याची उपासना करीत असताना नरक जरी मिळाला तरी तो स्वर्गापेक्षा मौल्यवान आहे' या तत्त्वाने सतत शोध घेणाऱ्या शरद जोशी यांचा शोध आपल्या कवेत सापडणे अवघड आहे असे म्हणावेसे वाटते.

शरद जोशींचे दुर्दैव म्हणावे लागेल की, ज्या समाजघटकांसाठी त्यांनी आंदोलन उभारले त्यांना वाचन, अभ्यास आणि चिकित्सा यांचे वावडे राहिले आहे.संघटनेच्या मुखपत्राची आणि एकूणच साहित्याची जी परवड झाली ती आपण अनुभवली आहे.शरद जोशी जे काही लिहीत होते, सांगत होते ते सर्वांपर्यंत पोहोचविण्याची यंत्रणा एवढ्या दीर्घ कालावधीत आम्ही उभारू शकलो नाही.सगळा इतिहास पुन्हा इथे मांडण्याची गरज नाही.आणि म्हणून, स्वामी विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे, एकाच व्यक्तीने दार्शनिक, नेता, संघटक, कार्यकर्ता या भूमिका करणे शक्य नसते.त्यामुळे विचारांचे, संघटनेचे आणि आंदोलनाचे अपरंपार नुकसान होते. यातून काही धडा पुढच्या काळासाठी आम्ही घेणार आहोत की नाही याचा विचार होण्याची गरज आहे. परिस्थितीची गरज म्हणून शरद जोशी यांना या भूमिका अंगावर घ्याव्या लागल्या असतील. मात्र आमच्यापैकी कुणाची तेवढी पात्रता आहे का याचाही विचार झाला पाहिजे असे वाटते. एकाच मठातून दोन महात्मे निर्माण होत नाहीत; किंबहुना, कुठल्याही एका ग्रंथातून सर्व काळाच्या सर्व समस्यांची उत्तरे मिळू शकत नाहीत, त्यासाठी 'सावध ऐका पुढल्या हाका' याप्रमाणे जागरूक राहून कार्य सुरू ठेवावे लागेल. असे सांगून स्वत: शरद जोशी यांनी ही जाणीव ठेवली आणि आम्हालाही तशी करून दिली आहे.

शरद जोशी आणि शेतकरी संघटना यांचे एक चिकित्सक अभ्यासक डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर यांनी लिहिलेल्या एका लेखात (शेतकरी संघटना ११ वे अधिवेशन स्मरणिका २००८) म्हटले आहे, शेतकरी संघटनेचा आज परतीचा प्रवास सुरू आहे असे वाटते. अनेक कार्यकर्ते सैरभैर झालेत व बाहेर पडलेत. काही सवते सुभे आहेत. मात्र प्रत्येकाच्या मनात शरद जोशींनी फुलविलेला जळता निखारा तसाच आहे. आज २०१७ साली अत्यंत खेदजनक अशी स्थिती आहे; जळता निखारा जवळजवळ विझत आला आहे. सगळ्यांनीच आपापल्या मर्यादा ओळखून शुद्धीवर येण्याची गरज आहे. स्वत:ला शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेचे पाईक म्हणविणारे आम्ही गेली अनेक वर्षे एकही नवीन कार्यक्रम संघटनेला देऊ शकलेलो नाही. शरद जोशी यांच्या निधनानंतर दोनतीन बैठका झाल्या, कोणताही अजेंडा नसताना या बैठका झाल्या.नवीन कार्यक्रम जाहीर झाला नाही.जणू काही शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटले आहेत इतकी शांतता आहे.शरद जोशी यांच्या प्रथम स्मृतिदिनाच्या निमित्ताने नांदेड येथे झालेल्या अधिवेशनात त्यांच्या चरित्रग्रंथाचे प्रकाशन झाले.('अंतर्नाद'चे संपादक भानू काळे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हा चरित्रग्रंथ सिद्ध केला त्याबद्दल संघटना पाईक आणि शरद जोशीप्रेमी सदैव त्यांचे ऋणी रहातील.)२-३ शाळकरी मुलांना व्यासपीठावर बोलावून संघटनेचा बिल्ला लावण्याचा विशेष कार्यक्रम पार पडला.अधिवेशनाची उपस्थिती पहाता संघटनेच्या मतभेदांचे उत्तम दर्शन झाले.केवळ काहीतरी दाखवायचे म्हणून असे कार्यक्रम घेतल्याने संघटना वाढणे राहोच, संघटना कमकुवत करण्यासच ते कारणीभूत ठरतील. त्यामुळे ही एक प्रकारे आत्मवंचनाच होईल. आणि संघटनेतल्या जबाबदारीमुळे, कामामुळे माझे नुकसान झाले असे म्हणून आम्हाला जबाबदारीतून मुक्त होता येणार नाही याची जाणीव प्रत्येकाने करून घेऊन आपापले वैयक्तिक काम आणि जबाबदारी निभावण्यासाठी संघटनेतले काम थांबविण्याची तयारी ठेवावी लागेल. मी वैयक्तिक माझ्याकरिता या ठिकाणी नमूद करू इच्छितो की, संघटनेची एकजूट होणार नसेल आणि मतभेद व मनभेद मिटणारच नसतील तर राज्य कार्यकारिणीचा सदस्य म्हणून माझे नाव समाविष्ट केले जाते, ते यापुढे छापले जाऊ नये.

डॉ. दाभोळकर म्हणतात त्याप्रमाणे निर्माण झालेले सवते सुभे प्रथम बंद करावे लागतील. स्वत:च्या मतलबापुरते मोडूनतोडून सोयीस्कररित्या शरद जोशींचा वापर करण्याचे थांबवावे लागेल. शरद जोशी यांच्या भावनांचा आम्ही त्यांच्या जिवंतपणी आदर केला नाही तरी आज त्यांच्या निधनानंतर संघटनेच्या व्यापक हितासाठी करणे सर्वांच्याच आणि शेतकऱ्यांच्या हिताचे ठरणार आहे याची जाणीव ठेवावी लागेल. आणि इतके जमणारच नसेल तर दुसरा शरद जोशी येण्याची वाट पहात प्रत्येकाने स्वहिताचा उद्योग चालू ठेवणे श्रेयस्कर ठरेल.

'कर्जमुक्त शेतकरी मला डोळ्यांनी पहायचा आहे', 'शेतकऱ्याची आत्महत्या थांबवता येत नाही याची वेदना मला बेचैन करते' असे घोकत या नेत्याने अखेरचा श्वास घेतला. आयुष्याच्या अखेरच्या तीनचार वर्षांत शरद जोशी अस्वस्थ मन:स्थितीत होते असे जाणवल्याशिवाय राहिले नाही. आपल्या सर्वस्वाचा त्याग करतानाही ही अस्वस्थता काही यापूर्वी दिसली नव्हती.संघटनेच्या भावी वाटचालीची दुर्बलता त्यांना अस्वस्थ करीत असावी असे निश्चितपणे म्हणता येईल. आणि याच एका वेगळ्या मन:स्थितीत त्यांनी न्यासाच्या निर्मितीचा आणि इच्छापत्र करण्याचा निर्णय केला असावा असे म्हणण्यास वाव आहे.

------ पाच ------

आम्ही स्वत:ला शरद जोशींचे खरे वारसदार म्हणवून घेणार असू तर त्यासाठी शरद जोशींची संघटना तिच्या मूळ ध्येयाकडे वाटचाल करत भक्कमपणे उभी करावी लागेल. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम हाती घ्यावा असे सुचवावेसे वाटते.

१. सर्वांनीच व्यक्तिगत अहंकार थोडे बाजूला ठेवून, किंबहुना सोडून देऊन संघटना पुन्हा एकसंध उभी करणे.

२. शेतकरी संघटना न्यासाची सर्वसमावेशक पुनर्रचना करणे.

३. शरद जोशींनी न्यासाला दिलेल्या जागेवर शेतकरी हुतात्म्यांचे, शरद जोशी यांनी पुकारलेल्या 'दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धा'चे स्मरण देणारे आणि भविष्यातल्या शेतकऱ्यांच्या लढ्याला कायम प्रेरणादायी होईल अशा प्रकारचे उचित व समर्पक स्मारक उभारणे.

४. या ठिकाणी शरद जोशी यांच्या नावाने अध्यासन निर्माण करून त्याद्वारे समग्र शरद जोशी विविध माध्यमांतून देशासमोर व जगासमोर मांडणे.

**– शाम पवार, महाळुंगे (इंगळे)**
**मोबाइल: ९८६०८९२९६७**

# आंदोलनाचा पहिलाच अनुभव...

आजचा दिवस (१४/०३/२०१७) स्व. शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेच्या धरणे आंदोलनात गेला. मस्तच अनुभव आला. सुमारे एक तप पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना बातमीदार म्हणून या संघटनेशी संबंध येत होता. पुणे, मुंबईसह नगरमधील शेतकरी संघटना कार्यकर्त्यांची विचारांशी असणारी बांधिलकी व तगमग पाहून हेवा वाटायचा. आठ महिन्यांपूर्वी पत्रकारितेला जय महाराष्ट्र करून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करू लागलो. दरम्यान, कौटुंबिक पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मित्रांच्याच मदतीने राजकीय जनसंपर्काच्या क्षेत्रातही कामाला सुरुवात केली. दरम्यान, यात चांगला जम बसल्यावर कोणत्या राजकीय व सामाजिक संघटनेत काम करावे, याचाच विचार डोक्यात घोळत होता. राजकीय पक्षांमधील फसवणूक ठायीठायी अनुभवली होती. तर, जाती व धर्माच्या नावे समाजकारणाआडून राजकारण करणाऱ्याचा उबग आला होता. मग विचार करूनच शेतकरी संघटनेत काम करण्याचं ठरवलं. पंधरा दिवसांपूर्वी अध्यक्ष श्री. अनिल घनवट यांची त्यांच्याच घरी जाऊन यानिमित्ताने भेट घेऊन मनोदय व्यक्त केला. त्यांनीही 'तुमच्यासारख्या तरुणांचीच संघटनेला गरज आहे. कधीपासून काम सुरू करताय?' असं म्हणून प्रोत्साहन दिले.

मला यानिमित्ताने स्व. शरद जोशी यांची भेट घेतल्याचा व त्यांनीच पाठीवर थाप टाकून लढण्याचा विश्वास व्यक्त केल्याची अनुभूती झाली. मग ठरवलं, मस्त काम करूयात 'अंगारवाटा'वरून शेतकऱ्याच्या सर्वांगीण उन्नतीचा वसा घेतलेल्या स्व. शरद जोशी यांच्या विचारांना शेतकरी तरुणांत पोहचविण्याचे. आज याचसाठी पूर्ण दिवस धरणे आंदोलनासाठी अहमदनगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या दिला. यानिमित्ताने शेतकरी चळवळीसाठी वाहून घेतलेले सुमारे ५० 'तरुण शेतकरी' भेटले. हे सगळेच माझ्या वडिलांचे समवयस्क. पण मनाने 'तरुण'. त्यांनीही मला समजून घेऊन आंदोलनासाठीचा जोष वाढविला. आता मी जीवनभर अशाच पद्धतीने शेतकरी प्रश्नांसाठी लढणाऱ्या शेतकरी संघटनेसाठी कार्यकर्ता म्हणून काम करणार आहे. संघटनेच्या माध्यमातून स्व. शरद जोशी यांच्या विचारांना शेतकऱ्याच्या बांधापर्यंत नेऊन बळीराजाला उन्नतीच्या मार्गावर नेण्यासाठीच पदाधिकाऱ्यांचा आदेशान्वये काम करणार आहे. त्यासाठी मला हवे आहेत, शेतकरी बांधवांचे सहकार्य व आशीर्वाद...

शेतकरी संघटना... जिंदाबाद..!
शरद जोशी... जिंदाबाद..!

**सचिन मोहन चोभे**
**रा. बाबुर्डी बेंद, अहमदनगर.**
**मो. ९४२२२१५६५८**

GOLHAR INDUSTRIES

# गोल्हर जिनिंग ॲन्ड ऑईल्स प्रा.लि.

कडाजना, ता. हिंगणघाट, जिल्हा–वर्धा–४४२३०१

## (थेट डायरेक्ट कापूस खरेदी केंद्र)

१) कापसाच्या भावाची माहिती फोन मॅसेजद्वारे रोज दिल्या जाते.

२) आमच्या उत्तम प्रकारच्या कापसाच्या गाठी तयार केल्या जातात.

३) गाई म्हशी करिता उत्तम प्रकारची चवदार सरकी ढेप तयार होते. ज्यामुळे चांगले प्रकारचे दुध मिळते. गाई व म्हशीपासून तूप मिळेल.

**संपर्क नं.**

**८४११०११८४६, ८४११०११८४५**

# गो–संवर्धन गोरस भंडार

## मगनवाडी, वर्धा

पुज्य महात्मा गांधी, पुज्य विनोबाजी व पुज्य जमनालालजी बजाज यांच्या संकल्पनेतून १९३९ रोजी उद्यास आलेल्या या सस्थेलां आज ७६ वर्षे पूर्ण झाले असून सहकारी तत्तवावर पंजीकृत होउन शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत न मिळता स्वबळावर कार्यरत असलेल्या या संस्थेला ५५ वर्षे पुर्ण झाली असुन ५६ व्या वर्षात यशस्वी वाटचाल करीत आहे.

**संस्थेचे उत्पादन व अद्यावत असलेले भाव**

| अनु.क्र. | दूध व दुग्धजन्य पदार्थ | परिणाम | किंमती |
|---|---|---|---|
| १) | दुध खरेदी (दुध उत्पादक शेतकरी) | प्रति लिटर | ३५.० रु |
| २) | दूध विक्री | ,, | ४०.०० |
| ३) | गरम दूध | ,, | ५०.०० |
| ४) | बासुंदी | प्रति किलो | २२०.०० |
| ५) | खवा | ,, | ३३०.०० |
| ६) | पेढा | ,, | ३६०.०० |
| ७) | चक्का | ,, | २४०.०० |
| ८) | श्रीखंड | ,, | २२०.०० |
| ९) | पनीर | ,, | ३६०.०० |
| १०) | लोणी | ,, | ५४०.०० |
| ११) | तूप | ,, | ७००.०० |
| १२) | गोरस पाक | ,, | ४५०.०० |
| १३) | ब्रेड मिल्क (वजन २०० ग्रम) | प्रति नग | १०.०० |
| १४) | ब्रेड मिल्क (वजन १०० ग्रम) | ,, | ५.०० |
| १५) | गोलबन (गव्हाच्या कनकेचा) १ नग ४.०० रुपये प्रमाणे जोडी | | ८.०० रु. |
| १६) | टोष्ट | प्रति किलो | ६०.०० रु |
| १७) | ताक | प्रति लिटर | १०.०० रु |
| १८) | दही | प्रति लिटर | ४२.०० रु |
| १९) | गोरस पाक | प्रति ५० ग्रम | २३.०० रु |

**संघाचे संचालक मंडळ २०१५-२०२०**

श्री देवरावजी कासटवार (अध्यक्ष), २) श्री प्रेमरावजी आकरे (उपाध्यक्ष), ३) श्री वसंतराव पाटील (संचालक), ४) श्री कमलाकरराव शेंडे (संचालक), ५) श्री मधुकरराव भोयर (संचालक), ६) श्री वसंतराव होणाडे (संचालक), ७) श्री पुंडलीकराव तेलंग (संचालक), ८) श्री भानुदासजी भोयर (संचालक), ९) श्री शारदराव मोहदूरे (संचालक), १० श्री श्रीमती शशिकलाबाई उघडे (संचालिका), ११) श्रीमती शुभदाताई कोकाटे (संचालिका), १२) श्री विवेकराव दाते (तज्ञ) संचालक ), १३) मा साहा निबंधक सह संस्था (दुग्ध) वर्धा

| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
|---|---|---|
| श्री माधवराव कडू | श्री प्रेमराजजी आकरे | श्री देवरावजी कासटवार |

**दत्त विशाल मजूर सह. संस्था,** र.नं. ९०१, ता.आरमोरी, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**ग्रामीण विकास मजूर सह. संस्था वळधा,** र.नं. ९०२, ता.आरमोरी, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**शबरी मजूर सह. संस्था खरखाळा,** र.नं. ९०८, ता.कुरखेडा, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**राधेश्याम बाबा मजूर सह. संस्था कुरूड,** र.नं. ९०३, ता.वडसा (देसाईगंज)
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**अंबिका मजूर सह. संस्था,** र.नं. २५३, ता.धानोरा, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**सिरोंचा तालुका मजूर सह. संस्था,** र.नं. १३०१, ता.सिरोंचा, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**उत्साही मजूर सह. संस्था देलनवाडी,** र.नं. २५२, ता.आरमोरी, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**जय बजरंग मजूर सह. संस्था तळोधी,** र.नं. २२८, ता.चामोर्शी, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**श्रमशक्ती मजूर सह. संस्था मर्या. कोरची,** र.नं. ११५१, ता.कोर्ची, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**सम्यक मजूर सह. संस्था मर्या. उपदल्ली,** र.नं. ७०१, ता.धानोरा, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**संघर्ष मजूर सह. संस्था मर्या. आलापल्ली,** र.नं. १३०२, ता.अहेरी, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**त्रिमुर्ती मजूर सहकारी संस्था, गडचिरोली**
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!

**वैनगंगा ग्रामीण विकास मजूर सह. संस्था, कोपरअल्ली**
र.नं. ६५३, मुलचेरा, ता. मुलचेरा, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**ग्राम पंचायत शिर्शी,** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**ग्राम पंचायत वळधा,** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**ग्राम पंचायत सायगांव,** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

## आधारभूत किमतीनुसार तूर खरेदी करण्याविषयी शेतकरी संघटनेच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. १४ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्रभर धरणे आंदोलन करण्यात आले




सोलापूर




अकोला




बुलडाणा



गडचिरोली




हिंगोली



लातूर

**ग्राम पंचायत जोगीसाखरा,** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**शंकरनगर ग्राम पंचायत,** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**ग्राम पंचायत डोंगरगांव (भु),** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**ग्राम पंचायत कोरेगांव,** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**ग्राम पंचायत वासाळा,** ता. आरमोरी, जि. गडचिरोली
सरपंच/सचिव तथा सदस्य व गावकऱ्यांकडून हार्दिक शुभेच्छा...!

**श्री. सुधीर धकाते**
ता. आरमोरी, जि. गडचिरोली
कडून हार्दिक शुभेच्छा...!

**जंगल कामगार सहकारी संस्था, वैरागड** र.नं. ३५३, ता.आरमोरी, जि. गडचिरोली
अध्यक्ष/सचिव तथा संचालक मंडळ व सभासदांकडून
हार्दिक शुभेच्छा...!



**SHRI OM AGENCIES**
**BSNL FRANCHISE**
Pro. Manisha O. Nakade

**NAKADE MEDICAL &**
**GENERAL STORES**
Pro. Omprakash M. Nakade

## आधारभूत किमतीनुसार तूर खरेदी करण्याविषयी शेतकरी संघटनेच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. १४ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्रभर धरणे आंदोलन करण्यात आले



अहमदनगर



नागपूर



सांगली




नाशिक



परभणी



वर्धा



पुणे



नांदेड

भूमी
www.geetai.org

# कृषी पर्यटन केंद्र

*चला शिवार फेरिला निसर्गरम्य वातावरणामध्ये*

MAHARASHTRA TOURISM

AGRI TOURISM Pure Holidayism

# सरस्वती ॲग्रोटेक फार्म (अहिंसातीर्थ), आमखेडा

येथील संपूर्ण १५० एकर शेतजमिनीमध्ये विदर्भातील पहिलाच उपक्रम


शेतासंबंधी माहिती


घोडा सवारी


छोट्या मुलांकरिता बाईक


मडबाथ


परिवारासह आलेली पर्यटक मंडळी


बाल संस्कार शिबीर


मैदानी खेळ


उत्पादने

सुरू असलेले उपक्रम : नर्सरी, डेअरी, शेणापासून १५ के.व्ही.ए. विद्युत निर्मीती, कृषी पर्यटन, भूमी बालसंस्कार शिबीर, शेतकरी मेळावे, आध्यात्मिक, सामाजिक उपक्रम, स्वास्थ, शिक्षण, इ. तसेच मिटींग, कॉन्फरन्स, ट्रेनिंगसाठी सर्व सुविधांसह जसे की प्रोजेक्टर, ऑडीओ व्हीडीओ सिस्टीमसह सुसज्ज हॉल, सरोदय अध्ययन केंद्र इत्यादी.

वैशिष्ठे : मैदानी खेळ, पोहण्यासाठी तलाव, बैलगाडी / लहान मुलांची बाईक / ट्रॅक्टर सवारी, शांत परिसर, निर्सग रम्य वातावरण

संपर्क

**श्री. घन:शाम (हिम्मत) माणिकराव जोगदंड – मो. ९८२२८७२०३९, श्री. मेजर संतोषकुमार मुखमाले – मो. ९९२२९६०२९९, श्री. राजेशकुमार घुगे – मो. ९०११०३४३५५**



गीताई ह्युमन काईंड डेव्हलपमेंट ट्रस्ट, पुणे द्वारा संचालित

Associated with College of Agriculture Baramati

Agricultural Development Trust Baramati

संभव: सर्व भुतानाम्

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ संलग्नित

# कर्मयोगी बाबारावजी जोगदंड कृषी महाविद्यालय

**(अहिंसातीर्थ) आमखेडा, ता. मालेगाव, जि. वाशिम, महाराष्ट्र**










Kalash
अजब बिजी II
गजब बिजी II
GAJAB गजब
AJAB अजब
संकरित मिरची
दिशा
बीएसएस ४५३
आपलं अजब भारी,
आपलं गजब भारी,
आपली दोन्ही वाणं
लयभारी...
शेतकऱ्यांची आशा!
संकरित मिरची दिशा
कलश सिडस् प्रा.लि.
मंठा रोड, जालना - ४३१ २०३. फोन.: (०२४८२) २४४००० (३० लाईन्स)



पिकांच्या भरघोस व दर्जेदार उत्पादनासाठी
२८ वर्षापासून लाखो शेतकऱ्यांचे विश्वासपात्र
प्लॅन्टो कृषीतंत्र
भारत सरकारच्या CSIR/NIO प्रयोग शाळेने विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित
भारतातील विविध कृषी विद्यापिठांमध्ये निरनिराळ्या पिंकावरील परिक्षणात उत्पादन वाढिसाठी प्लॅन्टो उत्पादने खुपच परिणाम कारक असल्याचे सिध्द झाले आहे.
PLANTO
प्लॅन्टोकृषी तंत्र वापराचे फायदे
मुळ्यांचा जलद विस्तार होतो, अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. फोटोसिंथेसिस क्रियेचा वेग वाढून पिकाची सर्वांगीण व निरोगी वाढ होते. कृषी विद्यापिठातील चाचण्यांनुसार प्लॅन्टोच्या वापराने उत्पादनात २० ते ६०% पर्यंत वाढ मिळते.
An ISO 9001 : 2008 Certified Company
प्रलशर बायो प्रॉडक्टस् प्रा. लि., गोवा
डी, २/१०, काकोडा इंडस्ट्रियल इस्टेट, कुचेरेंम, काकोडा, गोवा. । महाराष्ट्र : संपर्क :- मो. ९४२३१ ८५४९२

तिसऱ्या अ.भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा..!

# कृषि उत्पन्न बाजारसमिती, हिंगणघाट



समितीने गत १४ वर्षांपासून शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदु मानुन शेतकरी व इतर बाजार घटकांकरीता नवनविन योजना यशस्वीरीत्या राबवुन विदर्भात नव्हे तर राज्यात नावलौकिक मिळविला आहे.

- ❖ शेतकऱ्यांकरीता धान्यबाजार व कापुस बाजार येथे रु. १ मध्ये भरपेट जेवण.
- ❖ भव्य व सुशोभित शेतकरी निवास मध्ये रु. १/– मध्ये निवासची व्यवस्था व सकाळी नि:शुल्क चहा.
- ❖ २४ तास सुरक्षा व्यवस्था
- ❖ मार्केट यार्डवरून बस स्थानकापर्यंत समितीद्वारा नि:शुल्क बसची व्यवस्था
- ❖ ग्रामीण भागात ग्रामपंचायत अंतर्गत स्मशानभुमी तेथे हॅन्डपंप उभारणी
- ❖ शेतकरी व शेतमजुरांना अल्पदरात कानगाव व हिंगणघाट येथे मंगल कार्यालयाची व्यवस्था
- ❖ अभियांत्रिकी (बि.ई.) द्वितीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्या शेतकरी पाल्यांना अनुदानावर लॅपटॉप वितरण
- ❖ जि.प. शाळा व अंगणवाडींना मोफत पंखे वाटप
- ❖ बाजार आकार कापूस सेस रु. १ वरून ५० पैसे, कापूस अडत रु. १.२५ पैसे, धान्य अडत रु. १.५० पैसे
- ❖ अडत मुक्त कापूस बाजारपेठ करण्याच्या दृष्टीने वाटचाल
- ❖ तारण योजनेत अंतर्गत कर्जाची व्यवस्था
- ❖ शेतकरी व शेतमजुर पाल्यांना ५० टक्के अनुदानावर व्यवसायिक अभ्यासक्रम
- ❖ महाराष्ट्रात कापूस शेतमाल तारण योजना राबविण्याच्या दृष्टीने चालना मिळावे म्हणून राबविलेली 'शेतकरी कापूस तारण योजना'
- ❖ आकस्मिक संकटधारक शेतकऱ्यांना आर्थिक मदत
- ❖ एस.एम.एस. सुविधा
- ❖ टोल फ्री दुरध्वनी क्र. १८००८४३१००१
- ❖ पांधन रस्ते अभियान
- ❖ बालिका बचाओ योजनेअंतर्गत आर्थिक मदत
- ❖ सामुहिक विवाह सोहळ्याचे दि. १५ मे २०१५ रोजी यशस्वी आयोजन
- ❖ कृषिवर आधारीत चर्चा सत्राचे आयोजन
- ❖ शेतकऱ्यांना पं.दे.कृ.विद्यापीठ, अकोला द्वारा प्रकाशीत 'कृषि संवादिनी २०१५' मोफत वाटप
- ❖ ठिबक सिंचन अनुदान योजना

सदर योजनेत समिती कार्यक्षेत्रातील ज्या शेतकऱ्यांनी दि. ०१/०४/१५ ते ३१/०३/१६ या कालावधीत ठिबक सिंचन लावले असल्यास समितीमार्फत २ हेक्टर मर्यादेपावेतो प्रती हेक्टरी १० ते १५ हजार पावेतो अनुदान देण्यात येईल.

**आगामी महत्त्वाकांक्षी योजना**

- ❖धान्य मार्केट यार्डवर सि.सि.टि.व्ही. कॅमेरा
- ❖माती पाणी व पान परीक्षण प्रयोगशाळा
- ❖शेतमाल क्लीनिंग ग्रेडिंग व पॅकिंग युनिट
- ❖शितगृह उभारणी

**ॲड. सुधिर कोठारी**
**सभापती**

संचालक मंडळ : सर्वश्री मा. हरिष वडतकर (उपसभापती), मधुकरराव डंभारे, मधुसूदन हरणे, ओमप्रकाशजी डालिया,उत्तमराव भोयर, शेषकुमार येरलेकर, विनोद वानखेडे, अशोक उपासे, राजेश मंगेकर, सुरेश सतोकर,बापुरावजी महाजन, बळीराम नासर, सुरेश वैद्य, पंकज कोचर, संजय कातरे, सौ. सुरेखाताई सायंकार, सौ. माधुरीताई चंदनखेडे, सचिव टी.सी. चांभारे